सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, ९ जानेवारी २०२५। युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ६४ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# मराठी अधिकृतपणे 'अभिजात'

### अधिसूचना सुपूर्द
### मंत्री उदय सामंत यांची माहिती

◆ **नवी दिल्ली, ८ जानेवारी**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा मान मिळाल्याबाबतची अधिसूचना बुधवारी केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी सुपूर्द केली, अशी माहिती मराठी भाषा आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे, अभिजात भाषा पाठपुरावा समितीचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे, ज्येष्ठ साहित्यिक प्रदीप ढवळ व राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे उपस्थित होते.

मंत्री उदय सामंत यांनी या ऐतिहासिक प्रसंगी आनंद व्यक्त करीत पत्रकारांना सांगितले, ११ वर्षांपूर्वी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव पाठवला होता. तेव्हा ते मराठी भाषेचे राज्यमंत्री होते.



उदय सामंत यांना मराठीला अभिजात भाषेच्या दर्जाची अधिसूचना देताना केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत

याबाबतची अधिसूचना आज स्वीकारताना त्याच विभागाचा कॅबिनेट मंत्री आहे, हा मोठा योगायोग आहे. महाराष्ट्राच्या प्राकृत भाषेला हा मान मिळाल्याचा अभिमान असल्याच्या भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत, मंत्री सामंत यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल धन्यवाद दिले.

केंद्रीय सांस्कृतिक मंत्री शेखावत यांच्याशी झालेल्या भेटीमध्ये उदय सामंत यांनी महाराष्ट्राच्या प्राकृत भाषेला निधीची अधिक उपलब्धता करून देण्याची विनंती केली. पुण्यात होणाऱ्या आगामी जागतिक मराठी संमेलनाला शेखावत यांनी येण्याचे मान्य केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. दिल्लीच्या साहित्य संमेलनाच्या पाठीशी राज्य शासन उभे आहे.


साहित्य संमेलनाच्या पृष्ठभूमीवर महत्त्वाचा टप्पा

पुढील महिन्यात होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पृष्ठभूमीवर अभिजात भाषेचा दर्जा हा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. मागील वर्षीपासून साहित्य संमेलनासाठी राज्य शासनाने दोन कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला असून यावर्षीही तेवढीच मदत दिली जाईल. दिल्लीतील मराठी शाळा सुदृढ करण्यासाठी महाराष्ट्र सरकार विशेष प्रयत्न करेल, असे ते म्हणाले. ◀(तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### चढ-उतारानंतर बाजारात घसरण

**मुंबई** : देशांतर्गत शेअर बाजारात बुधवारी दिवसभराच्या चढ-उतारानंतर निर्देशांक, निफ्टी घसरणीसह बंद झाले. निफ्टी १८ अंकांनी तर निर्देशांक अवघ्या ५० अंकांनी खाली आला. परदेशी गुंतवणूकदारांच्या सतत विक्रीमुळे कंपन्यांच्या तिसऱ्या तिमाहीच्या निकालांबाबत गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थता आहे. त्या पृष्ठभूमीवर बाजारात मंदीचा माहोल दिसून आला. निर्देशांकातील ३० पैकी १५ शेअर्स फायद्यात राहिले. त्यात टाटा कन्सल्टन्सीच्या शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ दिसून आली. त्यापाठोपाठ रिलायन्स, आयटीसी, एशियन पेण्ट्स आणि एचसीएल टेक यांचा क्रमांक लागतो.



### टाटा समूहाने सुरू केली एफडी योजना

**मुंबई** : टाटांच्या जगभरात अनेक कंपन्या आहेत. आता टाटांची डिजिटल फिनटेक कंपनीही विस्तार करत आहे. टाटा डिजिटल कंपनी 'टाटा निओ' आपल्या ग्राहकांना एफडी सेवादेखील पुरवणार आहे. टाटा डिजिटलने त्यांच्या सुपर ॲप 'टाटा न्यू'वर मुदत ठेवीची सुविधा सुरू करून किरकोळ गुंतवणूक क्षेत्रात प्रवेशाची घोषणा केली आहे. बचत बँक खात्याशिवायही ग्राहक ०.१ टक्के व्याजदराने मुदत ठेवींमध्ये गुंतवणूक करू शकतात. त्यासाठी ग्राहक अगदी १००० रुपयांपासूनही गुंतवणूक करू शकतात.

### ओला इलेक्ट्रिकला सेबीचा इशारा

**मुंबई** : भारतीय शेअर बाजार नियामक सेबीने ओला इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेडला एक्स्चेंजपूर्वी सोशल मीडियावर विस्तार योजना जाहीर केल्याबद्दल फटकारले आहे. एक्सचेंज फाइलिंगनुसार, सेबीने इतर गोष्टींसह 'लिस्टिंग ऑब्लिगेशन ॲण्ड डिस्कोर्स रिक्वायरमेंट्स' रेग्युलेशन २०१५ च्या अनेक कलमांचे उल्लंघन केल्याबद्दल कंपनीला ई-मेलद्वारे इशारा दिला. सेबीने आपल्या पत्रात लिहिले आहे की या उल्लंघनांची अत्यंत गांभीर्याने दखल घेण्यात आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तुम्हाला सावधगिरी बाळगण्याचा आणि भविष्यात सावध राहण्याचा आणि तुमच्या अनुपालन मानकांमध्ये सुधारणा करण्याचा सल्ला देण्यात आला आहे, अन्यथा योग्य कारवाई केली जाऊ शकते.

### मुंबईत एचएमपीव्हीचा संशयित रुग्ण

**मुंबई** : महाराष्ट्रात बुधवारी एचएमपीव्ही विषाणूचा तिसरा संशयित रुग्ण आढळून आला. मुंबईतील पवई येथील हिरानंदानी रुग्णालयात सहा महिन्यांच्या मुलीला संसर्ग झाल्याचे आढळून आले आहे. मुलीला १ जानेवारी रोजी गंभीर खोकला, छातीत जडपणा आणि ऑक्सिजनची पातळी ८४ टक्क्यांपर्यंत घसरल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तथापि, चिमुकली आता बरी झाली आहे. मुंबईतील या विषाणूची ही पहिलीच घटना आहे.

### टोरेस कंपनीचा मालक देश सोडून पसार

**मुंबई** : टोरेस या ज्वेलरी कंपनीने मुंबईतील हजारो गुंतवणूकदारांना करोडो रुपयांचा गंडा घातला आहे. या कंपनीने सोने, चांदी आणि मोइसॅनाइट स्टोनवर जबरदस्त रिटर्न देण्याचे स्वप्न दाखवत हजारो लोकांकडून कोट्यवधी रुपये गोळा केले.

### जागतिक शांतीसाठी दहशतवाद आव्हान : एस. जयशंकर

**नवी दिल्ली** : दहशतवाद, कट्टरतावाद आणि फुटीरतावाद यांच्याविरोधात एकत्र लढा देणे काळाची गरज आहे. दहशतवाद जागतिक शांततेसाठी मोठे आव्हान असून, त्यांचे प्रायोजक आणि आर्थिक मदत करणाऱ्यांची नाकेबंदी करायला हवी, असे भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर एका इंग्रजी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.दहशतवाद केवळ एका देशापुरता मर्यादित नसून, जगातील सर्वच देशांना त्याची झळ पोहोचत आहे. पाकिस्तानचा अप्रत्यक्ष उल्लेख करताना जयशंकर म्हणाले, काही देश दहशतवाद्यांना प्रोत्साहन देतात, आर्थिक मदत करतात, अशा देशांवर कठोर कारवाई करायला हवी. त्यांची सर्वच स्तरावर नाकेबंदी करायला हवी. यासाठी सर्वसमावेशक दृष्टीकोनाची आवश्यकता आहे. दहशतवाद्यांना चालना देणारेच नव्हे, तर त्यांच्या सूत्रधारांवर संयुक्त कारवाई व्हायला हवी. सर्व देशांनी एकत्र येऊन दहशतवाद्यांविरोधात सामूहिक कारवाई केल्यास त्यांचे अस्तित्वात संपुष्टात येऊ शकते. दहशतवाद्यांविरोधात प्रादेशिक दहशतवादविरोधी संघटनेची स्थापना करण्यावर चर्चा झाली, हे भारताचे यश आहे.

## रुपयात झाली विक्रमी घसरण

◆ **नवी दिल्ली, ८ जानेवारी**

भारतीय रुपया आता विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया ८५.८४ च्या पातळीवर घसरला आहे. याचा सर्वसामान्यांवर मोठा परिणाम होणार आहे.

भारत विदेशी बाजारातून कच्चे तेल खरेदी करतो. रुपयाच्या घसरणीमुळे पेट्रोलियम पदार्थांची आयात महागणार आहे. रुपयाच्या घसरणीमुळे आयात महाग झाल्याने पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढण्याचा धोका तसेच महागाई वाढण्याची शक्यता आहे. डिझेलच्या किमती वाढल्याने मालवाहतूक महागेल. त्याचा परिणामही महागाईवर होऊ शकतो.

देशात पेट्रोल आणि डिझेल व्यतिरिक्त जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीही वाढू शकतात. डाळी आणि खाद्यतेल महाग होऊ शकतात. भारत खाद्यतेल आणि डाळींची मोठ्या प्रमाणावर आयात करतो. रुपयाच्या घसरणीमुळे देशांतर्गत बाजारात खाद्यतेल आणि डाळींच्या किमती वाढू शकतात.

रुपयाच्या घसरणीमुळे परदेशी शिक्षण महाग होऊ शकते. दुसरीकडे रुपयाच्या घसरणीचा फायदा भारतीय निर्यातदारांना होईल. ◀(वृत्तसंस्था)

# 'जेपीसी'ची पहिलीच बैठक वादळी

### 'एक देश, एक निवडणूक'

◆ **नवी दिल्ली, ८ जानेवारी**

एक देश एक निवडणुकीबाबत स्थापन केलेल्या संयुक्त सांसदीय समितीची (जेपीसी) बुधवारी पहिली बैठक झाली. पहिली बैठक वादळी झाल्याचे समजते.

माजी विधि आणि न्याय राज्यमंत्री भाजपाचे पी. पी. चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संयुक्त सांसदीय समितीच्या बैठकीत विधि आणि न्याय विभागाने एक देश एक निवडणुकीबाबत तपशीलवार सादरीकरण केले. यात लोकसभेसोबत देशातील सर्व राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकत्र घेण्याची आवश्यकता विषद करण्यात आली.

भाजपा सदस्यांनी एक देश एक निवडणूक विधेयकाचे स्वागत केले, हे देशहिताच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे म्हटले. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या सूचनेला विरोध केला.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात एक देश एक निवडणूक बाबतचे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत सादर करण्यात आले होते. या विधेयकाला काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी विरोध केल्यामुळे ते ३९ सदस्यीय संयुक्त सांसदीय समितीकडे पाठवण्यात आले. या समितीत काँग्रेसच्या प्रियांका वढेरा, मनीष तिवारी, भाजपाचे अनुराग ठाकूर, बांसुरी स्वराज, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे, आपचे संजयसिंह, जदयुचे संजय झा, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी आणि अन्य सदस्य आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### सुटकेसमधून दिला १८ हजार पानांचा अहवाल

आजच्या पहिल्याच बैठकीत एक देश एक निवडणूकबाबत माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वातील उच्चाधिकार समितीचा १८ हजार पृष्ठांचा अहवाल समितीतील सर्व सदस्यांना सविस्तर अभ्यासासाठी एका सुटकेसमधून देण्यात आला. आपचे संजयसिंह यांनी अहवालाची प्रत असलेल्या सुटकेससोबतचे छायाचित्र जारी केले.

# व्ही. नारायणन् यांची इस्रोचे नवे प्रमुख म्हणून नियुक्ती

### १४ जानेवारीला स्वीकारणार पदभार

◆ **नवी दिल्ली, ८ जानेवारी**

केंद्र सरकारने व्ही. नारायणन् यांची इस्रोचे प्रमुख म्हणून नियुक्ती केली. ते डॉ. एस. सोमनाथ यांची जागा घेतील. ते १४ जानेवारी रोजी पदभार स्वीकारणार आहेत. पुढील दोन वर्षे किंवा पुढील सूचना मिळेपर्यंत ते या पदावर काम करतील, असे मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने म्हटले आहे.

इस्रो सध्या यशस्वी टप्प्यातून जात आहे. भविष्यात चांद्रयान-४ आणि गगनयान या प्रमुख मोहिमा राबवल्या जाणार आहेत. इस्रोचे अध्यक्षपद आणि अंतराळ विभागाच्या सचिवपदाची नवीन



जबाबदारी मिळाल्याने आनंदी आहे, अशी प्रतिक्रिया नारायणन् यांनी व्यक्त केली. महान नेत्यांच्या नेतृत्वात महान संस्थेत काम करण्याचे सौभाग्य मला मिळाले आहे, असे ते म्हणाले.

इस्रो ही एक खूप मोठी संघटना आहे. अनेक दिग्गजांनी याचे नेतृत्व केले आहे. त्याचा भाग होणे हे माझे भाग्य समजतो, असे त्यांनी थिरुअनंतपुरम् येथे पत्रकारांना सांगितले. आपल्या नियुक्तीबद्दल पंतप्रधान कार्यालयाकडून माहिती मिळाली, असे नारायणन् यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

पंतप्रधान कार्यालयाने संपर्क साधला. इस्रोचे सध्याचे प्रमुख एस. सोमनाथ यांनीही दूरध्वनीवर संपर्क साधत नियुक्तीबाबत माहिती दिली, असे नारायणन् यांनी सांगितले. इस्रोच्या भविष्यातील मोहिमांबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, इस्रोने महत्त्वाच्या मोहिमा हाती घेतल्या आहेत. इस्रो सध्या महत्त्वाच्या टप्प्यातून जात आहे.

इस्रोने सध्या डॉकिंगचा प्रयोग हाती घेतला आहे. याचे प्रक्षेपण ३० डिसेंबर रोजी करण्यात आले. डॉकिंगची प्रक्रिया ९ जानेवारी रोजी होणार असल्याचे नारायणन् यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)



प्रयागराज येथे बुधवारी विविध आखाड्यांच्या साधू-संतांनी त्रिवेणी संगमावरून महाकुंभात छावणी प्रवेश केला.

## शेख हसीना भारतातच राहणार

### केंद्राने व्हिसा वाढवत बांगलादेशला दिले उत्तर

◆ **नवी दिल्ली, ८ जानेवारी**

केंद्र सरकारने बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या व्हिसाची मुदत वाढवली आहे. त्यामुळे त्यांचे यापुढेही भारतातच वास्तव्य राहणार हे स्पष्ट झाले. त्यांना मायदेशात पाठवावे, अशी मागणी बांगलादेशाने केली होती. मात्र, भारताने ही मागणी अप्रत्यक्षपणे फेटाळल्याचे स्पष्ट झाले आहे.

शेख हसीना यांचे प्रत्यार्पण केले जाणार नाही. भारत सरकारकडून बांगलादेश सरकारला पाठवण्यात आलेल्या अप्रत्यक्ष संदेशात या विषयावर आपली भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. बांगलादेशने हसीना यांचा पासपोर्ट रद्द करूनही भारताने त्यांचा व्हिसा वाढवला आहे. गृह मंत्रालयाने शेख हसीना यांना भारतात राहण्याची व्हिसाची मुदत वाढवली आहे. बांगलादेशात देशव्यापी निदर्शनांवेळी झालेल्या हिंसाचारावेळी शेख हसीना ५ ऑगस्ट २०२४ रोजी भारतात वास्तव्यास आल्या. युनूस सरकारने त्यांचा पासपोर्ट रद्द करून त्यांच्या विरोधात अटक वॉरंट जारी केला आहे. ◀(वृत्तसंस्था)

# 'इंडिया' आघाडीतील पक्षांचा आपला पाठिंबा

### दिल्लीच्या निवडणुकीत काँग्रेस पडली एकटी

◆ **नवी दिल्ली, ८ जानेवारी**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष 'इंडिया' आघाडीत एकटा पडल्याचे चित्र आहे. दिल्लीतील निवडणुकीवरुन आघाडीत फूट पडल्याचेही चित्र आहे.

दिल्लीत इंडिया आघाडीतील आप आणि काँग्रेस हे दोन प्रमुख पक्ष एकमेकांविरुध्द लढत आहे. दुसरीकडे तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांनी बुधवारी दिल्ली विधानसभा निवडणुकीत अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला पाठिंबा देण्याची घोषणा केली. समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव आणि शिवसेना उबाठाचे उद्धव ठाकरे यांनी आधीच आपला पाठिंबा जाहीर केला आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाचा पराभव होईल तसेच आप पुन्हा एकदा सत्तेवर येईल, असा विश्वास तृणमूल काँग्रेसचे प्रवक्ते कुणाल घोष यांनी व्यक्त केला.

दिल्लीत भाजपाचा पराभव करण्याची क्षमता फक्त आप आदमी पक्षात आहे, त्यामुळे आम्ही आपला पाठिंबा देत असून, निवडणूक प्रचारात आम्ही आपसोबत सहभागी होऊ, असे सपाचे अखिलेश यादव यांनी म्हटले.

आप आणि काँग्रेस यांच्यात विधानसभा निवडणुकीवरून जुंपली आहे. काँग्रेस ही भाजपाची 'बी टीम' असल्याचा आरोप आपने केला. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने आपशीच आघाडी केली होती, याचा आपला सोयीस्कर विसर पडल्याचा टोला काँग्रेसने लगावला आहे. ◀(वृत्तसंस्था)



## शाकंभरी नवरात्रोत्सवानिमित्त तुळजाभवानी देवीची रथ अलंकार पूजा...

**तुळजापूर** : शाकंभरी नवरात्रोत्सवानिमित्त महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेस बुधवारी रथ अलंकार महापूजा मांडण्यात आली.

# संरक्षण संबंध दृढ करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार

### राजनाथसिंह- मोहम्मद घसान मौमून चर्चा

◆ **नवी दिल्ली, ८ जानेवारी**

भारत आणि मालदीव यांच्यातील परस्पर संरक्षण संबंध अधिक दृढ करण्याच्या वचनबद्धतेचा संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी पुनरुच्चार केला. राजनाथसिंह यांनी बुधवारी मालदीवचे संरक्षण मंत्री मोहम्मद घसान मौमून यांच्याशी शिष्टमंडळस्तरीय बैठकीत चर्चा केली.

गेल्या ऑक्टोबरमध्ये मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मोइझ्झू यांच्या भेटीचा संदर्भ देत राजनाथसिंह म्हणाले की, त्यांच्या भेटीमुळे द्विपक्षीय संबंधांना नवी ऊर्जा आणि दिशा मिळाली. मोईझ्झू यांच्या भेटीदरम्यान जारी करण्यात आलेला संयुक्त व्हिजन डॉक्युमेंट दोन्ही देशांसाठी मार्गदर्शक तत्त्वे आहे.

दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये एकूणच सुधारणा होत असताना लष्करी संबंध मजबूत करण्यासाठी मालदीवचे संरक्षण मंत्री मौमून बुधवारी तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले. दिल्लीत ते अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही भेटणार आहेत. मालदीवचे चीन समर्थक राष्ट्रपती मोहम्मद मोइझ्झू यांच्या मागणीनंतर भारताने हिंद महासागर द्वीपसमूहात तैनात केलेल्या सुमारे ८० लष्करी जवानांना परत बोलावले होते. भारतीय लष्करी कर्मचारी मालदीवमध्ये दोन लष्करी सुविधांच्या देखभाल आणि संचालनासाठी होते. त्यांच्या जागी भारतीय नागरी कर्मचारी तैनात करण्यात आले.



मालदीवचे संरक्षण मंत्री मोहम्मद घसान मौमून यांचे स्वागत करताना राजनाथसिंह

या संपूर्ण घटनेनंतर दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये गंभीर तणाव निर्माण झाला होता. संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, संरक्षण मंत्री राजनाथसिंह ८ जानेवारी रोजी नवी दिल्लीत मालदीवचे संरक्षण मंत्री मोहम्मद घसान मौमून यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेत आहेत. दोन्ही मंत्री मालदीवची क्षमता वाढवण्यासाठी प्रशिक्षण, सराव आणि समन्वय यावर काम करतील. राष्ट्रीय संरक्षण दल संरक्षण प्रकल्प तसेच संरक्षण उपकरणांच्या पुरवठ्यासह द्विपक्षीय संरक्षण सहकार्याच्या विविध पैलूंचा आढावा घेतील.

मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, भारताच्या 'शेजारी प्रथम' धोरणात मालदीवचे विशेष स्थान आहे. हिंद महासागर क्षेत्रात स्थिरता आणि समृद्धी आणणे हा या धोरणाचा उद्देश आहे. ◀(वृत्तसंस्था)

# वऱ्हाडातील वीज चोर महावितरणच्या 'रडार'वर

### कायमस्वरूपी वीजपुरवठा होणार खंडित
### ग्राहकाची होणार तपासणी

◆ **अकोला/वाशीम/बुलढाणा, ८ जानेवारी**

वीज चोरीविरोधात महावितरणकडून वऱ्हाडातील अकोला, वाशीम व बुलढाणा जिल्ह्यांत मोहीम सुरू करण्यात आली आहे. मोहिमेत विभागानुसार ३० ते ४० पथके तयार केली आहेत. तीन महिने चालणाऱ्या मोहिमेत महावितरणकडून थेट कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे मुख्य अभियंता यांनी स्पष्ट केले आहे.

कार्यकारी संचालक (प्रकल्प) धनंजय औंढेकर यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून घेतलेल्या आढावा बैठकीत वीज गळती व वीज हानीविरुद्ध नाराजी व्यक्त करीत वितरणहानी १५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट दिले आहे. त्यामुळे आगामी काळात परिमंडळांतर्गत अकोला, वाशीम आणि बुलढाणा जिल्ह्यांत महावितरणद्वारे वीज चोरीविरोधात मोहीम तीव्र करण्यात आली आहे. मोहिमेत सदोष मीटर, सरासरी वीज देयक, शून्य युनिटचे देयक, अत्यल्प वीज वापर अशा सर्वच ग्राहकांची तपासणी करण्यास सुरुवात केली आहे.

सवलत देऊनही अभय योजनेत कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेले जे ग्राहक सहभागी झाले नाही व पुनर्जोडणी घेतलेली नाही, अशा कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेल्या सर्वच ग्राहकांची प्रत्यक्ष तपासणीला सुरुवात केली आहे. मोहिमेत वीजजोडणी अवैध आढळणाऱ्यांविरुद्ध विद्युत कायदा-२००३ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. थकबाकी असलेल्या ठिकाणी शेजाऱ्यांकडून अनधिकृत वीजजोडणी दिली असेल, तर त्या शेजारी ग्राहकांवरही कायदेशीर कारवाई होणार आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### महावितरणला बसतो फटका

वीज चोरीच्या विद्युत भारामुळे विद्युत वाहकावर, रोहित्रावर त्याच्या मर्यादेच्या पलीकडे भार पडतो. याचा फटका महावितरणला बसतो. वीज चोरी करणाऱ्यांमुळे नियमित वीज देयक भरणाऱ्या ग्राहकांनादेखील नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो.



## संक्षिप्त वृत्त



### बस प्रवाशांची गैरसोय दूर करण्याची मागणी

**करमाळा, दि. ८ जानेवारी-**

करमाळा तालुक्यातील विद्यार्थ्यांची अनेक दिवसांपासून एसटी बसच्या असुविधेमुळे गैरसोय होत आहे. हे टाळण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष आरशान पठाण व अनेक विद्यार्थ्यांनी मिळून आगारप्रमुखांना निवेदन दिले. त्यात विविध मागण्या मांडण्यात आल्या. रोज २-३ बस बंद पडलेल्या बातमी येत आहेत. आगारातील बसेसवर चालक, वाहक आणि प्रवाशी कंटाळलेले आहेत. करमाळा आगारातील एस टी बसेस दुरुस्ती करुन चांगल्या बस वेळेवर सोडण्यात याव्या. तसेच २-३ महिन्यात १० वी आणि १२ वी विद्यार्थ्यांचे बोर्डाचे पेपर चालु होत आहेत. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून आगारातील सगळ्या बसेसची दुरुस्ती करुन घेण्यात यावी. खराब बसेसमुळे विद्यार्थ्यांचे शालेय अथवा बाकी काही नुकसान झाले तर ही संपूर्ण जबाबदारी करमाळा आगाराचीच असेल व आपण पुर्णपणे जबाबदार असताल.करमाळा तालुक्यातील सर्व नागरीकांच्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी लक्षात घेता त्या तक्रारीची दखल घेऊन विद्यार्थ्यांची व नागरीकांची गैरसोय थांबवण्यासाठी कायमची गैरसोय थांबवणे बाबत योग्य त्या उपाययोजना करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.



### जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्री शंकरलिंग प्रशालेचे घवघवीत यश

**वळसंग, दि. ८ जानेवारी-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) ५२ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन लोकमंगल कॉलेज, वडाळा येथे आयोजित करण्यात आले होते. श्री शंकरलिंग प्रशालेतील माध्यमिक गटातून तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनातून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झालेल्या सोमनाथ शिवानंद खराडे यानी बनवलेल्या वेस्ट बगॅस कागद म्हणजे गवत आणि उसाच्या चोथ्यापासून कागद तयार करणे या वैज्ञानिक उपकरणाची निवड राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाकरिता झाली आहे. जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात या यशस्वी विद्यार्थ्यास द्वितीय क्रम ांकाचे रोख रक्कम ५००० चे पारितोषिक, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. सदर यशस्वी व सहभागी बालवैज्ञानिकास विज्ञान विभागातील संजयकुमार धनशेट्टी, शैला निंबाळ, बाळकृष्ण गुंड, सिध्दारुढ हिरेमठ, विजय प्याटी, विजयालक्ष्मी थळंगे, सिध्दाराम भैरामडगी, कलाशिक्षक अजय माणकोजी तसेच प्रयोगशाळा सहाय्यक विनोद दुधगी यांच्यासह इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे म ोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्याचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, संचालक विश्वनाथ थळंगे, प्रकाश दुधगी, शिवशरण प्याटी, रमेश दुधगी, म ल्लिनाथ थळंगे, संजय दुधगी, मुख्याध्यापक विरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनीअभिनंदन केले.

### पोक्सो गुन्ह्यातील आरोपीची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. ८ जानेवारी-**

करमाळ्या तालुक्यातील मौजे वांगी येथील अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग केल्याप्रकरणी पोक्सो गुन्ह्यातील आरोपी कुशिंद्र नामदेव भालके ८वय ७४ वर्षे) याची येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.व्ही.के. मांडे यांनी निर्दोष मुक्तता केली आहे. सदर प्रकरणी यातील हकिगत अशी की, आरोपी हा वांगी येथील रहिवाशी असून गावातच राहणार्या एका अल्पवयीन मुलीला २३ सप्टेंबर २०२१ रोजी पिडीत मुलगी निर्भया ही अल्पवयीन असल्याचे माहीत असतानाही चल तुला खायला देतो, चॉकलेट देतो असे म्हणुन आरोपीने तिच्या हाताला धरुन त्याच्या घराकडे कोणीही नसताना नेऊन निर्भया हिचे बालमनास लज्जा वाटेल असे कृत्य करुन लैंगिक भावनेने तिचे इच्छेविरुद्ध जबरी संभोग करुन बलात्कार केला. अशा आशयाची फिर्याद अल्पवयीन मुलीच्या आईने सोलापूर ग्रामीण पोलीस ठाणे करमाळा येथे दाखल केली होती. त्याप्रमाणे आरोपीविरुद्ध भादंवि. कलम ३७६(अ)(ब), ३५४, ३५४(अ), ३५४(ब), ५०६ सह पोक्सो कलम ४, ८, १२, १७ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. आरोपी याने ड्. महेश जगताप यांच्यामार्फत न्यायालयात सदरील प्रकरण दाखल केले होते. मे. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून आरोपीच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपीची या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली. आरोपीतर्फे अॅड. महेश जगताप, अॅड. राहुल कसबे, अॅड. दैवशाला जाधवर, अॅड. अभिजीत जगताप, अॅड. केदार पाटील, अॅड. आदित्य काकडे, यांनी तर सरकार पक्षातर्फे अॅड. दिनेश देशमुख यांनी काम पाहिले.

### महिलेवर अत्याचार; आरोपीची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. ८ जानेवारी-**

अतुल राजेंद्र भोसले याचे विरुद्ध पीडित महिलेच्या फिर्यादीवरुन बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे भादंवि. कलम ३७६, ५०४ व ५०६ या कलमान्वये दि. १२ मे २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी झालेल्या सुनावणीनंतर बार्शी येथील मे. जिल्हा व अतिरीक्त सत्र न्यायाधीश यांनी यातील आरोपीची निर्दो ष मुक्तता केली. पिडीत महिला ही तिच्या मुलीसह १० मे २०२४ रोजी दुपारी १२ च्या सुमारास रस्तापुर येथील एका शेतात शेळ्या चारणे करीता गेली असता, आंब्याचे झाडाखाली पिडीत फिर्यादी ही एकटीच विश्रांती करत होती. आरोपीने तिथे येवुन पिडीतास दमदाटी शिवीगाळी करुन तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केले व याबाबत कुणाला काही सांगितले तर जीवे मारण्याची धमकी दिली, अशी फिर्याद पिडीतेने बार्शी तालुका पोलिस ठाण्यात दिली होती. याप्रकरणी तपास पूर्ण करुन पोलिसांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. खटल्याची सुनावणी बार्शी येथील मे. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्यासमोर झाली. सदर प्रकरणात झालेल्या सुनावणी व अंतिम युक्तिवादानंतर बार्शी येथील मे. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एल. एस. चव्हाण. यांनी सबळ पुराव्या अभावी आरोपीची निर्दोष मुक्तता केली. यात आरोपी अतुल भोसले याचेवतीने अॅड. प्रशांत एडके, अॅड. सुहास कांबळे, अॅड. समाधान सुरवसे, अॅड. आकाश तावडे यांनी काम पाहिले.

# वाघाचा मोहोळच्या दिशेने प्रवास सुरु

- वन विभागाने व्यक्त केला अंदाज
- नागरिक भयभीत

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ८ जानेवारी-**

बार्शी तालुक्यात ठाण मांडून बसलेला टिपेश्वरचा वाघ वैराग भागात आला असून जनावरांवर हल्ले करत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मोहोळच्या दिशेने त्याचा प्रवास सुरु असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

उपळे दुमाला, मुंगशी आर (ता. बार्शी) परिसरात सोमवारी रात्री वाघाने दोन वासरावर हल्ला करून त्यांना ठार केले होते. त्यानंतर पाठोपाठ लगेच मंगळवारी रात्री दोन वाजण्याच्या सुमारास राळेरास (ता. बार्शी) येथील शेतकरी अरुण नाम देव जाधव यांच्या वासरावर हल्ला करून ठार केल्याची घटना घडली आहे. बुधवारी सकाळी जाधव हे आपल्या शेतात गेल्यावर त्यांना वासरू जागेवर दिसून आले नाही.



त्यावर त्याचा शोध घेतला असता ते काही अंतरावर मृत अवस्थेत पडलेले दिसले. अरुण जाधव यांनी वन विभागाशी संपर्क केला असता वनपाल धनंजय शिरोडकर व त्यांच्या टिमने घटनास्थळी येऊन पंचनामा केला. सदरचा हल्ला वाघानेच केल्याचे स्पष्ट केले. तसेच सासुरे येथील रामेश्वर आवारे या शेतकऱ्याचे देखील रेडकू गायब झाल्याचे वनपाल यांना संबंधित शेतकऱ्यांनी सांगितले. वन खात्याच्या वरिष्ठ कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार सध्या वाघाचा मोहोळ तालुक्याच्या दिशेने

> शेतकऱ्यांनी रात्रीच्या वेळी शेतामध्ये जाताना एकटे न जाता चार-पाच जणांनी एकत्र जावे. वाघसदृश्य प्राणी आढळल्यास त्याच्यावर हल्ला करू नये. प्रथमतः वन विभागाशी संपर्क साधावा. अफवा पसरवू नये असे आवाहन केले आहे.
>
> **-धनंजय शिरोडकर, वनपाल**

प्रवास सुरू असल्याचे सांगितले जात आहे. संपर्क केला असता वनपाल धनंजय शिरोडकर व त्यांच्या टिमने घटनास्थळी येऊन पंचनामा केला. सदरचा हल्ला वाघानेच केल्याचे स्पष्ट केले. तसेच सासुरे येथील रामेश्वर आवारे या शेतकऱ्याचे देखील रेडकू गायब झाल्याचे वनपाल यांना संबंधित शेतकऱ्यांनी सांगितले. वन खात्याच्या वरिष्ठ कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार सध्या वाघाचा मोहोळ तालुक्याच्या दिशेने प्रवास सुरू असल्याचे सांगितले. वाघाने एकदा शिकार केल्यावर मांस पचन होणेसाठी सुमारे ५ ते ७ दिवस लागतात. वाघाने बारा तासातच दुसरा हल्ला राळेरास-सासुरे हद्दीत केला. त्यामुळे मुंगशी येथिल दोन वासरावर त्याने केवळ हल्लाच केलेला असावा असा अंदाज वनपाल धनंजय शिरोडकर यांनी व्यक्त केला आहे. राळेरास येथे वाघाने वासरावर हल्ला केल्यानंतर शेतकऱ्याने वनविभागाला सकाळी सात वाजता कळविले होते. पण उशीराने वनविभागाचे अधिकारी दुपारी एक वाजण्याच्या सुम ारास घटना स्थळी दाखल झाले. गाडी नादुरूस्तीचे कारण त्यांच्या कडून देण्यात आले . त्यामुळे जर रात्री अपरात्री अशा घटना घडल्या तर वनविभागाचे अधिकारी वेळेवर येतील का? असा प्रश्न शेतकऱ्यांना मधून उपस्थित केला जात आहे.

## बार्शीत पोलिसांना स्वसंमोहनाचे धडे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ जानेवारी-**

येथे पोलिसांना दैनंदिन कर्तव्यांदरम्यान येणाऱ्या मानसिक ताण-तणावावर मात करण्यासाठी भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्यावतीने बार्शी शहर पोलीस ठाण्यात स्वसंमोहन प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे आयोजन समितीचे नवनियुक्त सोलापूर जिल्हाध्यक्ष विजय थोरात (कोरे) यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. सोलापूर येथील संमोहनतज्ञ रविंद्र सोरटे यांनी या शिबिराचे मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाची सुरुवात भारतम ातेच्या आरतीने करण्यात आली. भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष विजय थोरात (कोरे) यांचा सन्मान उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या हस्ते करण्यात आला.

तसेच, समितीच्या बार्शी तालुका अध्यक्षपदी नियुक्त झालेल्या संगीता पवार यांचा सन्मान बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी सपोनि दिलीप ढेरे यांच्या हस्ते करण्यात आला. शिबिरा दरम्यान रविंद्र सोरटे यांनी स्वयंसूचना घेत तणाव कमी करण्याचे तंत्र प्रात्यक्षिकासह शिकविले. यामुळे मानसिक ताण-तणाव कमी करण्यासाठी पोलिसांना सहज उपयुक्त उपाय मिळाला.या शिबीरात उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, बार्शी शहर पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी सपोनि दिलीप ढेरे यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या 'जनसंवाद' या उपक्रमाअंतर्गत दिलेले प्रशिक्षण तणावमुक्तीसाठी उपयुक्त व फायदेशीर ठरेल, असे मत शिबिरार्थींनी व्यक्त केले. यावेळी भ्रष्टाचार निर्मूलन समि तीचे जिल्हा जनसंपर्क अधिकारी प्रा. अनिल मुंढे, तालुका उपाध्यक्ष संगीता पवार, प्रा. बाळासाहेब गव्हाणे आदी उपस्थित होते.



## जिजाऊ गुरुकुलच्या आट्यापाट्या संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ जानेवारी-**

खांडवी येथील जिजाऊ गुरुकुलच्या आट्यापाट्या संघाने आपल्या उत्कृष्ट कामगिरीने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड सुनिश्चित केली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्यावतीने संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे आयोजित विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये जिजाऊ गुरुकुलच्या संघाने चम कदार कामगिरी बजावली.

सोलापूर येथे झालेल्या जिल्हा स्तरीय स्पर्धेत जिजाऊ गुरुकुलच्या संघाने विजय मिळवून विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. संगमनेर येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत त्यांनी पुण्याच्या संघाचा १८ गुणांनी पराभव करत भव्य विजय मिळवला आणि राज्यस्तरीय स्पर्धे साठी आपले स्थान निश्चित केले. राज्यस्तरीय स्पर्धा १३ जानेवारी रोजी कोल्हापूर येथे होणार आहे. जिजाऊ गुरुकुलच्या या यशस्वी खेळाडूंना आणि त्यांचे मार्गदर्शक क्रीडाशिक्षक व फिजिकल कोच यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. या यशामुळे जिजाऊ गुरुकुलचे नाव पुन्हा एकदा गौरवले गेले आहे.

## मैंदर्गीत तीन गायी, वासराची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ जानेवारी-**

तालुक्यातील मैंदर्गी येथील तीन शेतकऱ्यांच्या राहत्या घरासम ोर बांधलेल्या चार वर्षाच्या पांढऱ्या खिल्लार गायी व एक काळे पांढरे सात वर्षाचे गीर गाय व त्याचे वासरू असे चार जनावरे चोरून नेले. याबाबत अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याम ध्ये अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल झाला



फिर्याद शेतकरी बसवराज गडेप्पा फुलारी (वय ५७, रा. मादनहिप्परगा रोड, मैंदर्गी) यांनी दिली. फिर्यादी यांचा एक ४ वर्ष वयाच्या पांढऱ्या रंगाची खिल्लार गाय सरळ शिंगाची अंदाजे किंमत पंधरा हजार रूपये व तसेच संगण्णा सूर्यकांत शावरी यांचे एक पांढऱ्या रंगाची चार वर्षाची खिल्लार गाय अंदाजे किंमत पंधरा हजार रूपये व मैनुद्दीन बाशा उस्ताद (रा. मैंदर्गी, ता. अक्कलकोट) यांचे एक काळ्या-पांढऱ्या रंगाची गोल शिंगाची गीर गाय अंदाजे ७ वर्ष वयाची किंमत पंधरा हजार रूपये व गीर गायीचे पांढऱ्या रंगाचे वासरू अंदाजे किंमत पाच हजार अज्ञात चोरट्याने चोरून नेले. अधिक तपास पोना राठोड करीत आहेत.

## बीएएलएलबीत प्रार्थना शेटे विद्यापीठात प्रथम

**पंढरपूर, दि. ८ जानेवारी-**

कर्मवीर औदुंबर पाटील विधी महाविद्यालयातील बीएएलएलबीच्या अंतिम वर्षातील प्रार्थना अतुल शेटे हिने पुण्यश्लोक अहिल्यादेवीहोळकर सोलापूर विद्यापीठातून प्रथम क्रमाक मिळविला आहे.



१० जानेवारी रोजी होणाऱ्या २० व्या दीक्षांत समारंभात तिला सुवर्णपद देण्यात येणार आहे. पंढरपूर मर्चन्ट बँकेतील अधिकारी अतुल शेटे यांची प्रार्थना ही मुलगी आहे.

## भीमा नदी तुडुंब भरुन वाहू लागली

- तडवळ भागातील शेतकऱ्यांमधून समाधान
- रब्बी हंगामातील पिकांना जीवदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ जानेवारी-**



तालुक्यातील हिळ्ळी बंधाऱ्यात रब्बी हंगामातील पिकांसाठी उजनी धरणातून पाणी सोडल्याने पुन्हा एकदा उजनीच्या पाण्याने भीमा नदी तुडुंब भरून वाहत आहे. या पाण्यामुळे तडवळ भाग पुन्हा एकदा सुखावला असून शेतकऱ्यांतून समाधान होत आहे.

उजनी धरणातून पाणी हिळ्ळी बंधाऱ्यापर्यंत सोडण्यात आल्याने या पाण्याचा उपयोग रब्बी हंगाम ातील पिकांना अधिक होणार असल्याने तडवळ भागातील खानापूर, म्हैसलगी, आळगे, शेगाव, कोर्सेगावातील शेतकरी, सामान्य नागरिकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. उजनीतून पाण्याने हिळ्ळी बंधारा तुडुंब भरून वाहत असल्याने तडवळ, खानापूर, म्हैसलगी, आळगे, परिसरातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न मिटला असून शेगाव, कोर्से गाव, देवीकवठा गावांतील नागरिकांना आता शेतीसाठी, पिण्यासाठी व जनावरांसाठी मुबलक पाणी उपलब्ध झाला आहे.

## माजी आ. राम सातपुते यांच्याकडून पिलीव परिसरातील विकासकामांची पाहणी

● नवीन शासकीय विश्रामगृह, ओढ्यावरील पुलाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ८ जानेवारी-**

माजी आ. राम सातपुते यांनी पिलीव परिसरात आपल्या आमदार फंडातून मंजूर केलेली विकासकाम ांची पाहणी केली.

काळामळा येथील डांबरीकरण केलेला रस्ता, महालक्ष्मी देवीकडे जाणाऱ्या ओढ्यावरील पुलाची पाहणी, तर महालक्ष्मी मंदिर परिसरात मंजूर केलेल्या भक्त निवास व पेव्हर ब्लॉक याचे भूमिपूजन, पिलीव येथील नवीन शासकीय विश्रामगृहाचे भूमिपूजन तसेच भैस-सुळे-भिसन वस्ती ओढ्यावरील पुलाचे उद्घाटन केले. भाजपचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सोपान नारनवर, भाजपा सोलापूर जिल्हा किसान मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब सरगर, बाळासाहेब वावरे, संजय देशमुख, किरण पाटील, धर्मा माने, आकाश सावंत, भाजपचे राहुल मदने, भाजपा युवा मोर्चा पश्चिम विभाग प्रमुख शिवराज पुकळे, तुषार लवटे, प्रमोद भैस, संतोष शेंडगे, मेजर गलांडे, मयूर भैस, अंकुश भैस, गणेश पाटील, रामभाऊ गोरड, संजय पाटील, पूनम भैस, अर्जुन सुळे, राहुल भैस, तसेच राजेंद्र मोहिते उपस्थित होते. राम सातपुते यांनी महालक्ष्मी देवीचे दर्शन घेतले. या ठिकाणी भाविक भक्तांना



> **पिलीवला दत्तक घेतो... विकास करतो**
>
> यावेळी माजी रामभाऊ सातपुते यांनी पिलीव गावाला आमदार असताना प्रचंड निधी मंजूर केला आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणूक पूर्ण ताकदीने लढा व भारतीय जनता पार्टीची सत्ता आणा. पिलीवचा प्रचंड विकास करतो. गावच दत्तक घेतो असे जाहीरपणे सांगितले.

सर्व सोयीसुविधा पुरविण्यासाठी कटिबद्ध असून निधी कमी पडू देणार नसल्याचे सांगितले. पत्रकार दिनानिमित्त पिलीव येथील सर्व पत्रकारांचा सत्कार केला. यावेळी पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड, बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी, काळम वाडी भागातील अनेक मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते. प्रमोद भैस यांनी आभार मानले.



## अक्कलकोटच्या शहाजी प्रशालेत पोलीस रेझिंग डे साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ जानेवारी-**

पोलिसांबद्दल भीती बाळगू नका. पोलीस तुमच्यासाठी आहेत. विद्यार्थ्यांमध्ये पोलिसांबद्दल भीती नाहीशी करून पोलीस आणि समाज यांच्यातील नाते दृढ करण्यासाठी श्री शहाजी प्रशालेमध्ये पोलीस रेझिंग डेचे आयोजन केल्याची माहिती पोलिस उपनिरीक्षक सूर्यकांत बिराजदार यांनी दिला.

अक्कलकोट येथील मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूल येथे पोलिस दलाचा रेझिंग डे साजरा करण्यात आला. त्यावेळी पोलिस उपनिरीक्षक सूर्यकांत बिराजदार बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रशालेचा माजी विद्यार्थी पोलीस शिपाई प्रमोद शिंपाळे यांनी त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना शस्त्राची माहिती दिली. अक्कलकोट शहरातील,पोलीस कॉन्स्टेबल लिंगराज स्वामी, महिला पोलीस कर्मचारी ज्योती गाजरे होते. पर्यवेक्षक आर. एस.पडवळकर, सांस्कृतिक विभागप्रमुख वाय.पी.कबाडे, एन सी सी सेकंड ऑफिसर एस.एस. जवळकोटे, क्रीडाशिक्षक आर. एम. इंगळे आदी उपस्थित होते.

दि. २ ते ८ जानेवारीदरम्यान महाराष्ट्र पोलिस दलाचा रेझिंग डे साजरा करण्यात येत आहे. मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेत अक्कलकोट शहरातील पोलिस दलातील पीएसआय, व इतर अधिकाऱ्यांना बोलवून रेझिंग डे साजरा करण्यात आला. रेझिंग डेच्या निमित्ताने प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना पोलिस दलातील विविध शस्त्रांविषयी माहिती दिली. पोलिस आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये शस्त्र प्रदर्शन विविध स्पर्धा सायबर गुन्ह्यांची माहिती विद्यार्थ्यांची पोलिस भेट इत्यादी उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांना असलेली पोलिसांची भीती नाहीशी करण्यासाठी शाळेमध्ये रेझिंग डे साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना सेल्फ लोडिंग रायफल गनची माहिती दिली. पोलिस शिपाई व प्रशालेचा माजी विद्यार्थी प्रमोद शिंपाळे यांनी आपण ज्या प्रशालेत शिकलो येथे पोलिस म्हणून मार्गदर्शन करताना आनंद वाटला असे सांगितले. सूत्रसंचालन वाय.पी. कबाडे यांनी केले तर आभार अरविंद शिंदे यांनी मानले.

# शरद पवार गटाचे ७ खासदार फोडण्याचे तटकरे यांचे प्रयत्न?

## बाप-लेकीशिवाय सत्तेत येण्याची ऑफर खासदारांनी धुडकवल्याचा दावा

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई दि.८ जानेवारी :**

राज्यात महायुतीत महत्वाचा घटक पक्ष बनल्यानंतर आता दिल्लीतील राजकरणात आपले स्थान भक्कम करण्यासाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून पडद्यामागे मोठया हालचाली सुरु झाल्या आहेत. त्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून शरद पवार गटाच्या ७ खासदारांना गळाला लावण्याचे प्रयत्न सुरु आहेत . शरद पवार व सुप्रिया सुळे राहु दे, तुम्हीं आमच्यासोबत सत्तेत या, अशी ऑफर अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी आमच्या ७ खासदारांना फोन करुन दिली होती मात्र त्यांनी ती धुडकावून लावली, असा खळबळजनक गौप्यस्फोट शरद पवार गटाचे नेते आ. जितेंद्र आव्हाड यांनी बुधवारी केला.



ठाण्यात पत्रकार परिषद घेऊन त्यांनी हा दावा केला असून त्याला कृपया सुळे व संजय राऊत यांनीही दुजोरा दिला. तर तटकरे यांनी भेटीगाठी होत असतात पण आपण कोणालाही ऑफर दिल्याचे त्यांनी अमान्य केले. आव्हाड म्हणाले,' एका बाजुला शरद पवार व अजित पवार एकत्र येणार आहेत, अशा चर्चा सुरु आहेत. मात्र, तसे असते तर सुनील तटकरे यांनी आमच्या खासदारांना त्यांच्याकडे येण्याची ऑफर दिली नसती. दोन्ही गट एकत्र येण्याची चर्चा सुरु असती तर तटकरे यांना ते माहिती असते. परंतु, ते आमच्या खासदारांना सांगत आहेत की, 'बापाला आणि मुलीला राहू दे बाजूला, तुम्ही आमच्याकडे या', तटकरे यांना शरद पवार आणि अजित पवार एकत्र आलेले नको आहेत. आम्हालाही त्यांच्यासोबत जायचे नाही. तुम्ही आमचा पक्ष आणि निशाणी नेली, आता आमचे खासदारही नेत आहात. सुनील तटकरे यांनी आमच्या खासदारांना फोन केले पण त्यांची ऑफर धुडकावण्यात आली. सगळ्यांनीच तुमच्याप्रमाणे कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळलेले नसते. अशी टीका करून ते म्हणाले, ' हा सगळा प्रकार राष्ट्रीय राजकारणात नितीश कुमार यांना धाकात ठेवण्यासाठी केला जात आहे. भाजपकडून नितीश कुमार यांना 'देखो वो आ रहा है', 'उद्धव ठाकरे आ रहे है', 'शरद पवार आ रहे है', असे सांगितले जात आहे. आगामी बिहार विधानसभेच्या निवडणुकीसाठी हा डाव खेळला जात आहे.

### कुणी कुठे भेटलं हे योग्य वेळी सांगेन : तटकरे

केवळ चर्चेत राहण्यासाठी असे आरोप करण्यात येत आहे, अशी प्रतिक्रिया खा.सुनील तटकरे यांनी दिली . ते म्हणाले,' सोनिया दुहान या काही आमच्या पक्षात नाहीत. त्यांना आमच्याकडून कोणतेही अधिकार दिलेले नाहीत. सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यामध्ये काय चर्चा झाली याबद्दल मला काही माहिती नाही. पण कुणी, कुठे, काय बोललंय याची माहिती मी योग्य वेळी देईन. २०१४ ते २०२४ पर्यंत राष्ट्रवादीने भाजपसोबत जाण्यासाठी काय प्रयत्न केले गेले हे योग्य वेळी सांगेन असंही त्यांनी सांगितले.

### सुप्रियांचा प्रफुल पटेलांना नाराजीचा फोन

सुनील तटकरे यांनी सात खासदारांना संपर्क केल्याची माहिती समजल्यानंतर पक्षाच्या कार्याध्यक्षा खा. सुप्रिया सुळे यांनी प्रफुल पटेल यांना फोन करत याबाबत नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे, तटकरेंनी सात खासदारांची स्वतंत्रपणे भेट घेऊन त्यांना पक्षात येण्याची ऑफर दिली. त्याचबरोबर यांची बाहेर वाच्यता करु नका असेही सांगितले. मात्र या खासदारांनी ही गोष्ट त्यानंतर सुप्रिया सुळेंना सांगितली. त्यानंतर सुप्रिया यांनी प्रफुल पटेल यांना फोन करुन तटकरेंबद्दल नाराजी व्यक्त केली. पुन्हा तुम्ही आमचा पक्ष फोडण्याचा प्रयत्न करत आहात ? थोडी तरी नैतिकता बाळगा, अशा शब्दात संताप व्यक्त केला असल्याचे समजते.

# बेभान व्यवस्थेवर पत्रकारांचे अंकुश : मल्लिनाथ मुस्तारे

## श्रीमंत मानाचा कसबा गणपती प्रतिष्ठानतर्फे आदर्श पत्रकार पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

सध्या सर्वच व्यवस्था ढिसाळ बनल्या आहेत. मनमानी वाढली आहे. भ्रष्टाचाराने डोंगर पोखरुन काढला आहे. सर्वत्र अराजकता माजण्याची स्थिती निर्माण होऊ पाहत आहे. या सगळ्या व्यवस्थेवर आपल्या लेखणीच्या माध्यमातून अंकुश ठेवण्याचे काम पत्रकार करत असल्याने बेभान झालेली व्यवस्था ठिकाणावर असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष मल्लिनाथ मुस्तारे यांनी केले.

बाळीवेस येथील मानाचा कसबा गणपती ट्रस्टतर्फे पत्रकार दिनानिमित्त आदर्श पत्रकार पुरस्काराचे वितरण करण्यात आले, यावेळी ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. यावेळी ट्रस्ट अध्यक्ष सोमनाथ भोगडे, उपाध्यक्ष प्रकाश वाले, सहसचिव शिवशंकर कोळकुर, खजिनदार केदार मेंगाणे, विश्वस्त शिवानंद बुगडे, रामचंद्र जोशी,



सुधीर थोबडे, रेवणसिद्ध आवजे, बिपीन धुम्मा, उत्सव अध्यक्ष गुरुशांत मोकाशी, उपाध्यक्ष जितेंद्र लाड, उपाध्यक्ष शिवलिंग माळगे, बसवराज दर्गोपाटील, योगीराज भोगडे, चिदानंद मुस्तारे, पुष्कराज मैत्री, आनंद मुस्तारे, जीवन जोशी, प्रमोद मोकाशी, सूरज गुंगे, केदार बुगडे, सूर्यकांत सातभाई, महादेव नागशेट्टी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार अरुण बारस्कर, संजय जाधव, दै. 'तरुण भारत'चे मुख्य वरिष्ठ उपसंपादक जगन्नाथ हुक्केरी, प्रमिला चोरगी, अश्विनी तडवळकर, नागराज बगले, संगमेश्वर जेऊरे, रविकांत बगले, प्रशांत कटारे, नितीन पात्रे, शेखर गोतसुर्वे, मनोज भालेराव, रोहित ईटगी यांना आदर्श पत्रकार तर आदर्श फोटोग्राफर म्हणून चेतन लिगाडे, चंदन पाच्छापुरे, महेश विश्वनाथ, शुभम राजमाने यांचा गौरव करण्यात आला, स्मृतिचिन्ह, शाल, बुके असे पुरस्काराचे स्वरुप होते. सूत्रसंचालन उत्सव सचिव योगेश इंडी यांनी केले, तर आभार उत्सव अध्यक्ष गुरुशांत मोकाशी यांनी मानले.

# सलग तिसऱ्या दिवशीही तलाठ्यांचे कामबंद आंदोलन

## संघटना मागण्यांवर ठाम तर जिल्हा प्रशासनाकडून काम चालू करण्याचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

जिल्ह्यातील तलाठी भाऊसाहेबांनी वारंवार मागणी करूनही त्यांच्या विविध मागण्यांची पूर्तता होत नसल्याने जिल्ह्यातील तलाठी बांधवांनी सोमवारपासून कामबंद आंदोलन सुरू केले असून, बुधवार, दि. ८ रोजीही हे कामबंद आंदोलन सुरूच होते.

यामुळे शेतकरी बांधव व इतर नागरिकांच्या कामाचा खोळंबा होत आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाकडून तलाठी बांधवांच्या प्रतिनिधींना एका पत्राद्वारे बैठकीला बोलावले असून, मागण्यांबाबत चर्चा करून त्याचे निराकरण करण्याची ग्वाही दिली आहे. मात्र आमच्या मागण्यांना आता न्यायच पाहिजे; चर्चा नको अशी भूमिका संघटनेने घेतल्याची माहिती सोलापूर तलाठी संघाचे सरचिटणीस पांडुरंग हिप्परकर यांनी दिली.

जिल्ह्यातील तलाठी बांधवांच्या मागण्यांमध्ये प्रलंबित कालबद्ध पदोन्नतीचे प्रस्ताव, प्रलंबित विभागीय चौकशी, प्रलंबित स्थायी प्रमाणपत्र प्रस्ताव, प्रलंबित वैद्यकीय बिले, अतिरिक्त कार्यभार वेतन, सेवापुस्तके अद्ययावत करणे, मासिक वेतन वेळेवर न होणे, नवीन लॅपटॉप व स्कॅनरसह प्रिंटर, ग्राम महसूल अधिकारी सेवाजेष्ठता यादी, लोकसभा निवडणूक अतिकालिक भत्ता, इ. आदी अत्यावश्यक मागण्यांचा समावेश आहे.

### पत्राद्वारे जिल्हा प्रशासनाचे उत्तर

जिल्हा प्रशासनास तलाठी संघटनेचे निवेदन दिल्यावर आरडीसी कुंभार यांनी एका पत्राद्वारे त्यांच्या मागण्यांचा ऊहापोह केला आहे. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, लोकसभा निवडणुकीचा अतिकालीक भत्ता देण्याचे काम प्रत्येक तहसील कार्यालयातील निवडणूक शाखेकडे सुरू आहे. लॅपटॉप, प्रिंटर खरेदी निवीदा २ जानेवारीस काढली असून, सदर निवीदेची कार्यकाही पूर्ण होताच सर्व तलाठ्यांना लॅपटॉप आणि प्रिंटर मिळतील. याच धर्तीवर सज्जाचे दप्तर फोडणीची कार्यवाही तालुकास्तरावर सुरू आहे, नवीन ग्राम महसूल अधिकारी पदभरती करून त्यांचे वेतन, भत्ते सुरू करण्यात आल्याचे या पत्रान्वये सांगितले. इतरही प्रश्नांवर तलाठी संघटनेने बसून तोडगा काढावा आणि सर्वांनी कामबंद आंदोलन थांबवावे, असे निर्देश दिले आहेत.

## महत्त्वाचे

### जागतिक शांतीसाठी दहशतवाद आव्हान : एस. जयशंकर

**नवी दिल्ली** : दहशतवाद, कट्टरतावाद आणि फुटीरतावाद यांच्याविरोधात एकत्र लढा देणे काळाची गरज आहे. दहशतवाद जागतिक शांततेसाठी मोठे आव्हान असून, त्यांचे प्रायोजक आणि आर्थिक मदत करणाऱ्यांची नाकेबंदी करायला हवी, असे भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर एका इंग्रजी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. दहशतवाद केवळ एका देशापुरता मर्यादित नसून, जगातील सर्वच देशांना त्याची झळ पोहोचत आहे. पाकिस्तानचा अप्रत्यक्ष उल्लेख करताना जयशंकर म्हणाले, काही देश दहशतवाद्यांना प्रोत्साहन देतात, आर्थिक मदत करतात, अशा देशांवर कठोर कारवाई करायला हवी. त्यांची सर्वच स्तरावर नाकेबंदी करायला हवी. यासाठी सर्वसमावेशक दृष्टीकोनाची आवश्यकता आहे. दहशतवाद्यांना चालना देणारेच नव्हे, तर त्यांच्या सूत्रधारांवर संयुक्त कारवाई व्हायला हवी. सर्व देशांनी एकत्र येऊन दहशतवाद्यांविरोधात सामूहिक कारवाई केल्यास त्यांचे अस्तित्वात संपुष्टात येऊ शकते. मागीलवर्षी शंघाय संयुक्त संघटनेच्या शिखर परिषदेत दहशतवाद्यांविरोधात कारवाई करण्यासाठी प्रादेशिक दहशतवाविरोधी संघटनेची स्थापना करण्यावर चर्चा झाली, हे भारताचे यश आहे. कजाकिस्तान येथे होणाऱ्या आगामी शिखर परिषदेत यावर चर्चा करण्यासाठी भारत पुढाकार घेणार असल्याचे जयशंकर यांनी सांगितले.

### बॅगवरील जीपीएस चिपमुळे दोन चोर जाळ्यात

**मुंबई** : दागिन्यांच्या बॅगला लावलेल्या जीपीएस ट्रॅकिंग चिप आणि सीसीटीव्ही फुटेजमुळे दक्षिण मुंबईतील रुग्णालयाजवळ गोळीबार आणि लुटमारीच्या घटनेशी संबंधित दोघांना अटक करण्यात पोलिसांना मदत झाली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ही घटना सोमवारी रात्री घडली. एक व्यक्ती आणि त्याचा पुतण्या ४२.२७ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने असलेली बॅग घेऊन दुचाकीवरून जात होते. चार जणांनी गोळीबार करीत त्यांना लुटले. गोळीबारात पुतण्या जखमी झाला. पळवलेल्या बॅगवर जीपीएस चिप असल्याने त्यांचा माग काढण्यात यश आले. पोलिसांनी आरोपींकडून १६.५० लाख रुपयांचे दागिने जप्त केले.

### गुजरातमधील अपघातात तीन ठार, चार जखमी

**भडुच** : गुजरातच्या भडुच जिल्ह्यात बुधवारी पहाटे एका महामार्गावर कार एका ट्रकला धडकल्याने तीन जण ठार झाले आणि चार जण जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही घटना मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अंकलेश्वर शहराजवळ पहाटे घडली. महाराष्ट्रातील पालघरमधील सात जण अजमेर येथून सुरतच्या दिशेने जाताना हा अपघात झाला, असे पानोली पोलिस ठाण्याच्या निरीक्षक शिल्पा देसाई यांनी सांगितले. पानोलीजवळील पुलावर मागून ट्रकने कारला प्रथम धडक दिली.

### मुकुंद रत्नाकर यांचे निधन

**अकोला** : जुने शहर येथील रहिवासी, रा. स्व. संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक, न्यू इंग्लिश हायस्कूलचे निवृत्त शिक्षक मुकुंद रंगनाथ रत्नाकर यांचे बुधवारी निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्यावर गुलजारपुरास्थित स्मशानभूमीत अन्त्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, सून अर्चना, विवाहित मुली ॲड. मनीषा, संपदा, स्वाती, जावई असा आप्तपरिवार आहे.



### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७८,१४८.४९ (-५०.६२) |
| निफ्टी | २३,६८८.९५ (-१८.९५) |

### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७८,८२० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | ९२,५०० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.२ | १५.५ |
| अमरावती | २८.० | ९.८ |
| भंडारा | २५.६ | ११.४ |
| बुलडाणा | २६.१ | ९.८ |
| चंद्रपूर | २८.० | -.- |
| गडचिरोली | २८.० | ११.० |
| गोंदिया | २५.२ | ९.४ |
| नागपूर | २७.४ | १०.२ |
| वर्धा | २७.१ | ११.० |
| वाशीम | २६.० | १३.६ |
| यवतमाळ | २७.६ | ९.० |

# श्री सिद्धरामेश्वर यात्रेनिमित्त वाहतूक मार्गात बदल

## पोलिस आयुक्तांचे आदेश; १२ ते १६ जानेवारीपर्यंत आदेश लागू

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. ८ जानेवारी -

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांच्या यात्रेनिमित्त नंदीध्वजांची मिरवणूक काढली जाते. यात्रेसाठी चार ते पाच लाख भाविक येतात. त्यामुळे वाहतुकीचा अडथळा होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर १२ ते १६ जानेवारीपर्यंत शहरातील सहा मार्गावरील वाहतुकीत बदल करून त्या मार्गावरील वाहनांसाठी - पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांनी त्यासंबंधीचे आदेश काढले आहेत. यात्रेच्या निमित्ताने विजापूर वेस ते पंचकट्टा, लक्ष्मी मार्केट ते पंचकट्टा, भारतीय स्टेट बँक ट्रेझरी शाखा (पूजा ऑफिस स्टेशनरी दुकान) ते पंचकट्टा, भारतीय स्टेट बँक ट्रेझरी शाखा ते पंचकट्टा, पार्क चौक ते मार्केट चौकी आणि ज्ञानप्रबोधिनी प्रशाला ते डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह हे मार्ग १२ ते १६ जानेवारीपर्यंत सार्वजनिक वाहतुकीसाठी बंद ठेवले जाणार आहेत. त्या वाहनांसाठी विजापूर वेस ते बेगमपेठ पोलिस चौकीमागून मार्ग उपलब्ध असणार आहे. पूनम चौक रंगभवन चौक सात रस्ता जुना एम्प्लॉयमेंट चौक डफरीन चौक ते पार्क चौक असा मार्ग देखील त्या मार्गावरील वाहनांसाठी उपलब्ध असणार आहे. दुसरीकडे, श्री सिद्धरामेश्वर मंदिर, श्री मल्लिकार्जुन मंदिर, संमती कट्टा परिसर व होम मैदान या ठिकाणी धार्मिक कार्यक्रम होतात. श्री रेवणसिद्धेश्वर मंदिरातही भाविकांची मोठी गर्दी असते. या पार्श्वभूमीवर हा सर्व परिसर नो पार्किंग झोन म्हणून घोषित करण्यात आला आहे.

### नंदीध्वज मिरवणूक मार्गही नो पार्किंग झोन

१२ ते १६ जानेवारी या काळात शहरातील विविध मार्गांवरून नंदीध्वज मिरवणूक काढली जाते. हिरेहब्बू मठ, बाबा कादरी मशीद, डॉ. चिडगुपकर यांचे घर, श्री. केळकर वकिलांचे घर, दाते यांचे श्री गणपती मंदिर, हाजीमाई चौक, खाटीक मशीद, कसबा चौक, माणिक चौक, विजापूर वेस, वडतिले यांचे दुकान, घिसाड गल्ली, पंचकट्टा, रिपन हॉल व तेथून श्री सिद्धरामेश्वर मंदिर (संमती कट्टा), डफरीन चौक, रेल्वे स्टेशन, भय्या चौक, नवीवेस पोलिस चौकी, छत्रपती शिवाजी महाराज चौक एसटी स्टँड, सम्राट चौक, बाळीवेस, चाटी गल्लीपर्यंत तसेच नंदीध्वज ६८ लिंग प्रदक्षिणा मार्ग या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना नंदीध्वज मिरवणुकीवेळी प्रवेशबंदी असणार आहे.

# भाजपाच्या सदस्य नोंदणी अभियानात सोलापूर शहरात ३८ हजार सदस्य नोंदणी

## आ. कोठेंच्या मतदारसंघात सर्वाधिक नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०८ जानेवारी-**

राज्यातील भाजपच्या सदस्य नोंदणी अभियानात काही आमदारांची कामगिरी अव्वल तर काही तळाशी गेल्याची आकडेवारी आहे. सोलापुरात हे अभियान जोरात सुरू असून, अवघ्या आठवडाभरात सोलापूरच्या तीन मतदार संघातून ३७ हजार ९६७ सदस्य नोंदणी झाली आहे. यामध्ये शहर मध्य मतदारसंघातील नूतन आमदार देवेंद्र कोठेंचा आलेख मोठा असून, त्यांच्या मतदारसंघात आजतागायत १८ हजार ५८२ जणांची सदस्य नोंदणी केली आहे. १ ते १५ जानेवारी दरम्यान हे अभियान चालणार आहे. ५ जानेवारीस विशेष अभियान राबविण्यात आले. त्यात मंत्री, खासदार, आमदार यांनाही स्वतः सहभागी होत नोंदणीत पुढाकार घेणे अपेक्षित होते. गतवेळी सदस्य नोंदणीच्या आधारे भाजप हा जगातील सर्वात मोठा पक्ष असल्याचा दावा करण्यात आला होता. आताही त्याच दिशेने वाटचाल सुरू आहे. प्रत्येक बुथनिहाय २०० सदस्य करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले. राज्यात सध्या भाजपचे एक कोटी सदस्य आहेत. यावेळी २ कोटी सदस्य करण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे. भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. लोकशाही पद्धतीने येथे नेत्यांची निवड केली जाते. या नोंदणीत आमदारांनी लक्ष घालावे, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. त्यादृष्टीने शहरातील ३ आमदारांनी आपापल्या मतदारसंघातील कार्यकर्ते-पदाधिकारी यांना सोबत घेत ३८ हजार सदस्य नोंदणी केली आहे. राज्याचे प्रभारी रवींद्र चव्हाण हे राज्यातील नोंदणीचा दैनंदिन आढावा घेत आहेत.



### शहरातील तीनही आमदार सक्रीय

'संघटन पर्व सदस्यत्व' या अभियानास १ जानेवारीपासून सुरूवात झाली आहे. १० तारखेला बुथनिहाय २५० सदस्य वाढविण्याची विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. हे अभियान राबविताना शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक आमदारही सक्रीय झाले आहेत. यामुळेच शहर उत्तरमध्ये १० हजार ०२०, शहर दक्षिण ९ हजार ३६५ आणि शहर मध्य मतदारसंघात १८ हजार ५८२ इतकी सदस्य नोंदणी झाली आहे. तर सोलापूर शहरातून ३७ हजार ९६७ इतकी नोंदणी झाली आहे. आम्ही दिलेले टार्गेट पूर्ण करणार आहोत.

**- पांडुरंग दिड्डी,**
**शहर सरचिटणीस, सोलापूर**

# पंकजा-धनंजय मुंडेंनी कोट्यावधीची जमीन हडपली

**मुंबई, दि.८ जानेवारी :**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात सर्व पक्षाचा नेत्यांकडून होत असलेल्या आरोपामुळे अडचणीत आलेल्या मंत्री धनंजय मुंडे यांचा पाय पुन्हा गोत्यात जाण्याची शक्यता आहे. त्यांने व पंकजा मुंडे यांनी आपली कोट्यावधीची जमीन धमकी देऊन हडपल्याचा आरोप मुंडे भावंडांच्या जवळच्या नातेवाईक सारंगी महाजन यांनी केला. वाल्मिक कराड आणि त्यांच्या साथीदारांनी ही जमीन बळकावल्याचा आरोप त्यांनी केला. याबाबत बुधवारी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची स्वतंत्रपणे भेट घेऊन आपले गाऱ्हाणे मांडले. महत्त्वाचं म्हणजे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होण्यापूर्वी सुमारे एक महिन्यापुर्वी त्यांनी आरोप केला होता. आता धनंजय मुंडे यांच्यावर चोहोबाजूंनी टीका होत असताना सारंगी महाजन यांनी पुन्हा हा विषय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या समोर मांडला आहे. पवार यांची दुपारी मंत्रालयात तर फडणवीस यांची संध्याकाळी सह्याद्री अतिथीगृहात भेट झाली.

# अधिकारी बदलला तरी नागरिकांना थेट मागता येईल मोबाईल नंबरवरुन मदत

## आता ग्रामीण पोलिस दलातील अधिकाऱ्यांना पर्मनंट मोबाईल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी -**

महिला, तरुण-तरुणींसह प्रत्येक घटकाला पोलिस ठाण्याशी संपर्क साधल्यावर काहीवेळात मदत मिळावी, यासाठी आता जिल्ह्यातील २५ पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलिस ठाण्यांमधील महिला शाखा, निर्भया पथकास शासकीय मोबाईल दिले जाणार आहेत. त्यामुळे अधिकारी बदलला, तरी नागरिकांना त्याच मोबाईल क्रमांकावरुन मदत मिळविता येणार आहे.

पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील सामान्य नागरिक त्यांच्या तक्रार व मदतीसाठी संबंधित पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधत असतात. पण, ठरावीक कालावधीनंतर पोलिस अधिकाऱ्यांची बदली झाल्यावर त्यांच्याकडील मोबाईल क्रमांक त्यांच्यासोबत जातो. त्यामुळे सामान्यांना अधिकाऱ्यांशी संपर्क करायला अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर यांनी शासकीय मोबाईल खरेदी करुन त्यात कायमचा क्रमांक घालून पोलिस ठाण्यात ठेवले जाणार आहेत. त्यामुळे अधिकारी बदलला, तरी क्रमांक तोच राहणार असल्याने नागरिकांना अधिकाऱ्यांशी संपर्क करायला सोयीचे होणार आहे.



पोलिस अधीक्षक (९१११२२६३१०), अपर पोलिस अधीक्षक (९१११२२६३११), अक्कलकोट पोलिस उपअधीक्षक (९१११२२६३१२), अक्कलकोट उत्तर पोलिस निरीक्षक (९१११२२६३१४), अक्कलकोट दक्षिण पोलिस निरीक्षक (९१११२२६३१६), वळसंग सहायक पोलिस निरीक्षक (९१११२२६३१७), सोलापूर ग्रामीण पोलिस उपअधीक्षक (९१११२२६३१८), सोलापूर तालुका पोलिस निरीक्षक (९१११२२६३२०), मंद्रुप सहायक पोलिस निरीक्षक (९१११२२६३२१), कामती सहायक पोलिस निरीक्षक (९१११२२६३२२), मोहोळ पोलिस निरीक्षक (९१११२२६३२३), बार्शी पोलिस उपअधीक्षक (९१११२२६३२४), पोलिस निरीक्षक बार्शी शहर (९१११२२६३२५), बार्शी तालुका सहायक पोलिस निरीक्षक (९१११२२५३२४), वैराग पोलिस निरीक्षक (९१११२२६३२७), पांगरी सहायक पोलिस निरीक्षक (९१११२२६३२८), माढा सहायक पोलिस निरीक्षक (९१११२२६३२९), करमाळा पोलिस उपअधीक्षक (९१११२२६३२८), करमाळा पोलिस निरीक्षक (९१११२२६३३१), टेंभूर्णी पोलिस निरीक्षक (९१११२२६३३२), कुर्डुवाडी पोलिस निरीक्षक (९१११२२६३३४), अकलूज पोलिस उपअधीक्षक (९१११२२६३३५), अकलूज पोलिस निरीक्षक (९१११२२६३३६), माळशिरस पोलिस निरीक्षक (९१११२२६३३७), सहायक पोलिस निरीक्षक नातेपुते सहायक पोलिस निरीक्षक (९१११२२६३३८), वेळापूर सहायक पोलिस निरीक्षक (९१११२२६३३९), पंढरपूर पोलिस उपअधीक्षक (९१११२२६३४०), पंढरपूर शहर पोलिस निरीक्षक (९१११२२६३४१), पंढरपूर तालुका पोलिस निरीक्षक (९१११२२६३४२), पंढरपूर ग्रामीण पोलिस निरीक्षक (९१११२२६३४३), करकंब सहायक पोलिस निरीक्षक (९१११२२६३४४), मंगळवेढा पोलिस उपअधीक्षक (९१११२२६३४५), मंगळवेढा पोलिस निरीक्षक (९१११२२६३४६), सांगोला पोलिस निरीक्षक (९१११२२६३४७), गुन्हे शाखा (९१११२२६३५६), डीएसबी पोलिस निरीक्षक (९१११२२६३५७), ८:३८ , ८/१/२०२५ : सांगोला पोलिस निरीक्षक (९१११२२६३४७), गुन्हे शाखा (९१११२२६३५६), डीएसबी पोलिस निरीक्षक (९१११२२६३५७), निर्भया पथक, सोलापूर (९१११२२६३४८), अक्कलकोट निर्भया पथक (९१११२२६३४९), बार्शी निर्भया पथक (९१११२२६३५०), करमाळा निर्भया पथक (९१११२२६३५१), पंढरपूर निर्भया पथक (९१११२२६३५२), मंगळवेढा निर्भया पथक (९१११२२६३५३), अकलूज निर्भया पथक (९१११२२६३५४), महिला शाखा (९१११२२६३५५).

## अग्रलेख...

# केजरीवालांचा पराभव अटळ

दिल्ली विधानसभेच्या निवडणुका आणि मतमोजणीनंतर नव्या सरकारची स्थापना कधी होणार याची घोषणा करून, केंद्रीय निवडणूक आयोगाने आधीच तापलेल्या दिल्लीच्या वातावरणातील उष्मा अधिक वाढवला आहे. जाहीर केल्याप्रमाणे ७० सदस्यीय दिल्ली विधानसभेसाठी ५ फेब्रुवारीला मतदान आणि ८ तारखेला मतमोजणी होणार आहे. पण दिल्लीमध्ये महिनाभरापूर्वीच निवडणुकीचा माहोल तयार झालेला आहे. दिल्लीच्या राजकारणावरील अरविंद केजरीवाल यांचे गेल्या १० वर्षांचे एकछत्री साम्राज्य उलथवून टाकण्यासाठी यंदा भारतीय जनता पार्टी सर्व शक्तिनिशी मैदानात उतरली आहे. नाही म्हणायला काँग्रेस पक्षदेखील रिंगणात आहे. पण हा पक्ष दिल्लीत विधानसभेसाठी उमेदवार उभे करून, आम आदमी पक्षाविरोधात लढतो की निवडून येण्याची खात्री असलेल्या भाजपाशी वाद घालतो, हे बघावे लागणार आहे. गेली १० वर्षे आम आदमी पार्टीच्या अनेक मंत्र्यांनी केलेल्या भ्रष्टाचारामुळे दिल्लीची जनता बेजार झाली आहे. यातील काही मंत्री अजूनही कारागृहात असून, काही जणांची बेलवर सुटका झालेली आहे. दस्तुरखुद्द अरविंद केजरीवाल यांना भ्रष्टाचारामुळे कारागृहाची हवा खावी लागली. सध्या ते बेलवर असले तरी केंद्र सरकारवर विविध यंत्रणांच्या दुरुपयोगाचे आरोप करताना त्यांची जीभ थकताना दिसत नाही. अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून जन्म झालेल्या आम आदमी पक्षाने जसे अल्पावधीत यश मिळविले, त्याच गतीने या पक्षाची लोकप्रियताही वेगाने घसरली. पक्ष स्थापनेच्या वेळी राजकारणात प्रवेश करणार नाही, राजकारणात आलो तर श्रीमंती थाटात वावरणार नाही, मोठ्या बंगल्यात राहणार नाही, आलिशान चारचाकीने फिरणार नाही, भ्रष्टाचाराचे नामोनिशाण मिटवून टाकीन, अशा केलेल्या केजरीवालांच्या वल्गना केव्हा हवेत विरून गेल्या हे जनतेलाही कळले नाही. मुख्यमंत्री होताच त्यांच्या राहणीमानात फरक पडला. त्यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्यांवर एकापाठोपाठ एक आरोप होऊ लागले, शिशमहल या त्यांच्या कोट्यवधी खर्चून बांधलेल्या फाईव्ह स्टार बंगल्याचे प्रकरण पुढे आले. त्यांनी बंगल्याच्या लॅट्रिन, बाथरूमपासून दिवाणखान्याच्या सजावटीवर केलेला खर्च डोळे दीपवून गेला, त्यांच्या कार्यकाळात झालेला दारू घोटाळा गाजला, जाहिरातींवर त्यांच्या सरकारने केलेल्या खर्चाने तोंडात बोटं घालायला भाग पाडले. दिल्लीची अव्यवस्था करण्यात त्यांच्या सरकारने कुठलीही कसर सोडली नाही. राजधानीतील रस्त्यांची दुर्दशा त्यांच्या कार्यकाळात अनुभवायला आली. गुन्हेगारीत झालेली वाढ, पराली प्रकरण आम आदमी पक्षाच्या सरकारच्या काळातच पुढे आले. सत्तेवर असताना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा विक्रम केजरीवाल यांच्या नावे नोंदविला गेला. दिल्लीतील वाहतुकीचा उडालेला बोजवारा कुणामुळे, हा प्रश्न विचारल्यास एकच उत्तर पुढे येते. ज्या अपेक्षा केजरीवाल सरकारबाबत व्यक्त झाल्या, त्या पूर्ण करण्यात ते अपयशी ठरले. केंद्रीय मंत्र्यांवर आणि प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांवर निराधार, बिनबुडाचे आरोप करण्यात या सरकारने कुठलीच कसर सोडली नाही. आरोप करताना ज्या त्यांच्या पक्षाच्या नेत्यांची जीभ सैल झाली तसेच त्या आरोपांवरून गोत्यात सापडल्यानंतर अथवा कोर्टात खेचल्या गेल्यानंतर माफी मागण्याचे वैषम्य या पक्षाच्या कार्यकर्त्यांना कधी वाटले नाही. आता तर सत्तेत येण्याची हॅट्ट्रिक साधण्याचा या पक्षाचा प्रयत्न सुरू आहे. पण त्यांना दिल्लीतील जनता या आपदेला किती साथ देते हे पाहावे लागणार आहे.

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी ५ फेब्रुवारीला १ कोटी ५५ लाख मतदार मतदानाचा हक्क बजावतील. यापैकी ५८ जागा खुल्या प्रवर्गातल्या असून, १२ जागा अनुसूचित जातींसाठी राखीव आहेत. मतदारांमध्ये ८३.४९ लाख पुरुष, तर ७१.७४ लाख महिलांचा समावेश आहे. २५ लाख ८९ हजार तरुण मतदार असून, त्यातील २.०८ लाख नवमतदार आहेत. दिल्लीत २०१५ आणि २०२० च्या निवडणुकीत आम आदमी पक्षाने बाजी मारली होती. या दोन निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाने अनुक्रमे ६७ आणि ६२ जागांवर विजय मिळविला होता. तेव्हा भाजपाला केवळ अनुक्रमे ३ आणि ८ जागांवर समाधान मानावे लागले होते आणि काँग्रेस पक्षाचा भोपळाही फुटला नव्हता. काँग्रेसची कामगिरी गेल्या काही निवडणुकांपासून निराशाजनकच राहिली आहे. यंदाही या पक्षाच्या यशाबाबत जनता साशंक आहे. या पक्षाने प्यारी दीदीला दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन जाहीरनाम्यात दिले असले तरी आजच्या परिस्थितीत त्यांच्याकडे या आश्वानपूर्तीची जबाबदारी येणारच नाही, हे येरागबाळादेखील सांगू शकेल. गेली २५ वर्षे भारतीय जनता पक्ष दिल्लीच्या सत्तेपासून दूर आहे. अरविंद केजरीवाल यांच्यापूर्वी दिल्लीत काँग्रेसचे सरकार होते. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत सत्तेत येण्याचे भाजपाचे प्रयत्न आहेत. त्यांच्या या प्रयत्नात संघ परिवाराच्या ताकदीचा लाभ त्यांना मिळू शकेल. संघ परिवारातर्फे मतदारांकडे शतप्रतिशत मतदानाचा आग्रह धरताना, 'एक है तो सेफ है' तसेच 'बटेंगे तो कटेंगे' याची जाणीवही करून दिली जाणार आहे. हरयाणा आणि महाराष्ट्राच्या निवडणुकीत हा फॉर्म्युला काम करून गेला, हे देशाने अनुभवले आहे. ही बाब जशी भाजपासाठी फायद्याची ठरणार आहे, तिथेच त्यामुळे विरोधकांमध्ये चिंता उत्पन्न झाली आहे. संघाच्या या रणनीतीला उत्तर कसे द्यायचे, याची योजना अजून तरी आम आदमी पक्षाने आखल्याचे दिसत नाही. मुस्लिमांच्या मतांवर या पक्षाचा डोळा राहणार असला तरी यावेळी हिंदू मतदारांनाही भुरळ पाडण्याची तयारी या पक्षाने चालविली आहे. पुजाऱ्यांना महिन्याकाठी १८ हजारांची रेवडी देण्याची घोषणा, हा त्याच धोरणाचा भाग आहे. गेल्या निवडणुकीत पाणी, वीज बिल माफ करण्याच्या केलेल्या घोषणांनी हा पक्ष तरला. पण यंदा तीच बाब या पक्षाला विजयापर्यंत घेऊन जाईल, असे कुणीही म्हणण्यास कचरत आहे. उलटपक्षी केजरीवाल यांचा पराभव अटळ आहे, अशी परिस्थिती दिसत आहे.

भाजपाचा विजयरथ हरयाणापासून निघालेला आहे. त्याने महाराष्ट्र आणि हरयाणा काबीज केला आहे. केवळ घोषणाबाजी न करता या पक्षाने मतदारांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचा शब्द पाळला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकासाचा झंझावात जसा या राज्यातील मतदारांना भावला तसाच तो दिल्लीकरांनाही भावणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. येथील मतदार जसे देशाच्या सुरक्षिततेबाबत चिंतित आहेत, तसेच केंद्र सरकारच्या विभिन्न योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नसल्याबद्दलही त्यांची नाराजी आहे. आयुष्यमान भारत योजनेंतर्गत गरिबी रेषेखालील रुग्णांना ५ लाखांपर्यंतच्या मिळणाऱ्या उपचारांपासून दिल्लीकरांना वंचित राहावे लागत आहे. लोकांच्या सुरक्षेचे प्रश्न ऐरणीवर आहेत. दिल्लीतील एमसीडी ताब्यात येऊनदेखील दिल्लीकरांपुढील समस्यांचा पाढा कमी होण्याचे नाव नाही. नायब राज्यपाल आणि केंद्र सरकार यांच्याशी भांडण्यात केजरीवाल सरकारचा किती वेळ वाया गेला, याची मोजदादच नाही. तेवढा वेळ विकासाला दिला असता तर आज दिल्लीकर कुठल्या कुठे पोहोचले असते, हे सांगावे लागू नये. चांगले रस्ते, यमुनेची स्वच्छता आणि २४ तास शुद्ध पाण्याची केलेली घोषणा आम्ही पूर्ण करू शकलो नाही, हे केजरीवालांनीच मान्य केले आहे. दारूचे ठेके, विद्यार्थ्यांसाठी शाळा बांधकाम, गरिबांचा उपचार खर्च आणि सरकारी भरतीत घोटाळे झालेले आहेत. दिल्लीत इंडिया आघाडीत फूट पडली आहे. काँग्रेस नेते अजय माकन यांनी तर केजरीवाल यांचे कोणतेच धोरण नसून, ते राष्ट्रद्रोही असल्याचा आरोप केला आहे. दुसरीकडे आम आदमी पार्टीने काँग्रेस नेत्यांवर निवडणुकीसाठी भाजपाकडून पैसा घेतल्याचा आरोप केला आहे. लोकसभेतील सख्खे शेजारी आज एकमेकांपुढे उभे ठाकले असताना, भाजपाचे आव्हान कसे स्वीकारतात, हे बघावे लागणार आहे. दिल्लीतील समस्यांकडे बघता, आम आदमी पार्टीची राजवट दिल्लीकरांसाठी 'आप'दाच ठरलेली आहे. भ्रष्टाचारात गुरफटलेली ही आपदा कशी दूर करायची याची योजना आखली जात असताना शिशमहल बांधणारे, दिल्लीकरांपुढे प्यारी दीदीचे जाळे टाकणारे पुढारी हवेत की गरिबांना मोफत घरे देणारा पक्ष हवा, हे मतदारांना ठरवायचे आहे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# गुणात्मक वाढ म्हणजेच पंच परिवर्तन

जगातील सगळ्यात मोठी संघटना म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ येणाऱ्या विजयादशमीला १०० वर्षे पूर्ण करणार आहे. काही अपवादात्मक व्यावसायिक संघटना सोडल्यास १०० वर्षे एका ध्येयाने प्रेरित होऊन सातत्याने कार्यरत असणारी सामाजिक सांस्कृतिक संस्था आज तरी जगात दुसरी नाही. १९२५ मध्ये विजयादशमीला पहिले पाच स्वयंसेवक बरोबर घेऊन डॉ. हेडगेवारांनी रुजवलेल्या या संघटनेचे आता एका प्रचंड मोठ्या वृक्षामध्ये रूपांतर झालेले दिसते आहे. या १०० वर्षांच्या काळात संघावर अनेक आघात झाले. ते सगळे आघात-आरोप झेलत संघ आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करीत राहिला. हिंदू समाजाचे संघटन करताना संघाने काळानुरूप बदल स्वीकारले. १०० वर्षे पूर्ण करणाऱ्या या हिंदूंच्या संघटनेने शताब्दी वर्षानिमित्त पंच परिवर्तनाची हाक दिलेली आहे.

समाजात कार्य करताना कोणतीही संघटना वा व्यक्ती त्याच समाजाच्या संपर्कातून प्रभावित होत असते. त्याच वेळी ते संघटन वा व्यक्ती समाजाला प्रभावित करीतच असते. सद्य:काळात हिंदू समाजाला जर कोणत्या एका विचाराने सर्वाधिक प्रभावित केले असेल तर तो निःसंशयपणे संघ विचार होय. तसेच आज हिंदू समाजाला सर्वाधिक प्रभावित करणारे संघटन म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघच होय, हे संघाचे टीकाकारही मान्य करतील. समाज संघटनाचे कार्य हे निरंतर चालणारे कार्य आहे, याची संघाला प्रथमपासूनच चांगली जाणीव आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत सामाजिक विघटनाला कारणीभूत ठरणारे विविध आयाम लक्षात घेत संघाने पंच परिवर्तनाची हाक दिलेली आहे. स्वदेशी, कुटुंब प्रबोधन, नागरी कर्तव्यांचे पालन, सामाजिक समरसता आणि पर्यावरण संरक्षण हे ते पाच आयाम आहेत. जगात विविध प्रदेशांत तेथील हवामान, वातावरण, वैचारिक स्वातंत्र्य आणि प्रगल्भता, जीवनाप्रति सर्वसामान्य लोकांना असणारी आस्था आणि स्थापित व्यवस्थेनुसार विविध संस्कृती आकाराला आल्या. या देशात एक सर्वसमावेशक, उदार, सहिष्णू आणि निसर्गाभिमुख जीवनदायी अशी संस्कृती अस्तित्वात आली. काळानुसार त्यात काही बदल झाले; मूळ तत्त्व मात्र कायम राहिले. त्यातच युरोप आणि मध्यपूर्वेतून झालेले आक्रमण हे धार्मिक, सांस्कृतिक तसेच आर्थिक आक्रमणदेखील होते. त्याचा परिणाम म्हणजे येथील लोकांच्या जीवनविषयक श्रद्धांची प्रचंड मोठ्या प्रमाणावर मोडतोड होण्यात झाली. येथील संस्कृतीने निर्माण केलेली निसर्गाभिमुख, उदार जीवनदृष्टी उद्ध्वस्त होण्याचा धोका निर्माण झाला. आज जेव्हा विविध कारणांनी जग अधिकाधिक जवळ येते आहे तेव्हा हा धोका सर्वोच्च पातळीवर पोहोचलेला दिसतो. त्यामुळे आज समाजातील प्रत्येक व्यक्तीला 'स्व'चे भान असणे आवश्यक झाले आहे. 'स्व'चे भान याचा अर्थ या मातीत तयार झालेले विचार, जीवनदृष्टी, संसाधनांचा सदुपयोग, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, विचारशीलता, माणूस म्हणून व्यवहार समजणे आणि व्यक्ती तथा समाजाने तसे जीवन अंगीकारणे होय.

पंच परिवर्तनातील दुसरा मुद्दा हा कुटुंब प्रबोधनाचा होय. व्यक्ती-व्यक्ती मिळून समाज तयार होतो. समाज एकसंध राहण्यासाठी आवश्यक असलेली सामाजिक संस्था म्हणजे कुटुंब व्यवस्था होय. कोणत्याही समाजाला एकत्र ठेवण्यात कुटुंब व्यवस्था मोठे योगदान देते. पण आज या कुटुंब व्यवस्थेलाच सुरुंग लागलेला दिसतो आहे. तीन पिढ्यांनी एकत्र राहणे एवढा मर्यादित विचार कुटुंब व्यवस्थेत असत नाही तर संस्कार संक्रमित करणारी किंवा संस्कारांची सुदृढ जोपासना करणारी व्यवस्था म्हणजे कुटुंब होय. सदस्यामध्ये संवाद हे कुटुंबात अभिप्रेत असलेले वैशिष्ट्य होय. दुर्दैवाने आज एकमेकांबरोबर वेळ घालवणे, संवाद साधणे, एकमेकांना समजून घेणे तसेच सदस्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आवश्यक तेवढे स्वातंत्र्य देणे, परस्परांविषयी आदर, हे कुटुंबातून घडताना दिसत नाही. स्वकेंद्रित विचार आणि कृती घडताना दिसत आहेत. कुटुंब व्यवस्थेचे अध:पतन होताना दिसत आहे. सुदृढ समाज सुदृढ कुटुंबातूनच आकाराला येत असतो. सशक्त जीवनविषयक दृष्टिकोन आणि जीवनशैली सशक्त व सुदृढ कुटुंब व्यवस्थेतूनच आकाराला येऊ शकते. म्हणून कुटुंब प्रबोधन आजच्या काळात अत्यावश्यक आहे.

पंच परिवर्तनातील तिसरा मुद्दा नागरी कर्तव्यांचे पालन हे आहे. नागरी कर्तव्यांचे पालन म्हणजे, राष्ट्र म्हणून जे काही नियम असतील त्या नियमांचे पालन करणे होय. आम्हाला नागरिक म्हणून काही निहित कर्तव्य आहेत. जसे रहदारीचे सर्वसामान्य नियम आहेत. ज्यामध्ये मार्गाच्या डाव्या बाजूचा वापर किंवा चौकावरील सिग्नल पाळणे, महामार्गांवर दिलेले गतिनिर्बंध यासारख्या नियमांचा समावेश होतो. या सगळ्या नियमांचे पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य होय. लोकशाहीमध्ये मतदान करणे हे सर्व नागरिकांचे निहित कर्तव्य आहे. आज या देशात लोकशाही आहे हे अभिमानाने सांगणारे अनेक लोक मतदान करण्याचे कर्तव्य टाळताना दिसतात. ही नागरी कर्तव्याची पायमल्लीच ठरते. आपले विहित कर न भरता उत्पन्नाचे स्रोत लपवणे हेदेखील नागरिक कर्तव्याला चुकतात हेच दाखविते. कर्तव्यपालनामुळे दोन नागरिकांमध्ये किमान सामंजस्य निर्माण होते. राष्ट्राला कोणत्याही प्रकारे हानी पोहोचेल अशी कोणतीही कृती न करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्यच होय. आज अधिकारांबाबत जागृत असलेला आमचा समाज कर्तव्यांकडे दुर्लक्ष करताना दिसतो.

पंच परिवर्तनातील चौथा स्तंभ म्हणजे सामाजिक समरसता. सामाजिक समरसतेचा संघाला अभिप्रेत असलेला अर्थ हा की, कोणत्याही व्यक्तीने आपल्या वर्गाबाहेरील किंवा समूहाबाहेरील व्यक्तींप्रति आत्मीयतेने व प्रेमाने व्यवहार करणे होय. प्रदेश, भाषा, रंग, खानपान, पोशाख तसेच जाती, उपासना पद्धती यामध्ये विविधता असणे हे नैसर्गिक आहे. हे मान्य करून त्या पलीकडे जात या वेगळेपणाचा सन्मान करीत सौहार्दपूर्ण व्यवहार म्हणजे सामाजिक समरसता. सर्व समाजघटकांच्या मनात एकमेकांबद्दल एक विश्वास, आदर आणि प्रेम निर्माण करण्यासाठी हे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत या विविधतेचा वापर करून या देशाला, विखंडित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. समरसता साधण्यात समाज अपयशी ठरला तर भविष्यातही हा धोका निर्माण होणार हे नक्की. त्यामुळेच या देशाला व हिंदू समाजाला सशक्त करण्यासाठी सामाजिक समरसतेच्या भावनेला दृढमूल केले पाहिजे. पंच परिवर्तनाची पाचवी पायरी म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी समाजात जागृती निर्माण करणे. या पृथ्वीवर मानवी अस्तित्व हे निसर्गाचाच घटक आहे. मानवी जीवन या संपूर्ण चराचर सृष्टीचा अविभाज्य भाग आहे. निसर्गाने मानवाला भरभरून वरदान दिले आहे. परंतु अनियंत्रित भोगवादामुळे आम्ही निसर्गाचे आणि पर्यायाने मानवजातीचे अपरिमित नुकसान करीत आहोत. निसर्गाचे संवर्धन करण्याऐवजी आम्ही त्याची भरून न येऊ शकणारी हानी करीत आहोत. जागृत विचार आणि आचार समाजात निर्माण करून देण्याचा हा प्रयत्न असणार आहे. रासायनिक खते, जंतुनाशके आणि प्लॅस्टिकच्या वापराला निक्षून नकार देणे गरजेचे आहे. पण यासाठी निश्चय आणि धारिष्ट्य समाजात निर्माण होणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण हे भारतीय जीवन पद्धतीचा महत्त्वपूर्ण घटक होता. तो विचार आणि कृती याला समाजात पुन्हा महत्त्वपूर्ण स्थान मिळण्यासाठी या दिशेने समाजात कृतिशीलता बाणवणे हेच या पाचव्या स्तंभाचे उद्दिष्ट आहे.

समाज संघटन करीत असतानाच समाजात गुणात्मक वाढही व्हायला हवी. आज संघ विचारांना जागतिक पातळीवर सर्व समाज घटकांमध्ये मान्यता मिळालेली दिसते आहे. संस्कृती संवर्धन आणि हिंदू समाज संघटन करतानाच समाजात गुणात्मक वाढ होण्यासाठी प्रयत्न म्हणजेच पंच परिवर्तन होय.


९८८१२४२२२४

## वेध

**विजय कुळकर्णी**

# बुलढाणा जिल्ह्यात अज्ञात आजाराचा धुमाकूळ

कोरोना महामारीमुळे संपूर्ण जग दोन वर्ष ठप्प होते. यामुळे जगभरात मोठ्या प्रमाणात लोक मृत्युमुखी पडले होते. भारतातही या साथरोगाने थैमान मांडले होते. प्राणवायूचा तुटवडा, रुग्णालयातील खाटांचा अभाव, औषधे, लसींचा अभाव यामुळे हाहाकार माजला होता. भौतिक अंतर राखण्यासाठी देशभरात टाळेबंदी करण्यात आली होती. या साथरोगाचा उगम चीनमधून झाल्याचे सर्वांना माहीत आहे. या आजारावर नियंत्रण मिळविल्यानंतर आता एचएमपीव्ही म्हणजे ह्युमन मेटान्यूमोनिया व्हायरस हा नवीन विषाणूजन्य आजार जगभर वेगाने पसरत आहे. याचा उगम देखील चीनमध्येच झाला आहे. हा आजार कशामुळे होतो याचे निदान अजून झालेले नाही. त्यामुळे त्याच्यावर औषध देखील उपलब्ध नाही. या आजाराचे रुग्ण भारतात आणि त्यातही नागपुरात आढळल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून वाचनात आल्या. दुसरीकडे बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील तीन गावांत नवीनच आजाराचे रुग्ण आढळले आहेत. या आजाराची लागण झालेल्या रुग्णांचे केस केवळ तीनच दिवसांत गळून पडतात व संपूर्ण टक्कल पडते, असे गावकऱ्यांनी सांगितले. हा आजार कशामुळे होत आहे हे देखील कोणालाच माहीत नाही. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



शेगाव तालुक्यातील बोंडगाव, कालवड आणि हिंगणा या गावात या अज्ञात आजाराने थैमान घातले आहे. आधी डोके खाजवणे, त्यानंतर केस हाती येणे आणि तिसऱ्या दिवशी केसगळती होऊन टक्कल पडते. या आजाराची या तिन्ही गावांतील लागण होऊन जवळपास ३० जणांचे टक्कल पडले आहे. त्यात महिलांचाही समावेश आहे. आरोग्य विभागाने या आजाराचे सर्वेक्षण सुरू केले आहे. बोंडगाव येथे केलेल्या सर्वेक्षणात ३० जणांना या आजाराची बाधा झाल्याचे दिसून आले. आरोग्य पथकाकडून आजाराची लक्षणे शोधून उपचार केले जात आहेत. दूषित जलस्रोतामुळे हा आजार होत आहे का? पाण्याचा जडपणा जास्त प्रमाणात आहे का? याबाबत आरोग्य विभाग माहिती संकलित करीत आहे. या गावातील पाण्याचे नमुने तपसाण्यासाठी पाठविण्यात आले आहेत. तर, शाम्पूमुळे असा प्रकार घडण्याची शक्यता त्वचारोगतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. दुसरे असे की, ही गावे खारपाणपट्ट्यातील आहेत. तेव्हा, भूगर्भातील क्षारयुक्त पाण्यामुळे ही केसगळती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या घटनेची माहिती मिळताच आरोग्य पथके या गावात पोहोचली. त्यांनी सर्वेक्षणासोबतच आरोग्यविषयक सल्ला रुग्ण व इतर गावकऱ्यांना दिला आहे. लक्षणांनुसार औषधोपचार देखील सुरू केल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दीपाली बाहेकर यांनी सांगितले.

काही वर्षांपूर्वी वाशीम जिल्ह्यातील हिवरापेन येथील नागरिकांना डेंटलफ्लोरॅसिस या आजाराने ग्रासले होते. या आजारात हाडे ठिसूळ होणे, दात पडणे, असे प्रकार होत होते. त्यामुळे वय वर्ष ३ ते ३५ गटातील मुले, युवक व नागरिकांचे दात पडून त्यांना अकाली वृद्धत्व येत होते. या भयंकर आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी वाशीम जिल्हा परिषद व शासनाने नांदेड येथील एका संस्थेकडून सर्वेक्षण केले होते. त्यात गावातील जलस्रोतात फ्लोराईडचे प्रमाण जास्त असल्याने ते पाणी प्यायल्याने हा आजार गावकऱ्यांना जडल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तो जलस्रोत बंद करून जलस्वराज्यच्या माध्यमातून गावाला पिण्याचे शुद्ध पाणी नळयोजनेतून पुरविण्यात आले. त्यामुळे या आजारावर नियंत्रण मिळविणे शक्य झाले. त्याचप्रमाणे या तिन्ही गावांतील जलस्रोतातील पाण्याची तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच, गावातील दूषित पाणी जलस्रोतांजवळ सोडले जाऊ नये, याची खबरदारी ग्राम पंचायतने घेतली पाहिजे. कारण, दूषित पाणी जलस्रोतांजवळ सोडल्यास ते जमिनीत मुरून त्या जलस्रोताद्वारे पुन्हा नागरिकांच्या वापरात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे केसगळती होत असल्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. तेव्हा, जिल्हा परिषदेच्या आरोग्य, ग्रामीण पाणीपुरवठा आणि भूगर्भशास्त्रज्ञांनी याकडे विशेष लक्ष देऊन ही समस्या अधिक तीव्र रूप घेण्यापूर्वीच सोडवावी, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करावीशी वाटते !

८८०६००६१४९

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# दिल्लीत तीन राष्ट्रीय पक्षांची परीक्षा

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाने मंगळवारी केली. ७० सदस्यीय दिल्ली विधानसभेसाठी ५ फेब्रुवारीला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. ८ फेब्रुवारीला होणाऱ्या मतमोजणीत दिल्लीच्या जनतेला कौल कुणाला मिळाला, याचे उत्तर मिळणार आहे. दिल्ली विधानसभा ही अतिशय छोटी विधानसभा आहे. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जाही नाही. मात्र तरीसुद्धा दिल्लीच्या निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष राहणार आहे. कारण दिल्लीच्या निवडणूक निकालाचा राष्ट्रीय राजकारणावर प्रत्यक्ष नसला तरी काही प्रमाणात अप्रत्यक्ष परिणाम होणार आहे.

दिल्ली निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अन्य लहान मोठे पक्ष रिंगणात उतरणार असले तरी दिल्लीत आप, काँग्रेस आणि भाजपा या तीन प्रमुख राष्ट्रीय पक्षांमध्ये खरी लढत होणार आहे. आतापर्यंत देशातील कोणत्याही राज्यात तीन प्रमुख राष्ट्रीय पक्ष पूर्ण ताकदीने निवडणूक रिंगणात उतरले नव्हते. काही राज्यांत भाजपा आणि काँग्रेससोबत प्रादेशिक पक्ष निवडणूक लढवत होते. पण देशाची राजधानी असलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप, काँग्रेस आणि भाजपा अशा तीनही राष्ट्रीय पक्षांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

दिल्लीत जवळपास १२ वर्षांपासून आपची सत्ता आहे, तर काँग्रेस तेवढ्याच वर्षांपासून सत्तेपासून वंचित आहे. भाजपाला तर दिल्लीत सत्ता गमावून जवळपास २७ वर्षे झाली आहेत. त्यामुळे आपसमोर आपली सत्ता कायम ठेवण्याचे, भाजपासमोर सत्ता मिळवण्याचे तर काँग्रेससमोर आपले खाते उघडण्याचे आव्हान आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे आपचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आहे. मात्र भाजपा आणि काँग्रेसजवळ मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार नाही. भाजपा ही निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावावर आणि चेहऱ्यावर लढवत आहे.

दिल्लीत एक तर आप जिंकू शकतो वा भाजपा, मात्र काँग्रेसची दूरदूरपर्यंत कोणतीच शक्यता नाही. त्यामुळे काँग्रेसला तशीही मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवाराची गरज नाही. २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला दिल्लीत आपले खाते उघडता आले नव्हते, एकही जागा जिंकता आली नव्हती. त्यामुळे काँग्रेसजवळ तसेही गमावण्यासारखे काही नाही. काँग्रेसने यावेळी एकही जागा जिंकत आपले खाते उघडले तरी ती त्यांच्यादृष्टीने मोठी उपलब्धी म्हणावी लागेल.

हरयाणा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत आपली सत्ता कायम ठेवण्यात भाजपाला यश मिळाले होते, त्यामुळे यावेळी भाजपासमोर दिल्ली जिंकण्याचे मोठे आव्हान आहे. दिल्ली विधानसभा निवडणूक भाजपाने जिंकली तर एकप्रकारे भाजपाच्या दृष्टीने ती विजयाची हॅट्ट्रिक ठरणार आहे. विशेष म्हणजे २०१४, २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीतील सातपैकी सातही जागा जिंकत भाजपाने इतिहास घडवला होता. लोकसभेच्या सातही जागा जिंकणाऱ्या भाजपाला मात्र २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नव्हते, उलट भाजपाचा दारुण पराभव झाला होता. २०१५ च्या विधानसभा निवडणुकीत आपने ७० पैकी ६७ जागा जिंकल्या होत्या, भाजपाला फक्त तीन जागा मिळाल्या होत्या. काँग्रेसला तर एकही जागा जिंकता आली नव्हती. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत आपच्या काही जागा कमी झाल्या आणि भाजपाच्या वाढल्या. आपने यावेळी ७० पैकी ६२ जागा जिंकल्या, तर भाजपाला ८ जागा मिळाल्या. यावेळीही काँग्रेसला एकही जागा मिळाली नव्हती. २०१३ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आपने पहिल्यांदा काँग्रेसचा पराभव केला होता. यावेळी काँग्रेसने ८ जागा जिंकल्या होत्या. १५ वर्षांनंतर दिल्लीत काँग्रेसचा पराभव झाला होता. १९९८ मध्ये भाजपाचा पराभव करत दिल्लीत काँग्रेसने पहिल्यांदा सत्ता मिळवली, त्यानंतर सलग १५ वर्षे दिल्लीची सत्ता आपल्या हातात ठेवली. शीला दीक्षित यांनी १५ वर्षे दिल्लीचे मुख्यमंत्रिपद भूषवले होते. आज दिल्लीत काँग्रेसचे नेतृत्व करणारे संदीप दीक्षित शीला दीक्षित यांचेच पुत्र आहेत.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीत आप आणि काँग्रेस यांची आघाडी होती. आप काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीचा भाग होता. मात्र दिल्लीत आघाडी करून निवडणूक लढणाऱ्या या दोन पक्षांनी पंजाबमध्ये मात्र एकदुसऱ्याविरुद्ध दंड थोपटले होते. दिल्लीतील लोकसभेच्या सातपैकी आपने चार तर काँग्रेसने तीन जागा लढवल्या होत्या. दिल्लीत एकत्र लढणाऱ्या या दोन पक्षांना फारशी समाधानकारक कामगिरी करता आली नव्हती, एकही जागा या आघाडीला मिळाली नव्हती. आता विधानसभा निवडणुकीत तर आप आणि काँग्रेस हे दोन पक्ष एकदुसऱ्याविरुद्ध लढत आहेत. नुसते लढतच नाही तर काँग्रेस नेते आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्लाही चढवत आहेत. काँग्रेस नेते अजय माकन आणि संदीप दीक्षित यांनी तर केजरीवाल यांना राष्ट्रविरोधी म्हणायलाही कमी केले नाही. यावरून आप आणि काँग्रेसमध्येच जुंपली आहे. आपने तर काँग्रेसला इंडिया आघाडीतून बाहेर काढण्याची मागणी आघाडीतील अन्य घटकपक्षांकडे केली आहे. आपने नंतर हा मुद्दा लावून धरला नाही, हा भाग वेगळा.

काँग्रेसचे राष्ट्रीय नेतृत्व केजरीवाल आणि आम आदमी पक्ष यांच्याविरुद्ध काही प्रमाणात सहानुभूती ठेवून असले तरी दिल्ली काँग्रेसचे नेतृत्व करणारे मात्र आप आणि केजरीवाल यांच्या विरोधात आहे. लोकसभा निवडणुकीतही आपसोबत आघाडी करायला दिल्ली प्रदेश काँग्रेस नेत्यांचा विरोध होता. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत आपचे उमेदवार असलेल्या मतदारसंघात काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आपच्या उमेदवारांचे काम केले नाही. याचा परिणाम म्हणून काँग्रेसचे उमेदवार असलेल्या लोकसभा मतदारसंघात आपच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी दुर्लक्ष केले होते.

२०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी आप अडचणीत सापडली आहे. आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील जवळपास अर्धा डझन मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले, या सर्वांना अटक झाली. एवढेच नाही तर काही महिने तुरुंगातही राहावे लागले. केजरीवाल आणि अन्य नेते सध्या जामिनावर असले तरी भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी केजरीवाल आणि आपची प्रतिमा डागाळली आहे, दिल्लीच्या जनतेचा त्यांच्यावरचा विश्वास डळमळीत झाला, हे निश्चित. याचा फायदा यावेळी भाजपाला मिळण्याची शक्यता आहे. आतापर्यंत लोकसभा निवडणुकीत जवळ असलेली दिल्ली विधानसभा निवडणुकीत मात्र भाजपापासून दूर जात होती, ती यावेळी जवळ येण्याची शक्यता आहे. भाजपाने यावेळी दिल्ली विधानसभेची निवडणूक जिंकली तर जवळपास २७ वर्षांचा भाजपाचा राजकीय वनवास संपणार आहे. सोबतच आप आणि केजरीवाल यांचा राजकीय वनवास सुरू होणार आहे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### भीती नको; सतर्कता पाळा

चीनमध्ये धुमाकूळ घालणाऱ्या एचएमपीव्ही विषाणूने भारतातही प्रवेश केल्याने नागरिकांची चिंता वाढली असली तरी घाबरण्याचे कारण नाही. मात्र नागरिकांना योग्य ती खबरदारी घ्यावीच लागेल. या विषाणूची लक्षणे कोरोनासारखीच असल्याने कोरोना काळात नागरिकांना ज्या मार्गदर्शक सूचना सरकारकडून देण्यात आल्या होत्या त्याचे नागरिकांनी कठोर पालन करावे. गर्दीत जाणे टाळावे. गर्दीत जावेच लागणार असेल तर मुखाच्छादन घालूनच जावे. सॅनिटायझरचा वेळोवेळी वापर करावा. आरोग्य यंत्रणेने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. या विषाणूचा सामना करण्यास आपली आरोग्य यंत्रणा सक्षम आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जायचे कारण नाही. नागरिकांनी आरोग्य यंत्रणेला आणि प्रशासनाला योग्य ते सहकार्य केल्यास या विषाणूचा मुकाबला करणे सहज शक्य आहे. आधुनिक युगात अशाप्रकारचे विषाणू येतच राहणार आहेत. त्यांच्याशी लढायचे असेल तर आता सतर्कता बाळगणे हाच उपाय आहे. भीती नको पण सतर्कता पाळा, एचएमपीव्ही विषाणू टाळा, हा नवा मंत्र सर्वांनी अंगीकारला पाहिजे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### योजनेचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचायला हवा

प्रत्येक सरकार हे गरिबांसाठी, गरजू पात्र व्यक्तींसाठी वेगवेगळ्या योजना आखत असते आणि त्या योजना प्रभावीपणे राबवल्या सुद्धा जातात. या अशा योजनेमुळे निराश्रित आणि दारिद्र्यामध्ये जीवन जगणाऱ्या गरजू लोकांना मोठा आधार मिळतो आणि आणि सन्मानाने जगता येते. सरकार तर योजना सुरू करते मात्र या योजना खरंच गरीब आणि गरजू लोकांपर्यंत पोहोचतात का, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

नुकतीच महाराष्ट्र सरकारने 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना सुरू केली. राज्यातील २१ ते ६० वर्षांपर्यंत सर्व पात्र महिलांना या योजनेचा लाभ देण्यात आला. प्रत्येक महिलांच्या खात्यामध्ये शासन पंधराशे रुपये टाकत असल्याने अनेक गरजू महिलांची दिवाळी साजरी झाली. मात्र या योजनेचा बऱ्याचशा श्रीमंत लोकांनीही फायदा घेतला. अनेक महिलांचे पती शासकीय नोकरीवर, घरी शेतीवाडी आणि घरी मोठे मोठे वाहने असतानाही या महिलांनी योजनेचा फायदा घेतला अशी बातमी कानावर आली आणि खरंच खूप वाईट वाटले. आज बंदी भागातील एक गरीब महिला आमच्या दुकानात आली आणि तिने आपली आपबिती सांगितली. एक वेडसर मुलगी घेऊन ती आपला कुटुंबाचा गाडा हाकत होती. पालन पोषण करणारे कोणीही नाही. घरी खाण्याची सुद्धा दैनावस्था. अशा स्थितीमध्ये त्या महिलेला या लाडकी बहिणीचा लाभ तर मिळाला नाही वरून कागदपत्र जुळवण्यासाठी सुद्धा तिला कोणीही मदत करत नव्हते. प्रचंड त्रासून गेलेल्या त्या महिलेकडे पाहून कोणालाही कीव येईल अशी स्थिती होती. ही स्थिती पाहून खरंच खूप वाईट वाटले. आम्ही तर जमेल तशी तिला मदत केली. मात्र समाजात आजही अशा अनेक महिला आहेत त्यांना अशी काही योजना सुरू आहे हे सुद्धा माहीत नाही. ज्या नागरिकांना या योजनेची खरंच गरज आहे त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही आणि ज्यांना गरज नाही ते राजरोसपणे योजनेचे पैसे लाटत आहेत. हे चित्र कुठेतरी बदलायला हवे आणि गरजू नागरिकांपर्यंतच योजनेचा लाभ पोहोचायला हवा.

**मोहन कळमकर**/७३८५८६१४४६

### 'नो विन - नो पे' धोरण अंगीकारा

'सातत्य न दाखवणाऱ्या खेळाडूंना घरी बसवा' हा सडेतोड अग्रलेख नुकताच वाचला. ऑस्ट्रेलियामधील पाचव्या कसोटीतून 'आतल्या आवाजाला' स्मरून रोहित शर्माने स्वतःला 'वगळून' घेतले, तेव्हा त्याने केलेला कांगावेखोरपणा मनोरंजक होता. गेली दोन वर्षे सातत्याने फेल गेलेले रोहित शर्मा आणि विराट कोहली हे खेळाडू संघात 'आरक्षण' असल्यासारखे चिकटून बसले आहेत. सध्या क्रिकेट खेळाडूंना पैशासाठी कसोटी क्रिकेट महत्त्वाचे वाटत नाही. आयपीएल, टी-२० आणि एकदिवसीय सामन्यांमध्ये कमी श्रमात भरपूर पैसा मिळतो, त्यातही जय-पराजयाची चिंता नाही. शिवाय मॉडेलिंगचा पैसा वेगळा. कसोटीत श्रम जास्त आणि पैसा तुलनेने कमी.

अग्रलेखात म्हटल्याप्रमाणे सर्व नियम लागू करणे आवश्यक आहेच. याशिवाय या खेळाडूंकडून चांगली कामगिरी करवून घ्यायची असेल तर आणखी एक कठोर उपाय योजणे आवश्यक आहे. खाजगी कंपन्यांमध्ये 'नो वर्क-नो पे', असते तसेच यांना 'नो विन-नो पे', अनिर्णीत सामन्यात ५० टक्के आणि हरलेल्या सामन्यात २५ टक्के मानधन मिळण्याची अट ठेवली पाहिजे. ज्यांना ही अट मान्य असेल त्यांनीच खेळावे अन्यथा घरचा रस्ता धरावा. सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर असे करायला काहीही हरकत नसावी.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# संक्षिप्त वृत्त



## भंडारी समाजाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

भंडारी समाजाच्या वतीने पत्रकार दिनाच्या निमित्त २०२५ वर्षाच्या दिनदर्शिका प्रकाशन व पत्रकार बांधवांचे सत्कार मान्यवरांच्या हस्ते सत्यविजय कनवेशन मल्टी पर्पज हॉल जुना कुंभारी येथे करण्यात आले. प्रारंभी भंडारी समाजाचे कुलदैवत श्री यल्लमा देवी प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले. सहसचिव वेंकटेश लचमापुरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पत्रकार दिनाच्या निमित्ताने समाजातील व अन्य सर्व पत्रकार बांधवांचे सत्कार प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते करण्यात आला. आलेल्या भंडारी समाजातील प्रमुख पाहुणे यल्लदास लचमापुरे, अजीबाबू भंडारी, सिद्धया गुत्तेदार, शिवय्या तांडा, श्रीनिवास गुल्लापल्ली, जनार्दन येमुल, बालय्या मरपेल्ली, श्रीनिवास गौड, विकास गुत्तेदार यांनी या उपक्रमाचे व सर्व पत्रकार बांधवाचे कौतुक केले. कार्यक्रमास संचालक मंडळ सिद्धया गुत्तेदार, संजीव सुगरे, प्रताप पल्ली, पांडुरंग बंदाराम, व्यंकटेश लचमापुरे, प्रताप पल्ली, व्यंकटेश मरपेल्ली, वेणुगोपाल मारपेल्ली, नरेश चव्हाण, रवी चिंचोळ, विजय मुगळे, सुदर्शन तेलंग, विकास गुत्तेदार, श्रीनिवास गौड, पप्पू तेलंग, नरेश लचमापुरे शानया तेलंग (पंढरपूर) उपस्थित होते. आभार प्रदर्शन अध्यक्ष जगदीश येमूल यांनी मानले. यावेळी रमेश भंडारी, सुदर्शन तेलंग, रमेश कलाल, शिवाजी सावंत, अनिल शिराळकर संजीव सुगरे, स्वामीराव गायकवाड, प्रदीप पद्देलवार या पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. पुष्पगुच्छ, शाल, वही, पेन, कॅलेंडर असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी भंडारी समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, आजी-माजी विश्वस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे हिताचे निर्णय होण्यासाठी मंत्री आबिटकर यांना साकडे

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

राधानगरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांची मंत्रालयात महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे, बालाजी कांगणे, सिद्राम मुद्देबिहाळ व भीमाशंकर बिराजदार यांनी भेट घेतली व त्यांचा कॅबिनेट मंत्री झाल्याबद्दल सोलापूर चादर व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रंथालय मागण्या संदर्भात निवेदन देऊन चर्चा करून त्यांना विनंती केली की, विधीमंडळात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घोषित केलेले ४० टक्के अनुदान वाढ, दर्जा बदल, नवीन ग्रंथालय मान्यते बाबत चालू अर्थसंकल्पात तरतूद होण्यासाठी आपण जातीने व्यक्तीगत लक्ष घालून प्रश्न मार्गी लावावेत याबाबत चर्चा केली असल्याचे सदाशिव बेडगे यांनी सांगितले. तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याही भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात येवून ग्रंथालय मागण्यासंदर्भात चर्चा झाली. यावेळी महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदचे अध्यक्ष सदाशिव बेडगे, बालाजी कांगणे, सिद्राम मुद्देबिहाळ, भीमाशंकर बिराजदार उपस्थित होते.

# चेक बाउन्सप्रकरणी न्यायालयाचा दणका

## व्यापाऱ्याला सहा महिन्यांची शिक्षा अन् चेकच्या दुप्पट रक्कम व्याजासह देण्याचा आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी -**

चेक बाऊन्स केल्याप्रकरणी व्यापाऱ्यास ६ महिन्याची शिक्षा व चेकच्या दुप्पट रक्कम ही १ टक्के व्याजासह भरपाई देण्याचा आदेश न्यायदंडाधिकारी विनायक रेडकर यांनी दिला.

मनोकामना ट्रेडींग कंपनीचे मालक असलेले कलीम मौलना शेख असे शिक्षा झालेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे. सोलापुर येथील वैभव ट्रेडींगचे मालक नागनाथ चनबसप्पा कामशेट्टी यांच्या कडुन सोलापुर येथील मनोकामना ट्रेडींग कंपनीचे मालक असलेले कलीम मौलना शेख यांनी १२ लाख ७२ हजार ४५ रूपयांचा माल हा उधारीचे खाते ठेवुन घेतला होता. त्या बदल्यात शेख यांनी कामशेट्टी यांना चेक दिला होता. तो चे न वटविला नसल्याने त्यांचे सदर्भात सोलापुर येथील फौजदारी कोर्टात कामशेट्टी यांच्याकडुन चेक न वटल्याच्या संदर्भात शेख यांच्याविरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अन्वये फौजदारी केस ही दाखल करण्यात आली होती.



त्यामध्ये कोर्टाने फिर्यादीचा तथा त्यांचे साक्षीदारांचा सर्व पुरावा हा ग्राह्य धरला आणि आरोपीचा बचाव तथा पुरावा हा अमान्य केलेला असून त्यास दोषी धरण्यात येवुन सोलापुर येथील न्यायदंडाधिकारी विनायक रेडकर यांनी वरील आरोपी कलीम शेख यांना ६ महीने कैदेची शिक्षा तसेच चेकच्या दुप्पट रक्कम म्हणजे २५ लाख ४ हजार १० रुपये इतकी रक्कम ही १% व्याजासह वर नमुद फिर्यादी कामशेट्टी यांना देण्याचा आदेश केला. सदरच्या केसच्या कामी फिर्यादीतर्फे ॲड. विनोदकुमार दरगड, ॲड. अंकीता धुत (आसावा) यांनी काम तर आरोपीच्या वतीने ॲड. जानवाडकर यांनी काम पाहीले.



## वालचंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे किल्ला दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

वालचंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे हेरिटेज वॉक अंतर्गत किल्ला दर्शन वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयातील इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी हेरिटेज वॉक अंतर्गत किल्ला दर्शनाचा लाभ घेतला.

इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी विद्यार्थ्यांना सोलापूर किल्ल्याची निर्मिती तसेच या किल्ल्याची विविध टप्प्यात झालेली बांधकामे, किल्ल्याच्या अंतर्गत भाग व किल्ल्याबाहेरील खंदक, किल्ल्याची प्रवेशद्वारे, त्यांची वैशिष्ट्ये, किल्ल्याच्या तटांवर असणारी व्यालशिल्पे, किल्ला बांधणीचे तंत्र यांचीही माहिती दिली. सोलापूर भुईकोट किल्ल्यात असणारी विविध मंदिरे, मशीद, शिलालेख त्यांचे इतिहासातील महत्त्व इत्यादी गोष्टींचा परिचय विद्यार्थ्यांना करून देण्यात आला. सोलापूर भुईकोट किल्ल्यामुळे सोलापूर शहरास प्राप्त झालेले ऐतिहासिक महत्त्व व ऐतिहासिक वारसा यांची माहिती विद्यार्थ्यांना प्रा डॉ चंद्रकांत चव्हाण यांनी करून दिली. बहामनी कालखंड, आदिलशहा, निजामशहा मोगल, पेशवे व इंग्रज कालखंडात सोलापूरचा किल्ला व तत्कालीन ऐतिहासिक घडामोडी यांचा परिचय झाला. इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. डॉ. भागवत गजधाने व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




# पत्रकार हे समाजाचे पहारेकरी : राजू भूमकर

### कै. बाबुरावसा भूमकर पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण

### दै. 'तरुण भारत'चे उपसंपादक किरण बनसोडे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

पत्रकार हे समाजाचे जागरूक पहारेकरी असतात. ते समाज मनाचा आरसा असतात. आपल्या लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याचे काम पत्रकार करत असतात, असे प्रतिपादन सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष राजू भूमकर यांनी केले.पत्रकार दिनाचे औचित्य साधून येथील सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलातर्फे संकुलाचे संस्थापक अध्यक्ष 'कै. बाबुरावसा दत्तात्रयसा भुमकर पत्रकारिता पुरस्कार' वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी

सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष राजू भुमकर यांच्या हस्ते आणि सो.स.क्षत्रिय समाज विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संजीव बिद्री यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. प्रमुख अतिथी म्हणून सचिव गजानन गोयल, जयकुमार कोल्हापुरे, संस्थेचे सदस्य सर्वश्री श्रीराम पवार, भरतकुमार शालगर, गणेश दामजी यांच्यासह शैक्षणिक संस्थेचे सदस्य सर्वश्री तुकाराम पवार, संजीव रंगरेज, मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंजुषा काशीद, इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक डॉ. विष्णू रंगरेज आदी उपस्थित होते. प्रारंभी संकुलाचे संस्थापक अध्यक्ष कै. बाबुरावसा भुमकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक मंजुषा काशीद यांनी केले. शिवाजी सुरवसे, किरण बनसोडे आणि सागर सुरवसे यांनी सत्काराला उत्तर दिले. कार्यक्रमस्थळी वैशाली अघोर यांनी रांगोळीच्या माध्यमातून उत्कृष्ट अशी लेखणीची प्रतिमा रेखाटली. सूत्रसंचालन सहशिक्षक जय कबाडे यांनी केले तर संस्थेचे सचिव गजानन गोयल यांनी आभार मानले.


### यांचा झाला पुरस्काराने सन्मान

यावेळी दैनिक 'तरुण भारत'चे उपसंपादक किरण बनसोडे, शिवाजी सुरवसे, संगमेश्वर जेऊरे, प्रसाद दिवाणजी, अनिल कदम, विक्रम पाठक, उमेश कदम, श्रीनिवास गाजूल, अजित उंब्रजकर, रोहित थळवे, सागर सुरवसे, आदित्य केंगार आदी पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व फेटा असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

# निधन वृत्त...

## शिवशंकर म्हेत्रे

**अक्कलकोट, दि. ८ जानेवारी-**



तालुक्यातील चिक्केहळ्ळी येथील व कर्जाळ येथील केंद्र शाळेचे माजी मुख्याध्यापक शिवशंकर उर्फ शरणप्पा गुरुशातप्पा म्हेत्रे (वय ८६) यांचे अल्पशा आजाराने सायंकाळी निधन झाले. गुरूवारी ९ जानेवारी रोजी दुपारी एक वाजता त्यांच्या राहत्या घरापासून अंत्यात्रा निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, चार मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परीवार आहे. ग्रामसेवक संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष अशोक म्हेत्रे यांचे ते वडील होते.

## निखिल घोंगडे

**सांगोला, दि. ८ जानेवारी-**



वाढेगाव (ता. सांगोला) येथील रहिवाशी निखिल दिगंबर घोंगडे (वय २६) यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, वडील, आई, एक भाऊ असा परिवार आहे.

## पार्वती चव्हाण

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**



सलगरवस्ती येथील रहिवासी पार्वती चव्हाण (वय ७९) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्यात मुलगा, मुलगी, सुन, नातंवंडे असा परिवार होता.


## मोहोळ नगरपरिषद कार्यालय,

**ई-निविदा सूचना प्रसिध्दिकरण**

**जा.क्र.मोनप/बांध/२०२५/२०** **दि. ०८/०१/२०२५**

मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद यांचेकडून शासनाच्या विविध योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या विकास कामाची ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार / अर्हताप्राप्त निविदा धारकाकडून तांत्रिक ब-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई-निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई-निविदेमध्ये एकूण १ कामे आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि. ०९/०१/२०२५ सायं. ०५.०० वाजेपासून ते दि. २४/०१/२०२५ पर्यंत सायं. ०५.०० वाजेपर्यंत असून कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत, निविदा स्वीकृती, अटी व शर्थी इत्यादींची माहिती **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावरती उपलब्ध आहे.

शिक्का

**सही/-**
**(डॉ. योगेश डोके)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**मोहोळ नगरपरिषद, मोहोळ**



## जाहीर समन्स/नोटीस

रे. मु. नं. ५१८/१९८४
निं २५५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. सो. यांचे न्यायालयात**

**लक्ष्मण दिगंबर करंडे, वगैरे** - **वादी**
विरुध्द
**श्रीमती पुतळाबाई गजाबा आवारे वगैरे** - **प्रतिवादी**

प्रति,
**सावित्रीबाई उर्फ जयश्री माणिक काशिद,**
रा. देगांव (वाळूज), ता. मोहोळ, जि. सोलापूर - प्र.वादी नं. ४ यांना

ज्याअर्थी, सदरचा दावा यातील वादीने प्रतिवादीचे विरुध्द कब्जा, उत्पन्न व खर्च मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी तुम्ही हजर राहावे म्हणून तुम्हांला वर दाव्यात नमूद केलेल्या वादी यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. कोर्टामार्फत समन्स/नोटीस पाठविले असता सदर समन्स / नोटीसीची बजावणी झालेली नाही, तुम्ही दाव्यात नमूद पत्त्यावर राहत नसल्यामुळे त्यांची डकवून बजावणी ही करता आली नाही. तुम्ही दाव्यात नमूद पत्त्यावर सध्या राहत नसून परगावी राहत असलेचा मे. बेलिफ यांचा रिपोर्ट आलेला आहे. त्यामुळे तुम्ही कोठे राहता तो नविन पत्ता मिळून आलेला नाही, त्यामुळे तुमचे विरुध्दचे सदर दाव्याचे समन्स/नोटीस न बजावता परत आलेली आहे.

त्याअर्थी, तुम्ही प्रतिवादी नं. ४ यांनी सदर दाव्याचे कामी सदर जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता.१०/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. कोर्टात या दाव्याचे कामी स्वतः अगर कुलमुखत्यार यांचे मार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर दाव्याचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे कांही म्हणणे नाही असे समजून मे. कोर्टाचे तुमचे विरुध्द एकतर्फा आदेश होतील. मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे हे जाहीर समन्स/नोटीस मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिली. ता.११/१२/२०२४

**सही/-**
**लिपीक**

न्यायालयाचा शिक्का

**सही/-**
**मा. सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय,**
**क. स्तर सो, बार्शी**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर बार्शी व परीसरातील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकत वर्णन :- डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी शहर बार्शी नगरपरिषद हद्दीतील मिळकत त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे: गट नं. १२०८/२ याचे एकूण क्षेत्र हे. ०० - ९८ आर, आकार रू. ०० - ७७ पै. आहे. सदर गटापैकी दक्षिण बाजूकडील क्षेत्र हे. ००- २५ आर आहे. याचे मोजमाप पूर्व बाजू मिटर ३१.९५, दक्षिण बाजू मिटर ७८, पश्चिम बाजू - मिटर ३१.९८ व उत्तर बाजू मिटर ७९.५ आहे. यासी चतुःसीमा पूर्वेस बार्शी ताडसौंदने रोड, दक्षिणेस तिवारी यांची जमीन, पश्चिमेस लांडगे यांची जमीन, उत्तरेस- चंद्रकांत परदेशी यांची जमीन आहे. याची पाणी व वागणुक पूर्व बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक वर्णनाची जमीन आतील दगडमाती, झाडेझुडपे इ. सर्व तदंगभूत वस्तुसह वहिवाटीचे हक्कासह जागा.

वर वर्णन केलेली जमीन ही अरविंद दगडू परदेशी, रा. स.नं. ४३/१/१५ए, फ्लॅट नं. ३०६, आरोह डुरिंग अपार्टमेंट, दत्त नगर, आंबेगांव बु. पुणे यांचे मालकी वहिवाटीची असून सदरची मिळकत त्यांनी त्यांचे कौटुंबिक गरजेकरीता विक्रीस काढली असता त्यांनी आमचे अशीलास सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असा भरवसा देवून त्यांनी आमचे अशिलांचे हक्कात इसारपावतीचा दस्त लिहून देवून आमचे अशिलाकडून इसारादाखल रक्कम स्विकारलेली आहे.

तरी तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या जमीनीबाबत कोणाचा कांही हक्क हितसंबंध, मालकी, भावकी वाद, कोर्ट दावा, वारसा हक्क, लिज, लिन, अतिक्रमण, पोटगी, गहाण, बक्षिस, ताबा, वहिवाट, कर्ज बोजे, बँक बोजा अथवा करार मदार, साठेखत, खरेदीखत, करारपत्र वगैरे असल्यास त्यांनी त्यांचे हरकती खालील पत्त्यावर लेखी कागदपत्रांसह ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीत कोणाची कांही हरकत न आलेस आमचे अशील सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली. दि. ०८/०१/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. महेश एस. धाराशिवकर**
**मो. ९४०४६७१२६३**



## अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२४-२५**
**फेर ई निविदा सूचना क्र. २२१/२०२४-२५**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत ०१ कामाची निविदा सूचना क्रमांक २२१ / सन २०२४-२५ ई टेंडर पद्धतीने ऑनलाईन मागविण्यासाठी शासनाच्या http://mahaetenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(मा. उपायुक्त यांचे मान्यतेने)

शहर अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका



## बँक ऑफ बड़ौदा / Bank of Baroda

**नवी पेठ, शाखा - पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१**

**परिशिष्ठ - ६ मसुदा**
**कर्जदाराला सल्ला देण्यासाठी सूचना दागिन्यांचा लिलाव**

प्रति,
**सौ. स्वप्ना विठ्ठल चव्हाण,**
३१५६, मुरारजी पेठ, सोलापूर ता. उत्तर सोलापूर,
जि. सोलापूर - ४१३००७ मो. ७५१७५१३८४०

सर / मॅडम,

विषय : गोल्ड लोन अकौऊंट नंबर ९८६२०६०००१८७६

आम्ही वर नमूद केलेल्या तुमच्या कर्ज खात्याचा संदर्भास अनुसरुन दि. ३०/१२/२०२४ रोजी रु. २,२६,६०७.८३/- + व्याज आणि इतर खर्च एवढे रक्कमचे तुमच्या कडून थकबाकी येणे आहे.

आम्हाला खेद वाटतो की, आम्ही दिलेल्या सूचनांना तुमच्याकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही.

आम्ही तुम्हाला उत्तरदायित्व आणि इतर शुल्काची परतफेड करण्याचा सल्ला देतो आणि दि. १५/०१/२०२५ (तारीख) किंवा त्यापूर्वी तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजची पूर्तता करा, असे न झाल्यास बँक सार्वजनिक लिलाव किंवा खाजगी करारामध्ये तुमच्या कडून येणे असलेल्या रक्कमेला तुमच्या सिक्युरिटीजची विक्री करण्यात येईल. बँकेच्या आवारात दिनांक १६/०१/२०२५ रोजी सकाळी १० वाजता किंवा त्यानंतर कोणत्याही अन्य सोयीस्कर तारखेला बँकेच्या पूर्ण विवेकबुध्दीनुसार पुढील सूचना न देता लिलावाची करण्यात येईल. कृपया लक्षात घ्या की लिलावाची किंमत आणि या संदर्भातील शुल्क तुम्हाला द्यावे लागेल.

**स्थळ - सोलापूर**
**दिनांक - ०८-०१-२०२५**

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

**शाखा व्यवस्थापक**
**बँक ऑफ बडोदा**



## ग्रामपंचायत उंदरगाव, ता. माढा, जि. सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत उंदरगाव, ता.माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोत्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिष -**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौ. उंदरगाव, ता. माढा येथील अंतर्गत रस्ते करणे | ३ लाख | - | १००/- | ६ महिने | सु.बे.अ. |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी ०९/०१/२०२५ सकाळी १०.०० वाजल्यापासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक १३/०१/२०२५ पर्यंत सकाळी १०.०० ते ६.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय उंदरगाव
३ निविदा उघडण्याचा दिनांक १४/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**बाळासाहेब धर्मे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत उंदरगाव, ता. माढा, जि. सोलापूर**

**सही/-**
**रतनबाई माणिक लवटे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत उंदरगाव, ता. माढा, जि. सोलापूर**



## महानिर्मिती ई-निविदा प्रकाशनाची सूचना

**(०१) निविदा. क्रं ३०००० [illegible] बीएम १ (आर) विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ सिल एयर फॅन अँड व्हेरियस टाइप्स ऑफ कप्लिंग फॉर बॉयलर साईड औक्झीलरी इन यू-६ अँड ७ ॲट बीएम-,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.४.३९ लाख, **बयाना :** रु.७८९५/- **(०२) निविदा. क्रं ३००००५२९९३ टीएम १ (आर) विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ कंट्रोल फ्लूईड रिजनरेशन फिल्टर्स ऑफ गवर्निंग सिस्टम फॉर टीएम-१,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.३६.७६ लाख, **बयाना :** रु.७०२६७/-. **(०३) निविदा. क्रं ३००००५३६२१ सिविल-६ अँड ७ विषय :** एडब्ल्यूसी फॉर मिसलिनीअस सिविल वर्क्स रिक्वायर्ड फॉर अट्टेंडिंग कम्प्लेंट्स अँज अँड व्हेन रिक्वायर्ड ॲट यू-६ अँड ७, सिविल प्लांट, २५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२२.५९ लाख, **बयाना :** रु.२६०९१/-. **(०४) निविदा. क्रं ३००००५३६९३ टीएम १ विषय :** एएमसी फॉर सर्विसिंग ऑफ १३०/३०टी ईओटी क्रेन्स ॲट टीएम-१,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१.१३ लाख, **बयाना :** रु.३४०९/-. **(०५) निविदा. क्रं ३००००५३६९४ टीएम १ विषय :** एएमसी फॉर वर्क ऑफ एचपी वॉल्व्स रिप्लेसमेंट अँड स्ट्रेस रिलीविंग ऑफ वेल्डिंग जॉइंट्स ॲट टीएम-१,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२१.०३ लाख, **बयाना :** रु.२४५३१/-. **(०६) निविदा. क्रं ३००००५३६९५ टीएम १ विषय :** एएमसी फॉर व्हेरीअस मेंटेनन्स वर्क्स ऑफ बीएफपी, एचपी / एलपी डोजिंग, जनरेटर सील ऑइल सिस्टम, बॉयलर फील पंप एरिया ईटीसी ॲट टीएम-१,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.५.०६ लाख, **बयाना :** रु.८५६७/-. **(०७) निविदा. क्रं ३००००५३७५६ (आर) डब्ल्यूपीटी-यू-६, ७ विषय :** सप्लाय ऑफ स्टेबल ब्लीचिंग पाऊडर, जीआर-।।, आयएस-१०६५/१९८९ फॉर डब्ल्यूटीपी यू-६,७,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२३.२५ लाख, **बयाना :** रु.२६७५८/-. **(०८) निविदा. क्रं ३००००५३९४७ बीएम-१ (आर) विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ फरनेस पॅनल पिपहोल डोर्स, फ्युल इंलेट एलबो रिपेअर पॅच, ट्रापेजोडॉल बार फॉर बीएम-१,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.३.७१ लाख, **बयाना :** रु.७२१५/-. निविदा क्रमांकासाठी ०१ ते ०८ साठी ऑनलाइन पद्धतीने निविदा विक्री सुरू होण्याचा / निविदा भरण्याचा अंतिम दिनांक: ०९.०१.२०२५ पासून ११:०० वाजता ते दिनांक : २३.०१.२०२५ ते १६:०० वाजता निविदा स्वीकृती आणि उघडणे: दिनांक २४.०१.२०२५ पर्यंत १२:०० पर्यंत आणि १५:०० तासापर्यंत. **(०९) निविदा. क्रं ३००००५२८२९ टीएम-२ विषय:** वर्क ऑफ सर्विसिंग ऑफ हायड्रन्ट अँड स्प्रे डिझेल इंजिन ॲट फायर फायटिंग पंप हाऊस ऑन अँज अँड व्हेन रिक्वायर्ड बेसिस ॲट टीएम-।।,२५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१.६८ लाख, **बयाना :** रु.५०६२/-. **(१०) निविदा. क्रं ३००००५३४५८ बीएम-२ विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ हायड्रॉलिक ॲडजस्टमेंट डीव्हाईस फॉर एफडी फॅन एफएएफ १७/९.५-१ रिक्वायर्ड ॲट बीएम-२,२५० मे वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.४५.०० लाख, **बयाना :** रु.४८५००/- **(११) निविदा. क्रं ३००००५३५०६ सीएचपी-८ विषय :** वर्क ऑफ प्रोवायडिंग वॉकवे अॅप्रोचेस फॉर फ्लॅप गेट चेंजओवर ॲट सीएचपी-८,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२.३४ लाख, **बयाना :** रु.५८४७/- **(१२) निविदा. क्रं ३००००५३५३५ टीएम-१ विषय :** सप्लाय ऑफ व्हेरीअस स्पेअर्स रिक्वायर्ड फॉर एयर मशिनरी ऑफ यू-६ ॲट टीएम-१,२५० मे वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२७.३७ लाख, **बयाना :** रु.३०८७५/-. **(१३) निविदा. क्रं ३००००५३६१० बीएम-१ विषय :** एएमसी फॉर द वर्क ऑफ इंसुलेशन वर्क फॉर व्हेरीअस वॉल्व्स, पाइप लाइन्स, फरनेस अँड डक्ट्स ईटीसी इन शॉर्ट शट डाउन अँड इन रनिंग कंडिशन्स ॲट बीएम-१,२५० मे वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.६.०७ लाख, **बयाना :** रु.९५७६/-. **(१४) निविदा. क्रं ३००००५३६९० ईएम-१ विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ कार्बन ब्रश फॉर ग्राऊंड फॉल्ट डिटेक्षन सिस्टम ऑफ जनरेटर रोटर ॲट ईएम-१,२५० मे वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.३.०९ लाख, **बयाना :** रु.६५९१/-. **(१५) निविदा. क्रं ३००००५३७१९ एएचपी-२ विषय :** वर्क ऑफ रिकंडीशनिंग ऑफ झेडआर-९० एयर कॉम्प्रेसर एचपी स्क्रिव एलिमेंट अँड सप्लाय ऑफ स्पेअर् पार्ट्स मटेरियल ॲट एएचपी-२,२५० मे वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.५.८५ लाख, **बयाना :** रु.९३५५/-. **(१६) निविदा. क्रं ३००००५३८३५ एएचपी-२ विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरीअस साइज गेट अँड बटरफ्लाय वॉल्व्स फॉर वेट कोर्स अँड ड्राय फ्लाय अॅश ईव्हॅक्युएशन अँड कन्व्हेइंग सिस्टम ॲट एएचपी-२,२५० मे वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२.७१ लाख, **बयाना :** रु.६२१८/-. **(१७) निविदा. क्रं ३००००५३८४८ सी अँड आय-१ विषय :** वर्क ऑफ केबल लेइंग अँड रिमूव्हिंग ओल्ड केबल ड्यूरिंग डे टू डे अँड एओएच / सीओएच ॲक्टीव्हीटीज ॲट आय अँड सी-१,२५० मे वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.३.४३ लाख, **बयाना :** रु.६९३०/-. **(१८) निविदा. क्रं ३००००५३८५० बीएम-१ विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पेअर्स फॉर एचपी अँड बी अँड एस पंप्स ऑफ कोल मिल बीबीडी-४७७२ ॲट बीएम-१,२५० मे वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.४६.९९ लाख, **बयाना :** रु.५०४९९/-. **(१९) निविदा. क्रं ३००००५३८८४ बीएम-२ विषय :** वर्क ऑफ जर्नल असेंबली सर्विसिंग अलाईड वर्क ऑफ कोल मिल एक्सआरपी-९०३ ऑन अँज अँड व्हेन रिक्वायर्ड बेसिस ॲट बीएम-२, २५० मे वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.४.६६ लाख, **बयाना :** रु.८१६६/-. निविदा क्रमांकासाठी ०९ ते १९ साठी ऑनलाइन पद्धतीने निविदा विक्री सुरू होण्याचा / निविदा भरण्याचा अंतिम दिनांक: ०९.०१.२०२५ पासून ११:०० वाजता ते दिनांक : २९.०१.२०२५ ते १६:०० वाजता निविदा स्वीकृती आणि उघडणे: दिनांक ३०.०१.२०२५ पर्यंत १२:०० पर्यंत आणि १५:०० तासापर्यंत. **संपर्क व्यक्ती:** मुख्य अभियंता, टीपीएस परळी-वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या: https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक: - ८४११९७१५२५.

**मुख्य अभियंता**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### गोविंद सहानीची विजयी सुरुवात

**बरेली :** येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेत गोविंद सहानीने काश्मीरच्या मोहम्मद आरिफवर मात करून आपली विजयी सुरुवात केली. २०२३ स्ट्रॅण्डजा मेमोरियल इंटरनॅशनल मुष्टियुद्ध स्पर्धेतील रौप्यपदक विजेता व २०२३ च्या पुरुषांच्या जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धेसाठी भारतीय संघाचा सदस्य गोविंद सहानीने पहिल्याच दिवशी दमदार खेळाचे प्रदर्शन केले. भारतीय मुष्टियुद्ध महासंघाद्वारे व उत्तर प्रदेश मुष्टियुद्ध संघटनेच्या सहकार्याने आयोजित या स्पर्धेत सुमारे ३०० मुष्टियोद्धे वर्चस्व मिळवण्यासाठी लढा देत आहेत. अन्य थरारक लढतीत राजस्थानच्या देवेंद्र सोलंकीने फ्लायवेट (४७-५० किलो) गटात डोनाल्ड विन्स्टन जनुमालाचा पराभव केला. बँटमवेट (५०-५५ किलो) विभागात हिमाचल प्रदेशच्या बादलने मिझोरामच्या लालरुईतलुआंगाविरुद्ध विजय मिळवला. गोव्याच्या नितेश चव्हाणने केरळच्या मोहम्मद आथिफला ५-० असा विजय मिळवला, तर अरुणाचलच्या इटो आडोने हिमांशू सिंगवर चिवट विजय मिळवला.



### २०२६ च्या विश्वचषकानंतर डेशॅम्प्स प्रशिक्षकपद सोडणार

**पॅरिस :** ५६ वर्षीय डिडिएर डेसचॅम्प्स २०२६ च्या फुटबॉल विश्वचषकानंतर फ्रान्स संघाचे प्रशिक्षकपद सोडणार आहे. २०२६ च्या उन्हाळ्यात आपला फ्रान्स संघासोबतचा करार संपेल, तेव्हा मी या प्रशिक्षक पदावरून पायउतार होईल, असे डेसचॅम्प्स यांनी टीएफनला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. मी २०१२ पासून येथे आलो आहे आणि २०२६ पर्यंत पदावर कायम असणार आहे. करार कधीतरी संपायला पाहिजे, असे ते म्हणाले. फ्रेंच संघाला सर्वोच्च पातळीवर ठेवण्यासाठी मी उत्कटतेने कार्य केले, परंतु २०२६ पर्यंत हे सर्व कायम असणार आहे, असे ते म्हणला. त्यांनी लॉरेंट ब्लँकचा उत्तराधिकारी म्हणून आपल्या भूमिकेची सुरुवात केली. २०१८ च्या विश्वचषक स्पर्धेत फ्रान्सला विजय मिळवून दिला, तसेच २०२२ मध्ये आणि २०१६ च्या युरोपियन चॅम्पियनशिपमध्ये अंतिम फेरी गाठली. कतारमध्ये २०२२ च्या विश्वचषकात फ्रान्सने अंतिम फेरी गाठली आणि अर्जेंटिनाकडून विजेतेपदाचा सामना गमावला.

### युनूस खान अफगाणिस्तान संघाचा मार्गदर्शक

**काबुल :** पाकिस्तानचा माजी कर्णधार युनूस खान २०२५ चॅम्पियन्स चषक स्पर्धेसाठी अफगाणिस्तान क्रिकेट संघाचा मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार आहे, अशी माहिती अफगाणिस्तान क्रिकेट मंडळाच्या सूत्रांनी बुधवारी दिली. युनूसने यापूर्वी २०२२ मध्ये अल्पकालीन करारावर अफगाणिस्तानचा फलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम केले होते. २०२५ च्या चॅम्पियन्स चषकासाठी युनूस अफगाणिस्तान संघासोबत त्यांचा मार्गदर्शक म्हणून असेल याची पुष्टी झाली आहे. पाकिस्तानमध्ये स्पर्धा सुरू होण्यापूर्वी तो अफगाणिस्तान संघाच्या तयारी आणि कंडिशनिंग शिबिरात सहभागी होणार आहे व चॅम्पियन्स चषकाच्या समाप्तीपर्यंत संघासोबत असेल. युनूसने ११८ कसोटीत १०,०९९ धावा केल्यानंतर २०१७ मध्ये क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. त्याने कारकिर्दीत सर्वोत्तम ३१३ धावांची खेळी केली आहे. माजी उजव्या हाताच्या फलंदाजाने पाकिस्तानसाठी २४६ एकदिवसीय सामन्यांमध्ये ३१.२४ च्या सरासरीने ७२४९ धावा केल्या असून यात सात शतकांचा समावेश आहे. २००९ मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत त्याने पाकिस्तानचे नेतृत्व केले.

### बुमराहच्या कसोटी कर्णधारपदाला विरोध

**नवी दिल्ली :** भारताचा माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफने रोहित शर्माचा उत्तराधिकारी म्हणून जसप्रीत बुमराह याची भारताचा कसोटी कर्णधारपदी निवड करण्याबाबत आपली नाराजी व्यक्त केली आहे. बुमराहची कर्णधार म्हणून नियुक्ती केल्यामुळे त्याच्या तंदुरुस्ती व दीर्घायुष्य या दोहोंवर परिणाम होऊ शकतो, यावर कैफने भर दिला. त्याऐवजी, त्याने केएल राहुल किंवा ऋषभ पंत यांसारख्या फलंदाजांची कर्णधारपदी नियुक्ती करावी अशी शिफारस केली, त्यामुळे स्थिरता आणि कामगिरीची सातत्य सुनिश्चित होईल, असे कैफ म्हणाला. नुकत्याच पार पडलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक स्पर्धेतील सिडनी कसोटीला रोहित शर्माच्या अनुपस्थितीमुळे भारताच्या कसोटी कर्णधारपदाबाबतच्या अटकळांना जोर आला आहे. बुमराहने पर्थ व सिडनी कसोटीत भारतीय संघाचे कर्णधारपद भूषवले होते. तो या भूमिकेसाठी योग्य उमेदवार म्हणून उदयास आला आहे, परंतु ही एक चूक ठरेल, असा कैफला ठाम विश्वास आहे. बुमराहला पूर्णवेळ कर्णधार म्हणून नियुक्त करण्यापूर्वी बीसीसीआयने दोनदा विचार केला पाहिजे, असेही तो म्हणाला.

# वेध चॅम्पियन्स चषकासाठी संघ निवडीचे

**तीन खेळाडूंच्या भविष्यावर वाद होऊ शकतो ●अक्षर अन् जडेजा यांच्यात चढाओढ**


रोहित शर्मा


विराट कोहली


रवींद्र जडेजा


अक्षर पटेल

◆ **सिडनी, ८ जानेवारी**

ऑस्ट्रेलियाविरुद्धची बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिका तसेच डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीतील स्थान गमावल्यानंतर आता भारतीय क्रिकेट व्यवस्थापन आता आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धेच्या तयारीला लागले आहेत. १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेसाठी संघ निवडण्यासाठी या आठवड्याच्या शेवटी राष्ट्रीय निवड समिती एकत्र येत आहेत. दिग्गज रोहित शर्मा व विराट कोहली फॉर्मात नाही, त्यामुळे किमान तीन वरिष्ठ वन-डे खेळाडूंच्या भविष्यावर वाद होऊ शकतो.

गत वर्षीच्या विश्वचषकाचा भाग असले तरीही के. एल. राहुल, मोहम्मद शमी व रवींद्र जडेजा यांची उपस्थिती निश्चित नाही. विश्वचषकाच्या अंतिम फेरीपासून भारताने ६ वन-डे सामने खेळले. शमी व जडेजाला विश्रांती देण्यात आली असताना दक्षिण आफ्रिका व श्रीलंकेविरुद्धच्या द्विपक्षीय मालिकेसाठी राहुलचा समावेश करण्यात आला. श्रीलंकेविरुद्ध मात्र, मधल्या षटकांमध्ये अपयशी ठरल्यामुळे त्याला मालिकेच्या मध्यभागी वगळण्यात आले. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिका पराभवानंतर निवड समितीला डोळ्यात तेल घालून चॅम्पियन्स चषकासाठी संघाची निवड करावी लागइार आहे.

यशस्वी जयस्वालला एकदिवसीय संघात स्थान मिळण्याची दाट संधी असल्याचे समजते. त्याच्या समावेशामुळे डावखुरा फलंदाज अव्वल चारमध्ये स्थान मिळवेल. जर ऋषभ पंत हा यष्टिरक्षक म्हणून पहिली पसंती असेल तर के. एल. राहुलला पर्यायी खेळाडू म्हणून घेण्यात काही अर्थ नाही. ईशान किशनने विजय हजारे करंडकात पुरेशा धावा केल्या नाहीत, तर संजू सॅमसनला केरळने सुरुवातीच्या सामन्यात संधी दिली नाही.

प्रशिक्षक गौतम गंभीरने संघ निवडीच्या बाबतीत आपले म्हणणे कायम ठेवले, तर सॅमसन संघात स्थान मिळवेल. कारण तो त्याच्या वैयक्तिक आवडीपैकी एक आहे.

२० फेब्रुवारी रोजी दुबईमध्ये बांगलादेशविरुद्धच्या लढतीपासून भारतीय संघ आपल्या चॅम्पियन्स चषक अभियानाला सुरुवात करणार आहे. सुरक्षेच्या कारणास्तव भारतीय संघाने मूळ यजमान पाकिस्तानला जाण्यास नकार दिल्याने हे घडले.

रविंद्र जडेजाची पांढऱ्या चेंडूची फलंदाजी पूर्वीसारखी चांगली राहिलेली नाही आणि निवड समितीचा मागोवा घेणाऱ्यांना वाटते की अक्षर पटेल या क्षणी वन-डे सामन्यांमध्ये अधिक प्रभावी पाहिले जात आहे. त्यामुळे या दोघांमध्ये चढाओढ आहे.

वॉशिंग्टन सुंदरला ऑफ-स्पिनर म्हणून खेळण्याची अपेक्षा आहे, परंतु कुलदीप यादवच्या तंदुरुस्तीमुळे निवडकर्ते चिंतेत असतील. कुलदीप पूर्ण तंदुरुस्तीच्या जवळ आहे, पण तो विजय हजारे चषकाचा एकही सामना खेळला नाही. कुलदीप यात अपयशी ठरल्यास, रवी बिश्नोई किंवा वरुण चक्रवर्ती यांच्यापैकी एकाची निवड करणे अपेक्षित आहे.

**शमीची तंदुरुस्ती अस्पष्ट**

अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याच्या तंदुरुस्तीबाबत स्थिती आवश्यतक स्पष्टता दिसत नाही. तथापि, त्याने गत दोन विजय हजारे चषक सामन्यांमध्ये प्रत्येकी आठ षटके टाकली आहेत. जर जसप्रीत बुमराह पाठीच्या दुखण्यामुळे खेळू शकला नाही, तर शमीचा अनुभव संघासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

अष्टपैलू हार्दिक पांड्या हा सीम बॉलिंग अष्टपैलू खेळाडू असून नितीश कुमार रेड्डीचा विचार केला जाणार की नाही, हे बघणे उत्सुकतेचे ठरेल. राखीव तज्ज्ञ फलंदाजांमध्ये रिंकू सिंग व टिळक वर्मा यांच्यात निवड होऊ शकते.

(वृत्तसंस्था)

**चॅम्पियन्स चषकासाठी संभाव्य भारतीय संघ**

रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, यशस्वी जयस्वाल, विराट कोहली, के. एल. राहुल, ऋषभ पंत, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, चक्रवर्ती/रवी बिश्नोई, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, आवेश खान/मोहम्मद शमी, रिंकू सिंग/टिळक वर्मा.



# सर्वाधिक विद्यार्थी सहभागाचा सन्मान चतुरबाई श्राविका विद्यालयास

**सोलापूर जिल्हा योग परिषद आयोजित जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि. ८ जानेवारी,**

जिल्हास्तरीय खुल्या योगासन स्पर्धेत या स्पर्धांमध्ये सर्वाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग असणाऱ्या शाळेचा सन्मान श्री चतुरबाई श्राविका विद्यालय या शाळेस मिळाला. तसेच अन्य २० शाळांना २०० हून अधिक सहभागासाठी सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

सोलापूर जिल्हा योग परिषद, रोटरी क्लब ऑफ सोलापूर व राणी कित्तूर चन्नम्मा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धा नूतन मराठी विद्यालयात झाल्या. यातील विविध वयोगटातील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेमध्ये प्राथमिक फेरीत विविध वयोगटात एकूण ९ हजार ५०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यातून निवडलेल्या जिल्हा स्पर्धेच्या अंतिम फेरीत एकूण ६७२ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. विविध २० वयोगटात या स्पर्धा अत्यंत चुरशीच्या व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यातून एकूण ४५ शाळांनी व एका महाविद्यालयाने सहभाग नोंदविला.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ लोकमंगल कॉलेजच्या सचिवा डॉ. अनिता ढोबळे यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी योग परिषदेच्या अध्यक्षा स्नेहल पेंडसे, स्वाती कुरनूरकर, रोहिणी गोरे, रोटेरियन सुनील माहेश्वरी, रोटेरियन ब्रिजकुमार गोयदानी, रोटेरियन जयेश पटेल तसेच राणी कित्तूर चन्नम्मा प्रतिष्ठानच्या कृपा देशमुख, सुमेधा पटवर्धन, गायत्री सुमंत यांची प्रमुख उपस्थिती होती. रुपेश सांगे, ऋषिकेश पेदलू, ऋषिकेश पुठ्ठा, प्रणाली शिंदे व जान्हवी चंदनशिवे या सोलापूर जिल्ह्यातील खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

**विविध वयोगटातील गुणानुक्रमे प्रथम तीन**

**लहान, मोठा गट मुले** - ऋषिकेश होनमाने, अभय शिंदे , नैतिक करवा, मुली - इशिका मंगलपल्ली, आर्वी जाखोटीया, सिद्धी बरबडे. **पहिली, दुसरी मुले** - अद्वैत कुलकर्णी, सुजय पाटील, हर्ष मुसळे, मुली - राजनंदिनी जाधव, यशश्री दामा, श्रेया हारके. **तिसरी, चौथी मुले** - माधवानंद सोमाणी, आरव करवा, चारिश हिंगणे, मुली - रुही नीमाणी, गार्गी आळगीकर, आरोही कटके. **पाचवी, सहावी मुले** - समर्थ गवळी, लोखोन सारंभम, अपूर्व ओझा, मुली - अल्पना कुचन, जानवी आडके, सानिका शिंदे. **सातवी, आठवी मुले** - पार्थ भट्टड, ओंकार शिंदे, साई किरण गुजर, मुली - आराध्या बडगु, तनवी चव्हाण, वैभवी आकुडे. **नववी, दहावी मुले** - शिवराज काळे, अनुष कासवदे, मिस्किन राजू ,मुली - संजना बावळे, वसुधा स्वामी, वैष्णवी भोसले.

**१६ ते २५ वयोगट मुले** - आदित्य जगताप, गौतम जल्ला, ऋतिक कुरले, मुली - श्रेया कारळे, साक्षी सुरवसे, निधी निमाणी. **२५ ते ३५ वयोगट पुरुष** - राजेंद्र अनवते, अंबादास चाबुकस्वार, प्रमोद फुलारी, महिला - प्रतिमा स्वामी, दिपाली दुरुगकर, स्नेहल पुजारी. **३५ ते ५० पुरुष** - राजेंद्र गायकवाड, अजित कलागते, घनश्याम ननकांनी, महिला - अर्चना चलवादी, दिव्या राका, प्रतीक्षा करंडे. **५० वर्षावरील पुरुष** - जीवन कुमार अवताडे, प्रभाकर हजारे, शशीशेखर पाटील, महिला - जयश्री उमरजीकर, शांता सांगा, प्रतिभा टेकाडे.

# रागिणी क्लबच्या दोघी सोलापूर विद्यापीठ संघात निवड

**अंजली चिट्टे व कार्तिकी देशमुखचा समावेश, अंजली कर्णधार**





**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विघापीठ संघात येथील रागिणी वुमेन्स क्रिकेट क्लबच्या अंजली चिट्टे व कार्तिकी देशमुख या महिला खेळाडूची निवड झाली. अंजलीकडे कर्णधार पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

अजंलीने सोलापूर जिल्हा संघाची कर्णधार होती. अनेकदा महाराष्ट्र कॅम्प, विद्यापीठ व स्कूल नॅशनलच्या संघातुन खेळली. कार्तिकी देशमुख जिल्हा संघात खेळली. महाराष्ट्र कॅम्पला गेली आहे. ती प्रथमच तिची विद्यापीठ संघात निवड झाली. क्लबचे संस्थापक मल्लिनाथ याळगी यांनी अभिनंदन केले.

### मोहन बागान-ईस्ट बंगाल लढत गुवाहाटी येथे होणार

**कोलकाता :** इंडियन सुपर लीग फुटबॉल स्पर्धेत ११ जानेवारी रोजी होणारा ईस्ट बंगाल एफसी विरुद्ध मोहन बागान सुपर जायण्ट यांच्यादरम्यानचा 'कोलकाता डर्बी' सामना कोलकाता येथून गुवाहाटी येथे हलविण्यात आला आहे. आता सामना गुवाहाटी येथील इंदिरा गांधी ॲथलेटिक स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.



## राज्य धनुर्विद्या स्पर्धेत छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची कामगिरी

**सोलापूर, दि. ८ जानेवारी,**

नांदेड येथे झालेल्या राज्य शालेय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी रात्र कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यामध्ये आर्चरी रिकर्व प्रकारात साईराज हनमे, सांघिक सुवर्णपदक व सिद्धार्थ साखरे यांनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदक मिळविले. प्रेरणा हरिदास हिने मुलींच्या गटात कंपाऊंड प्रकारात सांघिक सुवर्णपदक मिळविले.

या खेळाडूंचा संस्था अध्यक्ष माजी महापौर मनोहर पंत सपाटे, सचिव प्रा महेश माने व प्राचार्य मंजुश्री सपाटे-पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या खेळाडूंना आर्चरीचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक दीपक चिकणे, प्रा. संतोष गवळी, प्रा सचिन गायकवाड, मारुती घोडके यांचे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल प्रा अश्विन नागणे, प्रा हरीश गरड, प्रा शंभू देव गावडे, प्रा अमर पवार, प्रा जगन्नाथ पांढरे यांनी शैक्षणिक साहित्य देऊन गौरव केला.

# सोलापुरात शनिवारपासून राज्यशस्त्र दांडपट्टा राज्य अजिंक्यपद स्पर्धा

**सब जुनिअर, ज्युनियर, सीनियर मुले व मुली या गटात होणार स्पर्धा**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जानेवारी-**

ट्रेडिशनल दांडपट्टा स्पोर्टर्स असोसिएशन, महाराष्ट्रतर्फे ११ व १२ जानेवारीला राज्यशस्त्र दांडपट्टा राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन केले आहे, अशी माहिती राज्य सचिव अश्विन कडलासकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांच्या जयंतीच्या निमित्ताने सिंहगड इन्स्टिट्यूट कॉलेज केगाव या ठिकाणी राज्यशस्त्र म्हणून महाराष्ट्र शासनाने घोषित केलेल्या दांडपट्टा शिवकालीन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या शस्त्राची स्पर्धा आयोजित केली आहे. यामध्ये रत्नागिरी, मुंबई, मुंबई उपनगर, धुळे, ठाणे, धाराशिव,सोलापूर, नांदेड, जालना, लातूर, पुणेसह ११ जिल्हे या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

ज्या शस्त्राचा जोरावर स्वराज्य निर्माण झाले ते शस्त्र म्हणजेच दांडपट्टा हे शस्त्र जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन आपल्या ऐतिहासिक वारसा लाभलेला खेळाची माहिती सात समुद्रा पार जावी आणि उत्तम खेळाडू यामध्ये निर्माण व्हावेत या हेतूने एकेरी पट्टा, दुहेरी पट्टा , संघ हातपट्टा, पट्टा पवित्र अशा चार विभागात ही स्पर्धा होणार आहे. यामध्ये विजयी संघास प्रथम, द्वितीय,तृतीय चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सहभागी खेळाडूंना पदक व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे ही ऐतिहासिक राज्यस्तरीय स्पर्धा प्रथमच होत आहे. सब ज्युनिअर, ज्युनियर, सीनियर मुले व मुली या गटात ही स्पर्धा होईल. ११ जानेवारी रोजी या स्पर्धेची सुरुवात होणार असली तरी प्रत्यक्षात दि. १२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता या स्पर्धेचा औपचारिक शुभारंभ कार्यक्रम खा. प्रणिती शिंदे, आ. विजयकुमार देशमुख, विशेष सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंह राजपूत यांच्या हस्ते होणार आहे

या पत्रकार परिषदेस असोसिएशनचे प्रदेश अध्यक्ष शिवराम भोसले, जिल्हा कार्याध्यक्ष पैलवान युवराज सरवदे, मार्गदर्शक उपमहाराष्ट्र केसरी पैलवान भरत मेकाले उपस्थित होते.

# भारत-नेपाळमध्ये उद्घाटनीय सामन्याचा थरार

**पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा १३ जानेवारीपासून**

**विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर**



◆ **नवी दिल्ली, ८ जानेवारी**

जग पहिल्या ऐतिहासिक खो-खो विश्वचषकाचा थरार अनुभवण्यासाठी सज्ज झाले आहे. आगामी १३ ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये होणाऱ्या या प्रतिष्ठित स्पर्धेत पुरुष व महिलांचे ३९ संघ चुरशीचा खेळ करत विजेतेपदावर दावा करणार आहेत. या स्पर्धेने खो-खोला आंतरराष्ट्रीय खेळ म्हणून मान्यता मिळणार आहे. पुरुष गटाचा सलामीचा सामना भारत आणि नेपाळ यांच्यात होणार आहे, तर महिलांचा सलामीचा सामना इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणार आहे.

**उद्घाटन अन् प्रसारण**

१३ जानेवारीला रंगणाऱ्या उद्घाटन सोहळ्यानंतर भारत आणि नेपाळ यांच्यातील सलामीचा सामना रात्री ८:३० वाजता होणार असून स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवरील स्टार स्पोर्ट्स १ एचडी आणि स्टार स्पोर्ट्स फर्स्ट वाहिन्यांवर या सामन्यांचे थेट प्रक्षेपण होईल, तर दूरदर्शन प्रादेशिक स्तरावर देशभरात कव्हरेज देणार आहे. डिस्ने+ हॉटस्टार डिजिटल प्लॅटफॉर्मवर थेट प्रवाहाची सुविधा उपलब्ध करून देणार आहे.

**पुरुष गट : संघ विभाजन व महत्त्वाचे सामने**

पुरुष गटात २० संघ चार गटांमध्ये गेले आहेत. गट अ: भारत, नेपाळ, पेरू, ब्राझील, भूतान. गट ब : दक्षिण आफ्रिका, घाना, अर्जेंटिना, नेदरलॅण्ड, इराण. गट क : बांगलादेश, श्रीलंका, दक्षिण कोरिया, अमेरिका, पोलंड. गट ड : इंग्लंड, जर्मनी, मलेशिया, ऑस्ट्रेलिया, केनिया

**महिला गट : संघ विभाजन आणि महत्त्वाचे सामने**

महिला गटात १९ संघ चार गटांमध्ये विभागले गेले आहेत. गट अ : भारत, इराण, मलेशिया, दक्षिण कोरिया. गट ब : इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, केनिया, युगांडा, नेदरलॅण्ड. गट क : नेपाळ, भूतान, श्रीलंका, जर्मनी, बांगलादेश. गट ड : दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, पोलंड, पेरू, इंडोनेशिया.

महिला गटातील सलामीचा सामना १४ जानेवारी रोजी सकाळी ११:४५ वाजता इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणार आहे. भारतीय महिला संघाचा पहिला सामना १४ रोजी संध्याकाळी ७:०० वाजता दक्षिण कोरियाविरुद्ध होईल.


गटातील साखळी फेरीचे सामने १६ जानेवारीपर्यंत खेळले जातील. तर बाद फेरीचे म्हणजे उपांत्यपूर्व फेरीचे सामने १७ जानेवारीपासून सुरू होईल आणि महिलांचा अंतिम सामना १९ जानेवारी रोजी संध्याकाळी ७:०० वाजता खेळवला जाईल तर पुरुषांचा अंतिम सामना रात्री ८:१५ वाजता रंगेल.

**स्पर्धा स्वरूप**

प्रत्येक गटातील दोन अव्वल संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरतील. यानंतर उपांत्य फेरी आणि अंतिम फेरी होईल.

**खो-खोचा जागतिक प्रवास**

ही ऐतिहासिक स्पर्धा खो-खोला आंतरराष्ट्रीय ओळख मिळवून देणारी ठरणार असून भारताच्या सांस्कृतिक वारशाचा आणि साहसी खेळाला प्रेक्षकांसमोर सदर करेल. इंदिरा गांधी स्टेडियमवर होणाऱ्या या स्पर्धेत उत्कंठावर्धक सामन्यांची मेजवानी प्रेक्षकांसाठी सज्ज आहे. (वृत्तसंस्था)



## मास्टर्स लॉन टेनिस स्पर्धेत सोलापूरचे गार्गी ओक व यशवंतराजे पवार विजयी

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

राज्यस्तरीय मास्टर्स लॉन टेनिस स्पर्धेत सोलापूरचे गार्गी ओक व यशवंतराजे पवार यांनी अजिंक्यपद पटकाविले.

महाराष्ट्र संघटनेने १० व १२ वर्षाखालील गटात प्रथम ८ मानांकन असलेल्या मुला व मुलींसाठी मुंबई येथे आयोजित केली होती. या स्पर्धेत १० वर्षाखालील मुलींच्या गटात सोलापूरच्या प्रथम मानांकित गार्गीने ७ पैकी ६ सामने जिंकून तर १२ वर्षाखालील मुलांच्या गटात सोलापूरच्या तृतीय मानांकित यशवंतराजेने ७ पैकी ७ सामने जिंकून प्रथम क्रमांक पटकावला. त्यामुळे त्यांना या वर्षात अधिकचे गुण प्राप्त होणार असून मानांकनात वाढ होणार आहे. इम्रान शेख हे गार्गीचे तर सुधीर सालगुडे हे यशवंतराजेचे प्रशिक्षक आहेत . त्यांच्या या यशाबद्दल सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी व मानद सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### माँ आयेशा अरबी मदरसातर्फे वृक्षप्रेमी दुरगुडे यांचा सत्कार

**करमाळा, दि. ८ जानेवारी-**

करमाळा शहरातील माँ आयेशा अरबी मदरसा व मदरसा ट्रस्ट करमाळा यांच्या वतीने करमाळा नगरपरिषदेचा बागमाळी किरण दुरगुडे यांचा करमाळा नगरपरिषद चे मुख्याधिकारी सचिन तपसे यांच्या शुभहस्ते सन्मानपत्र हार, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी करमाळा अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष फारुक जमादार, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण राख, माजी नगरसेवक प्रवीण जाधव, खादी ग्रामोद्योगचे अध्यक्ष विजय सुपेकर, अरबी मदरश्याचे विश्वस्त साजीद बेग सामाजिक कार्यकर्ते जहाँगीर बेग, आलीम खान, जावेद शेख आदींच्या उपस्थित करण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी तपसे म्हणाले की, किरण दुरगुडे हा करमाळा नगरपरिषदेचा बागमाळी असुन तो वृक्ष लागवड बाबतीत करमाळा शहरातील नागरिकांना वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून देऊन त्यांना झाडे लावण्यास प्रवृत्त करत आहे व त्याचे संगोपन करण्यास प्रोत्साहन देत आहे त्याच्या या कामाची दखल घेऊन करमाळा येथील माँ आयेशा अरबी मदरशा च्या विश्वस्तांनी केलेला सन्मान दुरगुडे यांना प्रोत्साहन देणारा ठरेल असे ते यावेळी म्हणाले यावेळी नगरपरिषदेचे बांधकाम अभियंता अश्विनी जाधव,फलके उपस्थित होते. हा सत्कार समारंभ यशस्वी करण्यासाठी मदरश्याचे अध्यक्ष हाजी अतिक बेग, हाजी शकील बागवान,नासीर कबीर आदी जणांनी परिश्रम घेतले शेवटी आभार फिरोज बेग यांनी मानले.

### ॲड. विशाल सक्री छत्रपती संभाजीनगर येथे सहाय्यक अभियोक्ता म्हणून रुजू

**माढा, दि. ८ जानेवारी-**

माढा येथील ॲड. विशाल प्रकाश सक्री यांची सहाय्यक सरकारी अभियोक्ता (गट-अ) म्हणून छत्रपती संभाजीनगर येथे नुकतीच नियुक्ती झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन- २०२२ च्या जाहिराती नुसार या पदा करीता त्यांची सरळ सेवा भरती पद्धतीने लेखी व मौखिक परीक्षेद्वारे निवड झाली होती. यापुर्वी ते माढा येथील न्यायालयात विशेष सहाय्यक सरकारी वकील म्हणून कार्यरत होते. या काळात त्यांनी अनेक फौजदारी खटल्यात सरकारतर्फे महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्यामुळे त्यांचा नावलौकिक चांगला होता.



सुरुवातीच्या काळात त्यांनी माढा येथे खाजगी वकील म्हणून तर त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, बार्शी येथे विधी अधिकारी म्हणून देखील काम केले आहे. या क्षेत्रात त्यांनी साधारण वीस वर्षे काम केले आहे. याच प्रदीर्घ अनुभवाचा व परिश्रमाचा या यशात त्यांना फायदा झाला आहे. कै. ॲड. डी. व्ही. सक्री यांचे ते नातू असून कै. प्रकाश सक्री यांचे चिरंजीव आहेत. तसेच फार्मासिस्ट विजयकुमार सक्री यांचे ते धाकटे बंधू आहेत. त्यांच्या या यशाबद्दल माढा परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

### उत्तम जानकरांनी महिलांची माफी मागावी : अक्षय भांड

**नातुपते, दि. ८ जानेवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी जो आदर्श घालून दिला त्या आदर्शावर आज पर्यंत आपण चालतो महिलांच मानसन्मान राखणे, त्यांना संरक्षण देणे ही महाराजांची शिकवण घेऊन आपण पुढे चालत आहोत. पण या महाराष्ट्रामध्ये कमी दिवसामध्ये स्वतःला प्रसिद्धी मिळावी म्हणून सतत धडपडणारे अपघाताने आमदार झालेले उत्तम राव जानकारांनी एका टीव्ही चॅनेलवर बोलताना स्त्रियांबद्दल जे चुकीचे वक्तव्य केले, त्याचा मी निषेध करतो जे स्त्रीयांचा आदर करत नाहीत. ते



काय तालुक्याचा विकास करणार उत्तम जाणकर यांच्या डोक्यावर परिणाम झाला असल्याचे युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष अक्षय भांड यांनी नातेपुते येथे सांगितले. ते पुढे म्हणाले, उत्तम जानकर काय बोलतात याचे भान त्यांना राहत नाही. या वक्तव्याबाबत माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### करमाळ्यात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

**करमाळा, दि. ८ जानेवारी-**

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या माध्यमातुन ग्रंथालय संचालनालय मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वर वाचन मंदिर मुक्तदार वाचनालय करमाळा नगरपरिषद येथील वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत ग्रंथालयत स्वच्छता मोहीम राबवून ग्रंथालयातील निवडक



ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी हा उद्देश समोर ठेऊन जास्तीत जास्त विद्यार्थी ग्रंथालयाकडे कसे वळतील हा प्रयत्न करण्यात येणार आहे. यावेळी विकी कांबळे, रोहित चौकटे, अजिम खान, संदिप आव्हाड, अमित कांबळे, दत्तात्रय घोलप, प्रदिप चौकटे, अमोगसिध्द परशेट्टी उपस्थित होते.

### वडशिंगेच्या सुनील जाधव यांना सलग चौथ्यांदा एमडीआरटी पुरस्कार

**माढा, दि. ८ जानेवारी-**

माढा तालुक्यातील वडशिंगे येथील सुनिल जाधव यांनी एलआयसी या क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा व प्रतिष्ठित समजला जाणारा आंतरराष्ट्रीय दर्जाचा एमडीआरटी २०२४ हा बहुमुल्य बहुमान सलग चौथ्यांदा मिळवला आहे. वडशिंगे सारख्या ग्रामीण भागातून असलेल्या सुनिल जाधव यांनी आपल्या करियरसाठी नोकरीच्या मागे न लागता प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अनेक अडचणींचा सामना करीत विमा क्षेत्रात आपले करिअर घडवण्याचा निर्धार केला. जाधव यांना भारतीय



आयुर्विमा महामंडळ बार्शीचे विकास अधिकारी उन्मेश पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. सरपंच दत्तात्रय जाधव, बुद्रुकवाडीचे सरपंच संदीप पाटील, दादासाहेब पारडे यांनी अभिनंदन केले.

# पोलीस पाटील गाव, प्रशासनातील महत्त्वाचा दुवा

**▸ उपविभागीय अधिकारी इथापे : पंढरपुरात पोलीस पाटलांची कार्यशाळा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ जानेवारी-**

पोलीस पाटील हे गाव आणि प्रशासनातील महत्वाचा दुवा असल्याने गावातील इत्यंभूत माहिती प्रशासनाला मिळते. पोलीस पाटलांच्या मदतीने प्रशासन देखील शेवटच्या घटकापर्यंत पोहचते म्हणून गावखेड्यात पोलीस पाटलांचे महत्व टिकून असल्याचे मत पंढरपूर उपविभागीय अधिकारी इथापे यांनी व्यक्त केले.

पंढरपूर उपविभागीय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या गावच्या पोलीस पाटलांची कार्यशाळा ७ जानेवारी रोजी पंढरपूर येथे आयोजित करण्यात आली होती.यावेळी ते बोलत होते. या वेळी बोलताना इथापे म्हणाले की, निवडणूक काळात पोलीस पाटलांची मोठी मदत मिळाली आहे. आजपर्यंत पोलीस पाटील यांनी पोलीस व म हसूल प्रशासनाचे समाधान कारक काम केले असल्याचे सांगताना पुढील काळातही चांगल्या कामाची अपेक्षा व्यक्त केली. आम च्या स्तरावरील ज्या काही पोलीस पाटील यांच्या मागण्या असतील त्या पूर्ण करण्याचे आश्वासन देखील इथापे यांनी दिले.

२०१८ साली अनेक नवीन पोलीस पाटील यांची नियुक्ती करण्यात आली परंतु कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले नव्हते. बऱ्याच वर्षातून कार्यशाळा आयोजीत केल्याबद्दल पोलीस पाटलांनी समाधान व्यक्त केले. जिल्हाध्यक्ष नानासाहेब शिंदे यांनी पोलीस पाटलांना मार्गदर्शन केले. पंढरपूर अध्यक्ष विजय वाघमारे यांनी प्रास्ताविक केले.कार्यशाळे प्रसंगी पोलीस पाटील संघटनेचे राज्याचे अध्यक्ष दिलीप पाटील, राज्य उपाध्यक्ष प्रशांत पाटील, राज्य सचिव साधना देठे, राज्य प्रसिद्धी प्रमुख तोफिक शेख, नानासाहेब शिंदे प्रमुख उपस्थित होते.



> पोलीस पाटील चोवीस तास तत्पर राहून पोलीस व महसूल प्रशासनाला मदत करतात. परंतु जिल्ह्यांतील काही घटनांमध्ये पोलीस पाटलांच्या मागे प्रशासन खंबीरपणे राहताना दिसले नाही, तरी प्रशासनाने पोलीस पाटलांना पाठबळ द्यावे.पंढरपूर उपविभागातील रिक्त गावच्या पोलीस पाटील पदाची तात्काळ भरती करावी.
> **- तौफिक शेख,** प्रसिद्धी प्रमुख, पोलीस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य



> पोलीस पाटलांनी आपल्या अधिकाराचा योग्यप्रकारे वापर करावा. पोलीस पाटील अधिकार व कर्तव्ये अशा कार्यशाळेच्या माध्यमातून आपल्याला माहिती मिळते. पाटलांनी वेळोवेळी तहसीलदार उपविभागीय अधिकारी यांचे मार्गदर्शन घेऊन कर्तव्ये पार पाडावीत.पोलीस पाटलांनी पोलीस पाटील अधिनियम १९६७ प्रमाणे काम करून प्रशासनाला मदत व गावकऱ्यांना न्याय द्यावा.
> **- दिलीप पाटील,** राज्य अध्यक्ष, पोलीस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य

## व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ जानेवारी-**

६ जानेवारी मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त व्हॉईस ऑफ मीडिया बार्शी शहर व तालुक्याच्यावतीने ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमात पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिम ेचे पूजन व पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बार्शी शहरचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, तालुकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ, डिजीटल विंगचे प्रदेशअध्यक्ष हर्षद लोहार, राज्य सचिव



इर्शाद शेख, वैद्यकीय अधिकारी शीतल बोपलकर, ज्येष्ठ पत्रकार एन.आर.कुलकर्णी, अरुण बळप, बा.न.पा.चे माजी मुख्याध्याकारी शिवाजीबप्पा पाटील, साप्ताहिक विंगचे सोलापूर जिल्हाध्यक्ष अमोल आजबे, शहराध्यक्ष शाम थोरात, तालुकाध्यक्ष अस्लम काझी व्यासपीठावर उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार वैजयंती शंकर भिसे, रमेश रामराव गायकवाड, प्रशांत काळे, संजय बोकफोडे, आनंद डुरे यांना सन्मानचिन्ह, देऊन सन्मान करण्यात आला. सन्मानित पत्रकारांनी आपल्या भाषणातून पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांचा व महत्त्वाचा आवर्जून उल्लेख केला. त्यांनी तरुण पत्रकारांना मार्गदर्शन करताना सत्य आणि निर्भीड पत्रकारितेचा आग्रह धरला. सूत्रसंचालन साप्ताहिक विंगचे पश्चिम महाराष्ट्र संघटक संदीप आलाट यांनी केले तर आभार शहर सचिव निलेश झिंगाडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी व्हॉईस ऑफ मीडिया बार्शीचे विजय शिंगाडे, मयुर थोरात, ओंकार हिंगमिरे, समाधान चव्हान, प्रदिप माळी, प्रविण पावले, जमीर कुरेशी, उमेश काळे, गोविंद भिसे, विक्रांत पवार, भूषण देवकर, श्रीशैल्य माळी, सौ. संगीता पवार, सौ.सुवर्णा शिवपुरे, स्वप्निल पवार, निलेश उबाळे, सुशेन डमरे, राहुल भालशंकर, राहुल गुरव, कौठाळकर, सागर गरड, संजय बोकेफोडे, संतोष राजगुरु, आसिफ मुलानी, अजीम शेख, गणेश अडसूळ यांनी परिश्रम घेतले. बार्शी शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या सोहळ्याला उपस्थिती लावली. पत्रकारितेचा हा सन्मान नव्या पिढीला प्रेरणा देईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## दुचाकी अपघातात एका युवकाचा मृत्यू; दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग दि ८ जानेवारी-**

राळेरासजवळ दोन दुचाकीची समोरासमोर धडक बसून झालेल्या अपघातामध्ये एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. अन्य दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.



हा अपघात मंगळवारी रात्री नऊच्या सुमारास घडला असून यामध्ये मयत झालेल्या युवकाचे नाव सौरभ ज्ञानदेव काळे असे आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ येथून काम आटपून दुचाकी वरती बार्शी तालुक्यातील काळेगाव येथे सौरभ ज्ञानदेव काळे (वय २४, रा. काळेगाव) आणि स्वप्निल दत्तात्रय गायकवाड (वय २३, रा. काळेगाव) हे दोघेही परतत असताना राळेरासजवळ आले असता समोरून वैरागहून राळेरासकडे येणाऱ्या दुचाकीची समोरासमोर जोरदार धडक झाली. अपघात एवढा भयंकर होता की धडक बसताच सौरभ ज्ञानदेव काळे हा जागीच मयत झाला तर स्वप्निल दत्तात्रय गायकवाड हा गंभीर जखमी झाला असून त्यास पुढील उपचारासाठी दवाखान्यात तातडीने दाखल करण्यात आले आहे. तर दुसऱ्या दुचाकी वरील राळेरास येथे राहणारा मनोज भोसले हे देखील जखमी झाले असून त्यासही पुढील उपचारासाठी दवाखान्यामध्ये दाखल करण्यात आले आहे.

## उपळाईच्या कमल जगताप यांना जिजाऊ सन्मान पुरस्कार

**सह्याद्री परिवारातर्फे माढ्यात जिजाऊ, सावित्री जन्मोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ८ जानेवारी-**

मॉसाहेब जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मोत्सवानिमित्त माढ्यातील फक्त सह्याद्री बहुउद्धेशीय संस्थेच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन व जिजाऊ पुरस्काराचे वितरण करण्यात येते त्याचप्रमाणे याही वर्षी ११जानेवारी शनिवारी हा कार्यक्रम घेण्यात येणार आहे.



तसेच उपळाईच्या कमल म हादेव जगताप यांना २०२५ चा जिजाऊ सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष दत्ताजी शिंदे यांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराज नगर मधील जिजाऊ सृष्टी येथे दि.११ रोजी सायंकाळी साडे सहा वाजता १४ वर्षाखालील स्पर्धकाच्या डान्स स्पर्धा होतील. ७ हजार, ५ हजार, ४ हजार, ३ हजार, २ हजार, १ हजार ५०० अशी ७ रोख बक्षीसे ठेवण्यात आली असून स्पर्धेतील यशस्वी व सहभागी स्पर्धकांना सन्मानपत्रक,पुस्तक देऊन गौरवण्यात येईल आहे. स्पर्धेची नावनोंदणी ९४२३३२९८१, ९०९६८७६००, ९४२१०२९५०३ या क्रमांकावर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जिजाऊ ब्रिगेडच्या पुणे विभागीय अध्यक्षपदी प्रा. मीनाक्षी जगदाळे

**टेंभुर्णी, दि. ८ जानेवारी-**

मराठा सेवा संघ प्रणित, जिजाऊ ब्रिगेडची बैठक प्रदेश महासचिव स्नेह खेडेकर आणि प्रदेश अध्यक्ष सीमा प्रेमकुमार बोके यांच्या उपस्थितीत पुणे येथे पार पडली.



यावेळी प्रा. मीनाक्षी अमोल जगदाळे यांची पुणे विभागीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, प्रेमकुमार बोके, अमोल जगदाळे, सोमनाथ राऊत, नंदाताई शिंदे, निर्मलाताई शेळवणे, अक्का माने, प्रिया नागणे, वनिता कोरटकर, हेमलता मुलिक, बोराडे, समाधान माने, अश्विनी पाटील, संपूर्णा सावंत, सोनाली शिंदे, उज्ज्वला कदम उपस्थित होत्या.

## डॉ. श्रीधर यलमार यांच्या श्रीराम मंदिराच्या पोस्ट तिकिटाचे अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ जानेवारी-**

भारत सरकारच्या वतीने पोस्ट विभागाच्या माध्यमातून अखंड हिंदू समाजाचे दैवत असणाऱ्या प्रभू रामचंद्राच्या अयोध्या येथील नवीन मंदिराचे पोस्टाचे तिकीट प्रकाशित करण्यात आले असून सदर तिकीट देशभरातील तिकीट संग्रह करणाऱ्या व्यक्तींना पाठवण्यात आले आहे. भंडीशेगाव येथील डॉ. श्रीधर येलमार यांच्याकडे देखील हे तिकीट आले असून या पोस्ट तिकिटाचे प्रथम अनावरण श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर येथे करण्यात आले. यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज शोत्री उपस्थित होते.



यावेळी भारत सरकारच्या माध्यमातून अतिशय सुंदर असे श्री प्रभू रामचंद्राचे पोस्टाचे तिकीट आणि त्याला अतिशय सुबक अशी फ्रेम बनवून सदर तिकीट पोस्टाच्या माध्यमातून देशभरात पाठवण्याचा संकल्प केंद्र सरकारच्या वतीने करण्यात आलेला आहे. अशाच प्रकारचे तिकीट भारत सरकारच्या पोस्ट विभागाच्या वतीने देशभरातील फिलाटेलिया सदस्यांना सर्वात प्रथम ही तिकिटे पाठवण्यात आली.अशा प्रकारचे तिकीट पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव येथील तिकीट संग्रहक डॉ. श्रीधर यलमार यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी या तिकिटाचे प्रथम प्रकाशन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये करण्याचे नियोजन केले. यावेळी गिरीश आराध्ये, प्रल्हाद होटे आदी उपस्थित होते. लवकरच या पोस्ट तिकट्याचे पंढरपूर तालुक्यात मोठ्या थाटामाटात प्रकाशन करण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती पोस्ट तिकिट संग्रहक डॉ. श्रीधर येलमार यांनी यावेळी सांगितले.

# अकलूज येथे अखिल भारतीय त्रिमूर्ती चषक

**▸ सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती, प्रताप क्रीडा मंडळातर्फे वजन गट कुस्ती स्पर्धेचे १२ जानेवारीपासून आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ जानेवारी-**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने शिवतीर्थ आखाडा शंकरनगर-अकलूज येथे १२, १३ व १४ जानेवारी या कालावधीत अखिल भारतीय त्रिमूर्ती चषक स्पर्धा व वजन गट कुस्ती स्पर्धेचे आयोजन केल असल्याची माहिती जयंती समारंभ समितीचे अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

सहकार महर्षी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत मोहिते-पाटील यांनी ही माहिती दिली. यावेळी वसंतराव जाधव, महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, सचिव बिभीषण जाधव, बाळासाहेब सावंत,अरविंद वाघमोडे,उमेश भिंगे, विश्वास शेवते,सतिश शेखर प्रमुख उपस्थित होते.

वसंतराव जाधव म्हणाले, स. म. शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व त्रिमूर्ती कुस्ती स्पर्धेचे स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली सदरच्या स्पर्धा संपन्न होत आहेत.

मदनसिंह मोहिते-पाटील पुढे बोलताना म्हणाले, स्पर्धेचे हे ४६ वे वर्ष आहे. स्पर्धेत दिल्ली, हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र येथील राष्ट्रीय स्तरावरील मल्ल सहभागी होतात. त्रिमूर्ती केसरी कुस्ती स्पर्धेसाठी खुल्या गटाकरिता प्रथम क्रमांकाचे बक्षिस त्रिमूर्ती केसरी चषक व दोन लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दीड लाख रुपये, तृतीय क्रमांकासाठी एक लाख रुपये व चतुर्थ क्रमांकासाठी पन्नास हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आले आहेत. तर वजनी गटासाठी २५ ते ८५ किलो पर्यंत एकूण १५ गटानुसार विजेत्या व पराजित मल्लांनाही भव्य बक्षीस दिली जातात. या स्पर्धेत एकूण सुमारे ११ लाखाची रोख बक्षीसे असून सुमारे ७५० मल्ल या स्पर्धेत सहभागी होतील. सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूजच्या वतीने कला, क्रीडा, साहित्य, पुरस्कार असे विविध उपक्रम राबवून सांस्कृतिक आणि क्रीडा चळवळ गतिमान करण्याचा प्रयत्न केला जात आहे.



**नामांकित मल्ल सतपाल करणार उद्घाटन**

१२ रोजी सायंकाळी ४ वाजता स्पर्धेला प्रारंभ होणार असून १४ रोजी सायंकाळी ५ वाजता स्पर्धेचा बक्षीस समारंभास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्यासह प्रमुख पाहुणे पद्मश्री पुरस्कार, अर्जुन पुरस्कार व रुस्तमेहिंद पुरस्कार प्राप्त नामांकित मल्ल सतपाल यांच्या हस्ते होणार आहे. दि.१२ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत मल्लांनी आपली वजने शिवतिर्थ आखाड्यात देण्याचे आवाहनही मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. आभार उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील यांनी मानले.



## लाडली फाऊंडेशन पाच हजार स्कूल बॅग वाटणार

**विजयपूर, दि. ८ जानेवारी-**

स्वच्छता हा आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याचा पाया आहे. त्याचवेळी स्वच्छता हा आध्यात्मिक उन्नतीचा आणि उज्ज्वल भविष्याचा मुख्य मंत्र आहे, असे लाडली फाउंडेशनच्या प्रभारी कुमारी शिफा जमादार यांनी सांगितले.

विजयपूर शहरातील रिमांड होम येथील शासकीय उच्च माध्यमिक विद्यालयात लाडली फाऊंडेशनच्या सहकार्याने स्कूल बॅग वाटप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. उच्च कामगिरीसाठी चांगले आरोग्य आवश्यक आहे, तसेच चांगल्या आरोग्यासाठी स्वच्छता आवश्यक आहे. स्वच्छता नसेल तर अनेक रोग आपल्या जीवनावर परिणाम करतात. जे आपल्या भविष्यासाठी घातक ठरतील. त्यामुळे आजारांपासून बचाव करण्यासाठी स्वच्छता हा जीवनाचा भाग बनला पाहिजे, असे शिफा यांनी सांगितले. लाडली फाऊंडेशनने विजयपूर जिल्हा दत्तक घेतला आहे आणि प्रगत तंत्रज्ञानावर आधारित सुसज्ज स्वच्छतागृहे बांधली जात आहेत. पाच हजार मुलांना स्कूल बॅग वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. सल्लागार डॉ. जावेद जमादार यांनी विजयपूरमधील सरकारी शाळांमध्ये यापूर्वीच ७ अत्याधुनिक शौचालये बांधण्यात आली आहेत. लाडली फाउंडेशनने १२ नवीन शौचालये बांधण्यासाठी आणि १२ शौचालयांच्या नूतनीकरणासाठी कार्य आराखडा तयार केला आहे. बीआरसी मुनीर गुराड्डी, लाडली फाऊंडेशनचे जिल्हा व्यवस्थापक युसूफ कोट्टल, समन्वयक सरिता चक्रसाली, प्रीती पत्तार, युवा नेते शोएब मोमीन, यासीन सिंदगीकर, शिक्षक राजू राठोड, एल. एन. हिरेकुरुब उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### नागेश करजगी ऑर्किड स्कूलला मिमांसा पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

शिक्षण क्षेत्रात प्रतिष्ठेचा समजला जाणारा मीमांसा स्कूल पुरस्कार-२०२५ अंतर्गत "Most Technically dvanced School ward' हा सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूलने पटकावला. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठीचा हा पुरस्कार आहे. मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात शाळेचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शाळेची स्थापना ९ जून २०१२ साली करण्यात आली. सध्या दहावीपर्यंत वर्ग असलेल्या शाळेत १८०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ही शाळा सातत्याने विविध उपक्रमांमध्ये अग्रेसर असते. राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय परीक्षेत शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता दाखविली आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्राचार्या रुपाली हजारे यांनी सर्वांचे आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षा विभुते यांचे स्टाफनी अभिनंदन केले.




### शिक्षक भारती आश्रमशाळा संघटना जिल्हा उपाध्यक्षपदी अरुणा शटगार

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य शिक्षक भारती संघटना अंतर्गत शिक्षक भारती सोलापूर जिल्हा आश्रम शाळा संघटनेच्या उपाध्यक्षपदी कोन्हळी आश्रम शाळेच्या कर्मचारी अरुणा लक्ष्मीकांत शटगार यांची निवड करण्यात येऊन महाराष्ट्र राज्य शिक्षक भारती संघटनेचे अध्यक्ष अशोक बेलसरे यांच्या हस्ते व जिल्हाध्यक्ष सुजित काटमोरे, उपाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या उपस्थितीत पत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर रामनयन दुबे, मतचरण मिश्रा, एस.पी. सिंग, भाऊसाहेब वाघमोडे, रूपाली कुरुमकर, रामराव काळे,अरुण नागणे, आप्पासाहेब जगताप, पप्पू मुलांनी उपस्थित होते. सोलापूर जिल्हा शिक्षक भारती संघटनेतर्फे सावित्री फातिमा पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी निवडीचे पत्र देण्यात आले. या निवडीबद्दल देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे, माजी शिक्षक आमदार कपिल पाटील, शिक्षक आ. जयंत आसगावकर, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, अक्कलकोट तालुका काँग्रेस अध्यक्ष शंकर म्हेत्रे, शहराध्यक्ष रईस टिनवाला, जिल्हा परिषदचे माजी महिला बालकल्याण सभापती स्वाती शटगार, अक्कलकोट तालुका महिला काँग्रेस अध्यक्ष शितल म्हेत्रे आदींनी अभिनंदन केले आहे.

### समायोजन माहिती सादर केल्यानंतरच शाळांना वेतन अदा करावे : जगताप

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

जिल्ह्यातील अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त व अतिरिक्त पदाची माहिती त्या-त्या शाळांनी सादर केल्यानंतरच संबंधित शाळांना वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. अशा लेखी सूचना माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी वेतन व भविष्य निर्वाह निधी अधीक्षक डी.एस मुंढे यांना दिले आहेत. त्यानुसार संबंधित शाळांना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त व अतिरिक्त पदांची माहिती तात्काळ द्यावी लागणार आहे. माहिती दडवून वेतन प्रस्ताव सादर करता येणार नाही. दरम्यान, माध्यमिक शाळांतील सन २०२३-२४ च्या संच मांडणीनुसार शिक्षकेतर पदाची रिक्त व अतिरिक्त माहिती सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

## सफाई कामगारांना लाड पागे समिती लागू

**औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय** | राज्य शासनाचा निर्णय राहणार कायम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**



लाड पागे समिती ही शासन निर्णयातील संबंधित घटकातील सफाई कामगारांना लागू राहणार आहे. या संदर्भात औरंगाबाद खंडपीठाने निर्णय दिला आहे. यामुळे आता सन २०२३ चा राज्य शासनाचा निर्णय कायम राहणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य महापालिका - नगरपालिका कामगार संघटना फेडरेशनचे सरचिटणीस अशोक जानराव यांनी दिली.

आता सन २०२३चा राज्य शासनाचा निर्णय कायम राहणार आहे. राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका नगरपंचायत व इतर विभागात सफाई कामगार काम करीत असतात. ज्यांचा घाण कामाशी संबंध येतो अशा मेहतर, वाल्मिकी, अनुसूचित जाती, नवबौद्ध, भटक्या विमुक्त जाती आदी प्रवर्गातील जातींच्या सफाई कामगारांना लाड पागे समितीच्या अहवालाप्रमाणे शिफारशी लागू झाल्याचा निर्णय औरंगाबाद खंडपीठाने जाहीर केला आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात दि. ८ जानेवारी २०२५च्या खंडपीठाच्या निर्णयाचे स्वागत कामगार संघटनांकडून करण्यात येत आहे. संदर्भात महाराष्ट्र राज्य महापालिका, नगरपालिका कामगार संघटना फेडरेशनचे अध्यक्ष बबनराव झिंजुर्डे व प्रवक्ते गौतम खरात (औरंगाबाद) यांनी कळविले आहे, असेही प्रसिद्धी पत्रकात कामगार नेते अशोक जानराव यांनी म्हटले आहे.

## रुक्मिणी महोत्सवातून खवय्यांना मिळणार गावरान मेजवानी

### १६ ते २० जानेवारी दरम्यान आयोजन; सीईओ जंगम यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**



उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानअंर्तगत मिनी सरस व जिल्हास्तरीय रुक्मिणी महोत्सव प्रदर्शन व विक्री दि. १६ ते २० जानेवारी दरम्यान वोरोनाका प्रशालेच्या मैदानावर आयोजित करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

जिल्ह्यातून ६५ व पुणे विभागातील इतर जिल्ह्यातून १० स्टॉल असे ७५ स्टॉल लावण्यात येणार आहेत.महिला बचत गटांना त्यांनी तयार केलेली उत्पादने विक्री करणे तसेच शहरी बाजारपेठ अनुभवण्याची संधी मिळते. या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृतीचा परिचय शहरातील नागरिकांना होत असतो. प्रदर्शनात मिलेट कुकीज, चटणी, लोकरीच्या वस्तू, भरतकाम केलेल्या साड्या, ज्यूटच्या वस्तू, लाकडी वस्तू, चामड्याच्या वस्तू, कृत्रिम दागिने, लेडीज बॅग, ड्रेस मटेरियल, साड्या, चादरी इ.वस्तू यांचा समावेश आहे. या वस्तू केवळ वैशिष्ट्यपूर्णच नाहीत तर उच्च दर्जाच्याही आहेत, ग्रामीण कारागिरांचे कौशल्य आणि कारागिरीचे प्रदर्शन करतात. शिवाय, घरगुती मसाले, पापड, कुरडई आणि इतर खाद्यपदार्थ विक्रीचे स्टॉल असतील. हे स्टॉल अभ्यागतांना अस्सल ग्रामीण स्वादिष्ट पदार्थ चाखण्याची आणि खरेदी करण्याची संधी देतील. महोत्सवचा समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम दि. २० जानेवारी रोजी ठेवण्यात आला आहे. या प्रदर्शनात कोल्हापुरातील तांबडा-पांढरा रस्सा आणि सोलापूरची शेंगाची चटणी यांसारखे पारंपरिक पदार्थही उपलब्ध असतील.

नागरिकांनी प्रदर्शनास भेट देऊन जास्तीत जास्त खरेदी करावी व ग्रामीण भागातून दर्जेदार उत्पादन घेऊन आलेल्या महिलांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांनी केले आहे.

## वैकुंठ एकादशीला व्यंकटेश्वर देवस्थानात उत्तरद्वारमधून दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी -**



वैकुंठ एकादशीनिमित्त शुक्रवार, दि.१० जानेवारी रोजी दाजी पेठेतील व्यंकटेश्वर देवस्थानात भगवान श्री व्यंकटेश्वरस्वामींचे उत्तरद्वारमधून दर्शन देण्यात येणार आहे.

वैकुंठ एकादशी रोजी उत्तरद्वार मधून दर्शन घेतल्यास मनुष्याला मोक्ष मिळते अशी श्रद्धा आहे. या संदर्भात अनेक पौराणिक आख्यायिकादेखील आहेत. म्हणूनच या दिवशी दर्शन घेण्यासाठी तिरुमला येथे लाखो भक्तांची गर्दी असते. पण ज्यांना तिरूमलाला जाणे शक्य नाही अशा भाविकांसाठी सोलापुरातील दाजी पेठेतील श्री वेंकटेश्वर मंदिरात दर्शन घेण्याची सोय करण्यात आली आहे. व या दिवशी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यत भव्य रक्तदान शिबीर ओयोजित करण्यात आली आहे. याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थानच्या विश्वस्तांनी केले आहे.



(छायाचित्र : केवल तिवारी)

**महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा...**
सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात २१ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत निंबध साकव फाऊंडेशन सोलापूरने बुधवारी सकाळी बालगोपाल हे नाटक सादर केले.



## गांधीनगर चौकातील अजोरा उचलण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

येथील व्हीआयपी रोडवरील गांधीनगर चौकामध्ये नुकतेच पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात आले. त्याकरिता खोदण्यात आलेला खड्डा काँक्रीटच्या साह्याने व्यवस्थित करण्यात आला.

परंतु खड्डा खोदल्यानंतर फूटपाथवर टाकण्यात आलेला अजोरा बऱ्याच दिवसांपासून तसाच पडून आहे. शॉप समोर मातीचा ढीग टाकल्यामुळे गाळे धारकांना ग्राहकांना गाडी लावायला जागा नाही.शिवाय पादचाऱ्यांनाही फुटपाथ वरून चालणे अवघड झाले आहे. तसेच तेथील व्यावसायिक व नागरिकांना धुळीचा प्रचंड त्रास होत आहे.

तरी तेथील फुटपाथवर पडलेला अजोरा त्वरित उचलावा, अशी मागणी तेथील व्यावसायिक आणि नागरिकांमधून होत आहे.

भागवत उमामंदिर
उद्यापासून भव्य प्रारंभ







Book The Ticket At BookMyShow
तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा : 9158142780

## रेल्वे कर्मचारी आणि डेपोंना अनुकरणीय योगदानासाठी सन्मानित

### सोलापूर विभागीय रेल्वे प्रबंधकांच्या हस्ते रेल सेवा पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने सिद्धेश्वर रेल्वे ऑफिसर्स क्लब ऑडिटोरियम हॉल येथे रेल्वे सप्ताह २०२४ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी, सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरजकुमार दोहरे यांनी सोलापूर विभागातील रेल्वे कर्मचाऱ्यांच्या अनुकरणीय योगदानाची दखल घेऊन रेल्वे सेवा पुरस्कार २०२४ प्रदान केला.

या कार्यक्रमात उत्कृष्ट कर्मचाऱ्यांसाठी ३४ वैयक्तिक पुरस्कार आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या डेपोसाठी ९ कार्यक्षमता शिल्डचे वितरण करण्यात आले. विभागीय स्तरावर विशिष्ट रेल सेवा पुरस्कार २०२४ चे विजेते आणि २८ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या मंडल रेल प्रबंधक स्वच्छता तपासणीतील विजेत्यांनाही गौरविण्यात आले. यावेळी सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री नीरज कुमार दोहरे यांनी पुरस्कार मिळालेल्या सर्व विभागाचे, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक करताना सोलापूर रेल्वे विभाग हा येणाऱ्या काळात आपल्या सर्वोत्तम कामगिरी ने देशात आपले नाव लौकिक करेल असा विश्वास व्यक्त केला. सदरच्या कार्यक्रमाला सोलापूर विभागाच्या उठथथज अध्यक्षा श्रीमती सरिता दोहरे,सोलापूर रेल्वे विभागाचे अपर रेल्वे विभागीय व्यवस्थापक श्री अंशुमाली कुमार , मुख्य प्रकल्प अधिकारी श्री शैलेंद्र सिंह परिहार यांच्यासह विभागातील सर्व अधिकारी आणि पुरस्कार विजेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**वैयक्तिक पुरस्कारप्राप्त असे**

**वाणिज्य विभाग :** संदीप महादेव पैकेकरी (कार्यालयीन सहाय्यक). **व्यावसायिक विभाग:** रामकुमार गुप्ता (मुख्य तिकीट निरीक्षक), रितेश कुमार (मुख्य वाणिज्य निरीक्षक). **इलेक्ट्रिकल** (सामान्य): जीवन कुमार सरनप्पा (तंत्रज्ञ ग्रेड-१,टीएल). इलेक्ट्रिकल : संवरमल (तंत्रज्ञ ग्रेड-१, कलबुर्गी) पवन कुमार यादव (तंत्रज्ञ ग्रेड, पारेवाडी). मुकेश कुमार (तंत्रज्ञ ग्रेड, सलगरे), राय रवींद्रनाथ (मुख्य लोको निरीक्षक). **अभियांत्रिकी विभाग:** आशिष करक (कनिष्ठ अभियंता ट्रॅक मशीन), कुमार भारत विश्वकर्मा (वरिष्ठ विभाग अभियंता, पंढरपूर), गुलशन कुमार (ट्रॅक मेंटेनर, कलबुर्गी), इंद्रराज गुर्जर (ट्रॅक मेंटेनर, कलबुर्गी), अजय सिंग (एईएन, लातूर), राहुल सिंग (कनिष्ठ अभियंता वर्क्स), शंकर किशन कोकरे (ट्रॅक मेंटेनर). कमलनाथ विश्वकर्मा (ट्रॅक मेंटेनर). **सामान्य प्रशासन विभाग:** सचिन कुमार (ज्येष्ठ लघुलेखक). **प्रवासी आणि मालवाहतूक विभाग:** आरवा श्रीनिवास (वरिष्ठ विभाग अभियंता सी अँड डब्ल्यू), अनिल कुलकर्णी (वरिष्ठ तंत्रज्ञ फिटर), संदीप यशवंत (तंत्रज्ञ ग्रेड फिटर). **वैद्यकीय विभाग :** बडे जयराम दत्तात्रेय (मुख्य फार्मासिस्ट). ऑपरेशन विभाग : देवेंद्र सिंग राजपूत (पॉइंट्समन-बी, गुडगाव), अशोक कुमार श्रीवास्तव (स्टेशन अधीक्षक, पंढरपूर), कन्हैया कुमार पाठक (विभाग नियंत्रक, सोलापूर), नीरज कुमार (स्टेशन अधीक्षक), प्रभू रत्नम कातुरी (स्टेशन अधीक्षक), धनराज मीना (मुख्य नियंत्रक). **कार्मिक विभाग:** सचिन पांडव (कार्यालयीन अधीक्षक). **सुरक्षा विभाग :** साजिद युसूफ अत्तार (कनिष्ठ लिपिक, सिग्नल आणि दूरसंचार विभाग), म्हाळप्पा बापू खांडेकर (तंत्रज्ञ). इलेक्ट्रॉनिक सिग्नल मेंटेनर (मुंढेवाडी), प्रभात गर्ग (कनिष्ठ अभियंता सिग्नल). **स्टोअर्स विभाग:** अंबादास कोकणे (कार्यालय सहायक). **सुरक्षा विभाग:** शीबा प्रसाद पाध्ये (सुरक्षा समुपदेशक वाहतूक). **गती शक्ती एकक:** महिपतराव शंकर जाधव (कार्यालयीन सहाय्यक).

**आंतर-डेपो कार्यक्षमता शिल्ड विजेते**

- सर्वोत्तम लॉबी: वाडी.
- बेस्ट इलेक्ट्रिकल डेपो: वाडी.
- बेस्ट कमर्शिअल गुड्स शेड: लातूर.
- सर्वोत्कृष्ट संचालन यार्ड: कुर्डुवाडी.
- सर्वोत्तम ऑपरेटिंग स्टेशन: कलबुर्गी.
- सर्वोत्कृष्ट वैद्यकीय विभाग : कुर्डुवाडी रेल्वे रुग्णालय.
- सग्नल दूरसंचार डेपो: कलबुर्गी.
- बेस्ट पॅसेंजर आणि फ्रेट डेपो: सोलापूर

WORLDWIDE RELEASE
श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
उद्यापासुन ग्रॅन्डगाला ओपनिंग
रामचरण & शंकर डायरेक्शन ॲक्शन तेलगु चित्र




स.९ll,१२ll,३ll,६ll,९ll वा
थियटवर दिवसभर ॲडव्हान्स बुकींग
चालु आहे ग्रुप बुकिंगसाठी कॉल करा
7028810756,9970003525

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर

# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## शाकंभरी नवरात्रोत्सवानिमित्त श्री रूपाभवानी देवीची रथ अलंकार पूजा

सोलापूर : शाकंभरी नवरात्रोत्सवानिमित्त प्रति तुळजाभवानी सोलापूरची कुलस्वामिनी श्री रूपाभवानी मातेस बुधवारी विशेष रथ अलंकार महापुजा मांडण्यात आली. भगवान सूर्य नारायणानी श्री देवीस त्रिलोक भ्रमणासाठी आपला रथ दिला. त्या प्रसंगाची आठवण म्हणून ''रथ अलंकार महापुजा'' मांडली जाते. ही महापुजा मंदिर संस्थान पुजारी पवार व पतंगे परिवार यांच्या तर्फे मांडली आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### सावित्री फातिमा पुरस्काराने नाजमीन पटेल सन्मानित

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

शिक्षक भारती संस्थेच्या वतीने जगदीश श्री हॉल कोणार्क नगर जुळे सोलापूर येथे सावित्री फातिमा गुणवंत गौरव शिक्षक पुरस्काराने एम.ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षिका नाजमीन अ.सलीम पटेल यांना सन्मानित करण्यात आले.



त्यांच्या कार्याबद्दल संस्थापक आमदार कपिल पाटील, अध्यक्ष अशोक बेलसरे,नवनाथ गेंड, सुजित कुमार काटमोरे यांच्या उपस्थितीत प्रमुख पाहुणे खासदार प्रणिती शिंदे, कपिल पाटील, स्मिता पाटील यांच्या हस्ते सौ. नाजामिन यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. नाजमीन यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल प्राचार्य डॉ.हारुन रशीद बागबान, उपमुख्याध्यापिका डॉ. सुरैया परवीन जहागीरदार, निकहत नल्लामंदु, म. अली शेख आदीनी अभिनंदन केले.

### देशमुख-पाटील वस्तीमध्ये हाणामारी; चौघांवर गुन्हा


**सोलापूर, दि. ८ जानेवारी -**

शहरातील देगाव रोडवरील देशमुख-पाटील वस्तीमध्ये झालेल्या हाणामारीप्रकरणी चौघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुरज किरण बनसोडे (वय २६, रा. देशमुख पाटील वस्ती, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन अनिल विष्णू माने, प्रदीप विष्णू माने, सुनिल विष्णू माने, प्रशांत विष्णू माने (रा. देशमुख पाटील वस्ती, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६ जानेवारी रोजी रात्री दहाच्यासुमारास सुरज बनसोडे याने त्याच्या चुलत्याची मोटारसाकल क्र. एमएच १३ सीसी १८०५ ही गाडी त्याच्या ओळखीचा प्रवण तुकाराम बनसोडे यास देऊन गाडी सुरज याच्या घरासमोर लाव असे सांगितले होते. त्यावेळी प्रणव याने ती गाडी सुरज याच्या घरासमोर न लावता प्रदीप माने याच्या घरासमोर लावली होती. सुरज हा घरी येत असताना त्यास गाडी ही मानेच्या घरासमोर दिसली व प्रणव तिथे दिसला नाही. तेंव्हा सुरजने प्रवण यास शिवीगाळ करून गाडी येथे का लावली, तुला कुठे लावायला सांगितले होते म्हणून शिवीगाळ केली. त्यावेळी आम्ही काय बांगड्या घातल्या आहेत का असे म्हणून माने याने सुरज याच्याशी वाद घालून प्रशांत माने याने त्याच्याजवळील गवत कापण्याच्या विळ्याने सुरजच्या कमरेवर वार करून त्यास गंभीर जखमी केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार भालशंकर पुढील तपास करीत आहेत.

### किल्ला रोडजवळून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ८ जानेवारी -**

शहरातील गोल्डफिंच पेठ परिसरातील किल्ला रोडजवळून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत महेश रमेश बासुतकर (वय ४६, रा. किल्लो रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेश बासुतकर यांनी २ जानेवारी रोजी त्यांची एमएच १३ डीएन २०२२ क्रमांकाची दुचाकी ही घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.



### सरस्वती चौकातून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ८ जानेवारी -**

शहरातील सरस्वती चौकातून चोरट्याने ७० हजार रुपयांची दुचाकी चोरीस गेली. याबाबत प्रमोद बालाजी उदगिरी (वय ३२, रा. विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ जानेवारी रोजी सकाळी प्रमोद उदगिरी यांनी त्यांची एमएच १३ डीएल १८६६ क्रमांकाची दुचाकी ही सरस्वती चौकात हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.

# मानकऱ्यांच्या घरी दिवे प्रज्वलित करुन श्री सिध्देश्वर यात्रेस प्रारंभ

## सुहास दर्गोपाटील यांच्या निवासस्थानी यात्रेची सुरुवात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जानेवारी**

ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. यात्रेतील प्रमुख मानकरी दर्गोपाटील, धुम्मा, मुस्तारे, मसरे, कळके, हब्बू यांच्या घरी दिवे प्रज्वलित करून तसेच यात्रेचे प्रमुख हिरेहब्बू यांचे पाद्यपूजन करून बुधवारपासून यात्रेस प्रारंभ झाला. यावेळी मानकरी सुहास दर्गो पाटील यांच्या घरी दिवे प्रज्वलित करण्यात आले. तद्नंतर यात्रा प्रमुख राजशेखर हिरेहब्बू, राजू हब्बू,अमित हब्बू, यात्रेस सुरुवात केली जाते. यावेळी शेवया, पापड, लाल तिखट, काळा तिखट, सांडगे, खीरेचे गहू, नकुल्या आदी पदार्थ बनवून यात्रेचे प्रारंभ केले जाते.

दरम्यान, ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर यात्रेतील विविध धार्मिक विधींना परंपरेनुसार आजपासून प्रारंभ झाला दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी भाविकांना प्रसाद वाटप केला गेला. सदरची ही परंपरा वर्षानुवर्षे अखंडपणे सुरू आहे.

यावेळी महानंदा दर्गोपाटील,धनंजय बंडे, प्रशांत बंडे, श्रुती बंडे, प्राजका हेले, पदमावती दर्गो तुकमाळी, तेजश्री दर्गोपाटील, महादेवी दर्गोपाटील, स्वप्ना दर्गोपाटील, श्वेता दर्गोपाटील, संतोषी भांजे, श्रुती बंडे, रतन मानवी, सुमन शेट्टी, आदी उपस्थित होत्या. यावेळी, शिवज्ञा दर्गोपाटील या चिमुकल्यांचाही समावेश होता.





**सोलापूर : सिध्देश्वर यात्रेतील पहिल्या दिवशी बुधवारी सुहास दर्गो-पाटील यांच्या निवासस्थानी दिवे प्रज्वलीत करण्यात आले. दुसऱ्या छायाचित्रात घरोघरी दिवा या कार्यक्रमाअंतर्गत कसबा पेठ परिसरात आनंद मुस्तारे यांच्या निवासस्थानी टिपलेला क्षण (छायाचित्रे : केवल तिवारी)**

# क्षयरोग शोध मोहिमेत आढळले नवे ३९ क्षयरुग्ण

## शहरातील अतिजोखमीच्या भागात १.२५ लाख लोकांचे सर्वेक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत सोलापूर महापालिकेच्या शहर क्षयरोग केंद्राच्या वतीने दि.२३ डिसेंबर ते दि.३ जानेवारी २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या सक्रिय क्षयरोग शोध मोहिमेत नवे ३९ क्षयरुग्ण आढळले.या मोहिमेत १ लाख २५ हजार ७१६ इतक्या लोकसंख्येचे सर्व्हेक्षण करण्यात आले.

राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत शहर क्षयरोग केंद्र, सोलापूर महापालिकेच्या वतीने दि.२३ डिसेंबर ते दि.३ जानेवारी २०२५ या कालावधीत सोलापूर मनपा कार्यक्षेत्रात सक्रिय क्षयरोग शोध मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेत आशा सेविका व एमपीडब्ल्यू कर्मचारी यांनी घरोघरी जाऊन अतिजोखमीच्या भागात सर्व्हेक्षण केले.



या मोहिमेत १ लाख २५ हजार ७१६ इतक्या लोकसंख्येचे सर्व्हेक्षण करण्यात आले. त्यापैकी १२०० संशयीत क्षयरुग्णांची थुंकी तपासणी केली. क्ष-किरण तपासणी करण्यात आली. त्यामध्ये एकूण ३९ नविन क्षयरुग्ण शोधण्यात आले.

ही मोहिम यशस्वी करण्यासाठी आयुक्त शीतल तेली-उगले, उपायुक्त श्री.आशिष लोकरे, आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांचे मार्गदर्शन लाभले. शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर यांनी या मोहिमेचे सनियंत्रण करुन मोहिम यशस्वी केली. दोन आठवडयाचा खोकला, वजन कमी होणे, थुंकीतून रक्त पडणे, सायंकाळी बारीक ताप येणे, अंगावर गाठ असणे आदी प्रकारची लक्षणे असल्यास शहर क्षयरोग केंद्र, डफरीन हॉस्पीटल येथे नागरिकांनी संपर्क साधावा व मोफत तपासणी व मोफत उपचाराचा लाभ घ्यावा. सोलापूर शहर क्षयमुक्त करण्यासाठी संबंधितांनी सहकार्य करावे, असे आवाहन सोलापूर महापालिका आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.



# बांगलादेशी हिंदूंच्या रक्षणासाठी भारत सरकारने हस्तक्षेप करावा

## मूक आंदोलनात हिंदू जनजागृती समितीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी कायदेशीर मार्गाने आंदोलन करणाऱ्या बांगलादेशातील इस्कॉनचे प्रमुख स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. ही अटक म्हणजे हिंदू अल्पसंख्याकांचे हक्क दडपण्याचा प्रकार आहे. भारत सरकारने तातडीने पावले उचलून चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांची विनाअट सुटका व्हावी आणि हिंदू अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी तेथील सरकारला भाग पाडावे. भारताने बांगलादेशशी असलेले सर्व संबंध तोडावेत आणि प्रसंगी सैनिकी कारवाई करण्यास मागेपुढे पाहू नये, या मागणीसाठी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने बुधवारी टिळक चौक येथे मूक आंदोलन करण्यात आले.

यात धर्मप्रेमींनी हातात हस्तफलक धरून प्रबोधन आणि जागृती केली. या आंदोलनात हिंदु जनजागृती समितीचे दत्तात्रय पिसे, किशोरकुमार जगताप, विनोद रसाळ, धनंजय बोकडे, संतोष पाटणे यांसह अक्कलकोट, तुळजापूर, सांगोला येथील हिंदु जनजागृती समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.


या आंदोलनात धर्माभिमानी हिंदूंनी 'बांगलादेशातील 'इस्कॉन'चे स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांच्या सुटकेसाठी भारताने हस्तक्षेप करावा', 'बांगलादेशात हिंदूंसाठी लढणारे 'इस्कॉन'चे स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांना तात्काळ मुक्त करा', 'स्वामी चिन्मय कृष्णदास यांच्यावरील बांगलादेशी शासनाची दडपशाही हिंदू सहन करणार नाहीत', 'बांगलादेशातील 'इस्कॉन'चे स्वामी चिन्मय कृष्णदास बह्मचारी यांनी अटक होणे, हा हिंदु धर्मावरीलू आघातच !', या आशयाचे फलक हातात धरले होते.

या वेळी रस्त्यावरून ये जा करणारे अनेक लोक धर्मप्रेमींच्या हातातील फलक आवर्जून थांबून वाचत होते.

# अमृत लक्षित गटातील उमेदवारासाठी मोफत उद्योजकता प्रशिक्षण

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) पुणे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अमृत योजनेंअतर्गत खुल्या प्रवर्गातील अमृत गटातील उमेदवारासाठी निशुल्क मोफत विविध तांत्रिक विषयावर आधारित निवासी तांत्रिक उद्योजकात विकास प्रशिक्षण १४ ते ३१ जानेवारीपर्यंत व बेकरी प्रशिक्षण कार्यक्रम २१ जानेवारी तर आयात व निर्यात प्रशिक्षण कार्यक्रम १३ ते ३० जानेवारी या तीनही प्रशिक्षण कार्यक्रम १८ दिवसाच्या कालावधीमध्ये सुशिक्षित युवकांना तांत्रिक उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम सुशिक्षीत बेरोजगार युवकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे. प्रवेशासाठी पात्रता शिक्षण किमान १२ वी पास, पदवीधर व तांत्रिक पदवीधारकास प्राधान्य असून वयोमर्यादा २१ ते ५० वर्ष आहे. इच्छुकांनी प्रकल्प अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रद्वारा जिल्हा उद्योग केंद्र, किल्लेदार मंगल कार्यालय शेजारी, आसरा चौक येथे प्रकल्प अधिकारी राजशेखर शिंदे (९०४९४९६००१) या नंबरवर संपर्क साधावा.



## सिद्धेश्वर यात्रा : प्रशासनाची लगबग...

**सोलापूर : श्री सिध्देश्वर यात्रेनिमित्त नंदीध्वज मार्गावरील झाडांच्या फांद्या, केबल दूर करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे.**

# अश्विनी सहकारी रुग्णालयात नवीन एमआरआय, नूतनीकृत जीई-आयसीयु

## आठ कोटींची आधुनिक एमआरआय मशीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी**

अश्विनी सहकारी रुग्णालयात नवीन एमआरआय व नूतनीकरण केलेल्या जीई-आयसीयुचे उद्घाटन चेअरमन बिपीनभाई पटेल यांच्या हस्ते करण्यात आले. रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या नवीन १.५ टी एम आर आय ही मशीन सिमेंस कंपनीची असून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून रुग्णाचा अत्यंत तंतोतंत अहवाल सादर केला जातो. आठ कोटी रुपये खर्चून ही मशीन अश्विनी रुग्णालयात सुरू करण्यात आली आहे

नवीन १.५ टी एमआरआयचे व नूतनीकरण केलेल्या ग्रॅस्ट्रोएंटरोलॉजी आयसीयु (जीई-आयसीयु) चे उद्घाटन चेअरमन बिपीनभाई पटेल यांच्या हस्ते झाले. यावेळी आ. सुभाष देशमुख व भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी, डॉ. गुरुनाथ परळे, संचालक डॉ. विजय पाटील, डॉ. सुजित जागीरदार, डॉ. विनीत वाकडे, रुग्णालयाचे संचालक मंडळ सदस्य आदी मान्यवर उपस्थित होती. यावेळी डॉक्टर गुरुनाथ परळे यांनी हृदयाच्या चार मोठ्या आजाराबाबत सविस्तर माहिती दिली. या आजाराबाबत नवीन एमआरआय मशीनच्या माध्यमातून उपचार करण्याकरता कशी मदत होते याचेही विश्लेषण केले. तर पोटाच्या आजाराबाबत डॉ. सुजित जागीरदार व डॉ. विनीत वाकडे यांनी या नवीन १.५ टी. एमआरआय मशीन बाबत पोटाच्या विकारावर कसा उपयोग होतो याबद्दल माहिती दिली. डॉ. विजय पाटील यांनी अश्विनी रुग्णालयाच्या प्रगती बाबत आणि अद्यावत मशिनरी व उपचार याबद्दल माहिती सांगितली.

यावेळी संचालक विजय पाटील म्हणाले, बिपीनभाई पटेल यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली ११० पेक्षा अधिक तज्ञ डॉक्टरांच्या अथक परिश्रमांच्या साथीने, कार्यतत्पर आधिकारी आणि कर्मचारी यांच्या सामूहिक टीम वर्कमुळे रुग्णालयात एकाच छताखाली वैद्यकीय क्षैत्रातील जवळजवळ सर्व सेवा ३०० बेडच्या या रुग्णालयात २४ तास अहोरात्र मिळत आहेत. अत्यवस्थ रुग्णांना तर हे रुग्णालय एक वरदानच आहे. बएनएबीएचच्या मार्गदर्शकचे तत्त्वानुसार रुग्णालयाच्या पहिल्या मजल्यावर ग्रॅस्ट्रोएंटरोलॉजी आयसीयु (जीई-आयसीयु) नूतनीकरण करण्यात आले आहे. या आयसीयुचे काम काज डॉ.सुजीत जहागीरदार व डॉ. विनित वाकडे हे पाहणार आहेत.

या पत्रकार परिषदेस संचालक अशोक लांबतुरे, डॉ. राजीव प्रधान, विलास पाटील, यशोदाबाई डागा, इंदुमती अलगोंड, गुरुनाथ परळे, डॉ. श्रीराम अय्यर, डॉ. विरुपाक्ष जोशी, डॉ.सुजीत जहागीरदार, डॉ. विनित वाकडे आदी उपस्थित होते.



### रुग्णसेवेमध्ये अश्विनी रुग्णालयाचे मोठे योगदान : पटेल

बिपिनभाई पटेल म्हणाले, सोलापूर व नजीकच्या परिसरातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना माफक दरामध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यामध्ये अश्विनी सहकारी रुग्णालय हे कायम अग्रेसर आहे. त्याचाच एक भाग म्हणून नवीन १.५ टी एमआरआय प्रस्थापित करण्यात आले आहे. या सिमेन्स कंपनीच्या एमआरआय चे वैशिष्ट्य कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर व कार्डियाक इमेजिंग हा आहे. या नवीन एमआरआय मशिनचा उपयोग मेंदू, सांधे, मणके इत्यादींच्या रुग्णांची तपासणी करुन, त्यांचे अचूक निदान करण्यात येते. कार्डियाक इमेजिंगमध्ये प्रमुखत: कार्डियाक व्हायबिलिटी टेस्ट, कार्डियाक फंक्शनल टेस्ट, इत्यादी समाविष्ट आहेत. याचा फायदा रुग्णांना निश्चितच होईल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १९८

**जितुकें कांहीं आपणासी ठावें ।
तितुकें हळुहळु सिकवावे ।।**

आपल्या प्रत्येकावर समाजाचे ऋण असतेच. त्यामुळे माझ्यावर कसल्याही प्रकारचे सामाजिक ऋण नाही, असे कोणालाही म्हणता येणार नाही. या ऋणांची शंभर टक्के परत फेड करता येणे तसे कठीणच असते. याचा अर्थ असा नव्हे की, आमच्याने ही परतफेड होतच नसेल तर मग या ऋणांचा परतफ`डीचा प्रयत्न तरी कशाला करायचा ? याउलट प्रत्येकाने जमेल तेवढी, जमेल तशी परतफेड चालूच ठेवली पाहिजे. ही परतफेड ठप्प झाली तर सामाजिक संतुलन बिघडते. आपणही समाजाचा एक अविभाज्य भाग असल्याने बिघडत्या सामाजिक संतुलनाचा विपरीत परिणाम आपणालाही भोगावा लागतो. हा विपरीत परिणाम भोगावा लागू नये तसेच काही अंशी का होईना या ऋणातून मुक्त होता यावे म्हणून जे काही चांगले देता येईल ते देत राहावे. देण्यासारखे काहीच नाही, असा व्यक्ती असत नाही.



अर्थात, कोणी ज्ञान, कोणी दान, कोणी सेवा, कोणी सहकार्य, कोणी प्रेम किंवा कोणी अन्य काही देऊ शकतो. यातील बऱ्याच गोष्टी दिल्याने वाढत जाणाऱ्या आहेत. ज्ञान दिल्याने वाढतच जाते, हे सत्य असले तरी अनेक ज्ञानी लोक त्यांच्याकडील ज्ञान सहजासहजी कोणाला देत नाहीत. खरे म्हणजे, ज्ञानी तेच असतात, जे इतरांना देतात. बुध्दी, अनुभव असूनही जर इतरांना देत नसतील तर त्यांना ज्ञानी का म्हणायचे. विशेष म्हणजे 'ज्ञानी' होणे ही काही कोणाची मक्तेदारी नाही. तुम्हा-आम्हाला, कोणालाही 'ज्ञानी' च्या पंक्तीला बसता येते. चांगले कोणी द्यावे याला बंधन नाही. अर्थात, ज्याच्याकडे अनुभव, ज्ञान आहे तो लहान आहे की मोठा याचा विचार न करता गरजूने त्याच्याकडून स्वीकारायचे असते व ज्ञानींनी गरजूंना द्यायचे असते. देण्यात अहंकार नसावा व घेण्यात कमीपणा नसावा. कारण अहंकाराने दिले व कमीपणाने घेतले तर ते व्यवस्थीत पचनी पडत नाही. पैसा खर्च न करता सामाजिक ऋणांची परतफेड करण्याचा हा एक सोपा मार्ग आहे. समर्थ श्री रामदास स्वामी म्हणतात,

**जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावे ।
शाहाणे करुनि सोडावे । बहुत जन ।।**

बरेच लोक कृतकार्य होऊन निष्काम अवस्थेला पाहोचलेले असतात. अशा श्रेष्ठांना देखील, लोकांची सदाचरणाबद्दल आस्था वाढावी म्हणून ज्ञानोत्तर काळीही ज्ञानदानाचे कर्म करावे लागते. या अनुषंगाने श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणतात,

**देखे प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले ।
तयाही कर्तव्य असे उरलें । लोकांलागीं ।।**

ज्ञान हे एखाद्या व्यासपीठावरुनच देता येते असे नव्हे, तर चालता-बोलता, बसता-उठता किंवा सहज संपर्कात येणाऱ्यांनाही देता येते. कोणाला केव्हा कोणत्या मार्गदर्शनाची, सहकार्याची गरज पडेल हे सांगता येत नाही. म्हणून ज्याच्याकडे देण्यासारखे आहे त्यांनी नि:स्वार्थ भावाने देण्यास तयार असावे. आम्ही तर असे म्हणू की, एखाद्याला सामाजिक ऋणांची परतफेड करायचीच नाही, तर त्याने ही परतफेड करु नये. मात्र त्याने असे कोणतेही वर्तन करु नये की ज्यामुळे समाजातील अडीअडचणीत, समस्येत भर पडेल.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार
दि. ९ जानेवारी २०२५
विक्रम संवत् २०८०-८१
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - पौष
शु. दशमी - (१२.२२)
ऋतु - शिशिर
नक्षत्र - भरणी (१५.०६)
योग - साध्य (१७.२९)
करण - वणिज (२३.२१)

दिनविशेष -
चांगला दिवस

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील. मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.
**वृषभ** : मुलांची काळजी राहील. आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.
**मिथुन** : स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.
**कर्क** : घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.
**सिंह** : हितशत्रूंचा काही प्रम ाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.
**कन्या** : मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.
**तुळ** : व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.
**वृश्चिक** : लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.
**धनु** : विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.
**मकर** : नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.
**कुंभ** : आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.
**मीन** : मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# गावोगावी पाणलोट चळवळ निर्माण करावी

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**


केंद्र शासनाने जानेवारी पासून राज्यातील ३० जिल्ह्यात पाणलोट गावातील पाणलोट यात्रा सुरू केलेली आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील माढा, कुर्डुवाडी, मंगळवेढा व सांगोला या चार तालुक्यात उपक्रम राबवण्यात येणार आहे तरी जलसंधारण विभागाच्या सर्व संबंधित यंत्रणांनी उपरोक्त तालुक्यातील प्रत्येक गावात पाणलोट चळवळ निर्माण करण्यासाठी प्रबोधन मोहीम राबवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.



या यात्रेचे नियोजन करण्याकरिता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली. यावेळी सदस्य सचिव तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमोल जाधव, जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद एस.एस. पारशे, उपविभागीय अधिकारी भीमा पाटबंधारे विभाग एस.डी. हलकुडे, प्रकल्प संचालक नेहरू युवा केंद्र अनिल हिंगे, उपकार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वाय. चौधरी, उपकार्यकारी अधिकारी सोलापूर पाटबंधारे विभाग ओ.बी.थंबद, प्रांत अधिकारी माढा पी.व्ही. आंबेकर तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी व योजनेचे सर्व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पुढे म्हणाले की, सर्व यंत्रणांना एकत्र येऊन गावोगावी पाणलोट चळवळ निर्माण व्हावी, या अनुषंगाने नवीन मृद व जलसंधारण कामांचे भूमि पूजन करणे, पाणलोट कामांवर श्रमदान करणे, पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण करणे, पाणलोट योध्दे निवडणे इत्यादी कामांचे सूक्ष्म नियोजन करून या उपक्रम ांतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, बचत गटातील महिला, स्वयंसेवी संस्था व शेतकरी यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे सांगितले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; सम जायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (१५) वरदहस्त

रा.स्व.संघाचे द्वितीय सरसंचालक होण्याआधी श्री गोळवलकर गुरुजींनी संन्यासी बनण्यासाठी श्री रामकृष्ण परमहंस यांचे प्रत्यक्ष शिष्य स्वामी अखंडानंद जी यांच्याकडून ब्रह्मचर्यची दीक्षा घेतली होती. आणि एक दिवस अचानक पूजनीय डॉक्टरांशी त्यांची भेट झाली. त्यांच्यातला संवाद असा

डॉक्टर:- आपण प्राध्यापक आहात ना.
गुरुजी:- नाही; आता नाही; आता मी संन्यासी आहे.
डॉक्टर:-मग आता काय करत आहात.
गुरुजी:- साधना
डॉक्टर:- कशासाठी
गुरुजी:-मोक्षासाठी
डॉक्टर:- चांगला विचार आहे पण आधी एका प्रश्नाचे उत्तर द्याल का.
गुरुजी:- हो नक्की.
डॉक्टर:-जर आज तुम्ही हजारो लोक नरककुंडात पडताहेत; असे पाहिले तर काय कराल.
गुरुजी:- आधी मी नरकात जाणाऱ्यांना वाचवेल त्यानंतर मोक्षाचा विचार करेल.
डॉक्टर:-तर मग आज भारत मातेची स्थिती अशीच आहे. स्वार्थी नरककुंडा सारखी. तिची चिंता कोणी करायची. तुम्ही मोक्ष सोडावा असे मला वाटते.
गुरुजी:-विचार करतो. असे म्हणून ते परतले; पण नंतर दोघांचीही वारंवार भेट होऊ लागली. आणि जसे गुरुदेव रामकृष्ण परमहंसांनी स्वामी विवेकानंदांवर वरदहस्त ठेवला होता; तसाच डॉक्टर हेडगेवार यांनी गुरुजींवर वरदहस्त ठेवला

**क्रमशः**

# कास्ट्राईब संघटनेच्या विविध पुरस्कारांचे रविवारी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ८ जानेवारी-**

कास्ट्राईब शिक्षक संघटना, जिल्हा परिषद बहुजन प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था व ऊमाई सामाजिक बहुउद्देशीय संस्था सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विविध पुरस्कारांचा वितरण सोहळा रविवार दि. १२ जानेवारी रोजी होणार आहे, अशी माहिती संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल कोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त संघटनेतर्फे ३ जानेवारी ते १२ जानेवारी या कालावधीत विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. यांतर्गत पुरस्कार वितरण कार्यक्रम रविवार दि. १२ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात होणार आहे. याचवेळी प्रा. डॉ. अंजना गायकवाड यांचे व्याखानही होणार आहे.

अध्यक्षस्थानी शिक्षपणाधिकारी कादर शेख हे राहणार आहेत. यावेळी खा. प्रणिती शिंदे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम , कृ.उ. बाजार समितीचे माजी सभापती सुरेश हसापुरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, प्रकल्प अधिकारी महिला व बालकल्याण प्रसाद मिरकले, मुख्य लेखा वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. राष्ट्रमाता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त त्यांच्या नावे गुणवंत शिक्षक, डॉक्टर, पत्रकार, जि.प.कर्मचारी, आदर्श वकील, आदर्श विस्तार अधिकारी, आदर्श केंद्रप्रमुख, कर्तबगार पोलीस अधिकारी कर्मचारी, आदर्श विषय साधन व्यक्ती, आदर्श शाळा पुरस्काराने यावेळी सन्मानित करण्यात येणार आहे. राष्ट्रमाता पुरस्कारांमध्ये जिजाऊंची लेक पुरस्कार हा सुगलाबाई चंद्रशेखर कांबळे, सावित्रीची लेक पुरस्कार विनया महेश निंबाळकर, फातिमा की बेटी पुरस्कार-अख्तरबानो शब्बीर शेख यांना देण्यात येणार आहे. तर क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले गुणवंत शिक्षक पुरस्कार-राहुल काशिनाथ सुरवसे, भीमाशंकर जीवण्णा साबळे, विजयालक्ष्मी मल्लिनाथ निंबर्गी, शरद रेवणसिद्ध नरगीडे, बाळासाहेब महादेव नवगिरे, सुचिता सुशील गायकवाड, अहिल्या अर्जुन कांबळे, अमजद मो. अली इनामदार, रवींद्र श्रीमंत लोकरे, राजश्री संगप्पा जाधव, सायरानूर महंमद तांबोळी, उमेश महादेव वाघमारे यांना देण्यात येणार आहे. जि.प.गुणवंत विस्तार अधिकारी पुरस्कार बापूराव जमादार, जि.प.गुणवंत केंद्रप्रमुख पुरस्कार सिद्राम वाघमोडे, आदर्श शाळा पुरस्कार- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचपूर, जि.प.गुणवंत विषय साधन व्यक्ती पुरस्कार- चंद्रकांत वाघमारे, गुणवंत पत्रकार पुरस्कार दैनिक संचारचे विक्रम खेलबुडे, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी सविता सुरेश काळे, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले गुणवंत विधिज्ञ पुरस्कार ॲड. आजमोद्दीन शेख, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले गुणवंत वैद्यकीय अधिकारी पुरस्कार अशोक राठोड यांना देण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस सोमलिंग कोळी, अर्चना राठोड, मंजुषा कलशेट्टी, श्रीशैल सोनकांबळे, श्रीरंग बनसोडे, संग्राम सोनकांबळे आदी उपस्थित होते.

## लोकशाही दिनात २९ तक्रारी दाखल; झेडपीतून आठ तक्रारी

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

जिल्हा अधिकारी सोलापूर यांच्या वतीने नुकत्याच झालेल्या लोकशाही दिनात २९ तक्रारी नव्याने प्राप्त झाल्या असून, यापूर्वीच्या सर्व तक्रारींचा निपटारा केला असून, सध्या लोकशाही दिनातील पूर्वीची झिरो पेंडन्सी असल्याची माहिती आरडीसी मनिषा कुंभार यांनी आज (दि. ०८) दिली. नव्याने आलेल्या तक्रारींमध्ये सर्वात जास्त ८ तक्रारी सोलापूर जिल्हा परिषदेच्या विविध विभागातून आल्याचेही कुंभार यांनी सांगितले.

लोकशाही दिनामध्ये आलेल्या तक्रारींमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी जिपसो-८, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण-३, तहसिलदार माळशिरस-१, जिल्हा उपनिबंधक कार्यालय सोलापूर-१, उपविभागीय अधिकारी पंढरपूर-१, उपविभागीय अधिकारी माळशिरस-१, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सोलापूर-१, प्रबंधक जिल्हा अग्रणी बँक सोलापूर-३ आयुक्त सोमपा, सोलापूर-१, प्रादेशिक सह संचालक (साखर) सोलापूर वि सोलापूर-१, रोहयो शाखा सोलापूर-१, जिल्हा व सत्र न्यायालय मधील केस रद्दबाबत व नक्कल मिळत नसलेबाबत-४, महिला बालविकास अधिकारी सोलापूर-३, उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रं.-१, तहसिलदार मोहोळ-१ अशा एकूण २९ तक्रारी अर्ज प्राप्त झाल्या आहेत. या प्राप्त तक्रारींचा निपटारा लवकरात लवकर करण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचेही आरडीसी कुंभार यांनी सांगितले.



## नीलकंठेश्वर प्रशालेत पत्रकार दिन साजरा

**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच वृत्तपत्रांचे वाचन चालू ठेवल्यास त्यांना भविष्यकाळात सर्वसामान्य ज्ञानासाठी अधिक फायदा होवू शकतो,असे प्रतिपादन सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतिले यांनी व्यक्त केले. साखर पेठेतील श्री नीलकंठेश्वर प्रशालेत सोमवार दिनांक ६ जानेवारी रोजी पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष भास्कर आडकी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर सचिव रवि नादरगी यांची विशेष उपस्थिती होती. प्रारंभी मराठी वृत्तपत्राचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर संस्थेच्यावतीने पत्रकार सर्वश्री दशरथ वडतिले, विजयकुमार पिसे, बाळकृष्ण दोड्डी, छायाचित्रकार यशवंत सादूल व माजी विद्यार्थी नागेश गडगी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विज्ञान व रांगोळी स्पर्धेतील गुणी विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला. पत्रकार दोड्डी व मुख्याद्यापिका संगीता आडकी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन केलेल्या लक्ष्मी कनकी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक श्रीधर द्यावरकोंडा यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षिकांनी परिश्रम घेतले. याच कार्यक्रमात नीलकंठेश्वर दिनदर्शिकचे प्रकाशन करण्यात आले.

# सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये वाचन पंधरवड्यास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जानेवारी-**

एन.बी.नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या परिपत्रकानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रम ंतर्गत १ ते १५ जानेवारी या कालावधीत सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात वाचन पंधरवडा राबविण्यात येत आहे. त्यास उत्तम प्रतिसाद लाभत आहे.



वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सिंहगड इन्स्टिट्यूट मध्ये ही राबविण्यात आला. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. त्यात सामूहिक वाचन, वाचन संवाद, वाचन कौशल्य कार्यशाळा, लेखक विद्यार्थी संवाद, पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धा असे उपक्रम घेण्यात आले.

नवीन वर्षाची सुरुवात समाजातील सर्व घटकांमधील, तसेच नागरिकांनी आपल्या आवडीचे पुस्तकाचे वाचन करून करावी, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे. त्यानुसार राज्यातील सहा हजारांहून अधिक महाविद्यालयांनी उपक्रमात सहभाग घेतला आहे. राज्यातील ४५ लाख विद्यार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सांगितले होते. इंटरनेट वरची सर्वच माहिती खरी नसते खरी माहिती तुम्हाला ग्रंथालयात उपलब्ध असते, त्याचा वापर करुन जास्तीत जास्त वाचन केले पाहिजे, असे आवाहन उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. प्रदीप तापकीरे, डॉ. एस एस शिरगण, डॉ. विजयकुमार बिरादार, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. माणिक शिंदे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. विनोद खरात यांनी केले तर आभार ग्रंथपाल विद्यानंद बाबर यांनी मानले.



## बंदपट्टे यांच्या वाढदिवसानिमित्त सातही नंदीध्वजांची पूजा

**सोलापूर, दि.८ जानेवारी-**

काँग्रेसचे युवा नेते, चार्टर्ड अकाउंटंट सुशील बंदपट्टे यांनी आपला वाढदिवस ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धेश्वर यात्रेतील सराव नंदीध्वजांचे पूजन करून साजरा केला. बंदपट्टे यांच्या निवासस्थानी फुलांनी नंदीध्वज सजविण्यात आले होते. त्यानंतर श्री सिध्देश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून आरती करण्यात आली. पूजेनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी माजीमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल, प्रथमेश कोठे तसेच शिवजन्मोत्सव महामंडळाचे पदाधिकारी, तसेच वडार समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान वाढदिवसानिमित्त सी.ए. बंदपट्टे यांचा उपस्थितांनी सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# ११ वर्षे; १,४३४ वेळा डायलेसिस अन् कवितांचा जन्म

## कवी माधव पवार यांच्याशी संवाद; समरसतेची वारी... साहित्यिकांच्या घरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

वडिलांचा समृद्ध वारसा, प्रतिभावंत, शब्दप्रभूंचा मोठा सहवास, अनेक संमेलनात कवितांचे सादरीकरण, शब्दचतुर मांडणीमुळे मराठी काव्य प्रांतात ख्यातकीर्द असलेले सोलापूरचे कवी माधव पवार हे ११ वर्षांपासून डायलेसिसचा सामना करत आहेत. तब्बल १ हजार ४३४ वेळा डायलेसिसशी दोन हात करत वेदना, रंजन आणि मनोरंजन करत असंख्य कवितांना त्यांनी जन्म घातला आहे. वेदनेला कुरवाळत न बसता त्याची मजा लुटत काव्य प्रांत समृद्ध करण्यासाठी त्यांचे म ार्गक्रमण सुरु आहे.

समरसता साहित्य परिषद म हाराष्ट्र शाखा सोलापूरच्या वतीने 'समरसतेची वारी, साहित्यिकांच्या घरी' या उपक्रमांतर्गत त्यांची भेट घेऊन संवाद साधण्यात आला. 'समरसतेची वारी... साहित्यिकांची घरी' या उपक्रमाचा शुभारंभ कवी माधव पवार यांच्या भेटीने करण्यात आला. माधव पवार यांनी आतापर्यंत कवितांचे सर्व प्रकार हाताळले आहेत. वेदनेची मजा लुटत काव्य प्रांत गाजविणाऱ्या माधव पवार यांच्या कवितांच्या प्रवासाबरोबर विनोद, नकला, आर्केस्टा, कुस्ती, तालीम, मित्र परिवार, गीत, छंद, आवडी-निवडीबरोबरच साहित्य विश्वातील बदलत्या विषयांवर मनमुराद गप्पा रंगल्या. ११ वर्षांमध्ये तब्बल १ हजार ४३४ वेळा ज्यांना डायलेसिसचा सामना करावा लागला. ते संघर्षयात्री आणि वेदनेवर विजय मिळविलेल्या कवी पवारांनी आपल्या जीवनातील संघर्ष, नावलौकिक, वडिलांचा वारसा आणि आपला जीवनपट यावेळी मांडला. त्यांनी समरसता साहित्य परिषदेच्या उपक्रमाचे कौतुक तर केलेच. आजपर्यंत पु. ल. देशपांडे, सुरेश भट, आनंद यादव, कवी ग्रेस, ना. धो. महानोर, फ. मु. शिंदे, विठ्ठल वाघ, रामदास फुटाणे, प्रल्हाद शिंदे, आनंद शिंदे, आदर्श शिंदे यांच्यासह अनेक नट, साहित्यिकांच्या मैत्रीविषयी त्यांनी आठवणी जागविल्या. यावेळी सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रा. माधव कुलकर्णी, महिला आयाम प्रमुख वसुंधरा शर्मा-कुलकर्णी, उपाध्यक्ष अरविंद मोटे, कार्यवाह देवेंद्र औटी, सांस्कृतिक आयाम प्रमुख प्रा. पुरुषोत्तम बगले, पश्चिम महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्ष जगन्नाथ हुक्केरी, ग्रंथालय आयाम सहप्रमुख नागराज बगले, युवती आयाम प्रमुख रुपा कुताटे, प्रकाशन आयाम प्रमुख यशवंत बिराजदार, प्रसिद्धी आयाम प्रमुख पिंटू विभूते यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



### यांनी गायिले गीत

कवी माधव पवार यांचे गीत सुरेश वाडकर, सुरेखा पुणेकर, प्रल्हाद शिंदे, बेला शेंडे, शकुंतला जाधव, जगदीश बोरसे, चंद्रशेखर गाडगीळ, स्वप्निल बांदोडकर, प्रशांत देशपांडे, आनंद शिंदे, आदर्श शिंदे यांच्यासह १९-२० गायकांनी गायले आहेत. बांगलादेश फाळणीच्या वेळी त्यांनी पहिली कविता लिहिल्याचे सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पार्टींच्या युगातही हास्य तुषारांची अंगत-पंगत

## विचारांच्या देवाण-घेवाणाबरोबरच चवदार भोजनाचा आस्वाद

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**मंद्रुप, दि. ८ जानेवारी-**

वाढदिवस व आनंदाचा क्षण म्हटले की हॉटेल व ढाब्यावरील जेवण ठरलेलेच. हॉटेल व ढाब्यावरील जेवणामुळे पैशाच्या अपव्ययाबरोबर शरीराची हानी होते. म्हणूनच आपल्या ग्रुपमधील सदस्यांचा पैसा व शरीर पीडा रोखण्यासाठी येथील समविचारी लोक एकत्र येऊन हास्य तुषार नावाचा व्हॉटस् ॲप ग्रुप तयार केला. या ग्रुपच्या सदस्यांनी पार्टीला पर्याय म्हणून उपस्थित सदस्यांपैकी एका सदस्याच्या घरी एकत्र बसून जेवण करण्यासाठी अंगतपंगत सुरू केली.

अंगतपंगत म्हणजे शेतकरी व मजूर कामाच्या ठिकाणी एकत्र एकमेकांची भाजी-भाकरी एकमेकांना देत जेवण करण्याचा एक पद्धत. यावेळी पंगतमध्ये लहान-मोठा व गरीब-श्रीमंत असा भेदभाव नसतो. मात्र सुशिक्षित पदवीधर व नोकरदार व्यक्ती एकत्र येऊन अंगत-पंगत संकल्पना अस्तित्वात आणली आहे. सध्या विविध कारणासाठी पार्टीची योजना आखण्यात येते. मात्र पार्टीसारखी वाटणारी. पण परंपरा व संस्कृती जतन करण्यासाठी मंद्रुपमधील हास्यतुषार ग्रुपची अंगत-पंगत संकल्पना कौतुकास्पद असल्याचे दिसून येते.

मंद्रुपमधील हास्यतुषार ग्रुपच्या सदस्यांकडून सुरुवातीला ग्रुपमधून अनेक विनोद व व्हिडिओ यांची देवाणघेवाण होऊ लागली. नंतर सायंकाळी दोन तास एकत्र येऊन विविध विषयांवर चर्चा होऊ लागली.विशेष म्हणजे या ग्रुपमध्ये प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती आहेत. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक, सेवानिवृत्त प्राचार्य, शेतकरी, व्यापारी, पत्रकार, प्राथमिक, माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व प्राध्यापक असे अनेक सक्रिय सदस्य आहेत. पुढे या ग्रुपच्या माध्यमातून वाढदिवस साजरा करणे, वृक्षारोपण करणे, यशस्वी मुलांचा सत्कार करणे, आपापल्या क्षेत्रात उज्ज्वल काम गिरी करणाऱ्या सदस्यांचा सत्कार करणे, पर्यटनस्थळांना भेटी देणे, आजारी मित्रांना भेट देणे, घरगुती कार्यक्रमात मदत करणे असे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. आनंदाच्या क्षणी हॉटेल व ढाबा येथे जेवणावळी होऊ लागल्या. काही दिवसांनंतर ग्रुपमध्ये सदस्य वाढू लागले. त्यामुळे जेवणावळीचा खर्च टाळून अंगत-पंगत संकल्पना समोर आली आणि याला उत्तम प्रतिसाद मिळाला. महिन्यातून किमान दोनवेळा एका सदस्याच्या घरी स्वतःच्या जेवणाचे डबे घेऊन जाणे व घरगुती जेवणावर यथेच्छ ताव मारणे सुरु झाले. सर्वांनाच ही कल्पना आवडल्यामुळे उदंड प्रतिसाद मिळाला. नवनवीन पदार्थांची चव एकत्र येऊन चाखायला मिळाल्याने अधिकच रंगत येऊ लागली. त्यामुळे आपोआपच ढाब्यावरील जेवणाचा अमाप खर्च कमी झाला. तब्येतीवर परिणाम होणे बंद झाले. या वेगळ्या संकल्पनेमुळे प्रत्येकामध्ये मैत्रीचे घट्ट नाते निर्माण झाले. यापुढील काळातही या ग्रुपच्या माध्यमातून वैविध्यपूर्ण उपक्रम राबवणार आहोत, अशी माहिती प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी दिली.



**हास्य तुषार ग्रुपचे सदस्य**

सिद्धेश्वर म्हेत्रे, शिवानंद सलगरे, अनिल म्हेत्रे, धीरज राठोड, संतोष शिंगाडे, संगमेश्वर बगले, शिवानंद जोडमोटे, सिद्धाराम स्वामी, राजेश शिंगाडे, रवी म्हेत्रे, सचिन साळुंखे, संजय म्हेत्रे, काशिनाथ बिराजदार, राजू राठोड, सुभाष सुतार, चंद्रकांत कुंभार.

**सदस्यांमध्ये आपुलकी**

सर्व सदस्य आपापल्या घरातील भाकरी व विविध प्रकारच्या भाजी आणल्यामुळे विचारांची देवाण-घेवाण होण्याबरोबर अनेक प्रकारची चव चाखायला मिळते. सदस्य एकत्र आल्याने सर्व सदस्यांमध्ये सुख-दुखांची देवाण-घेवाण झाल्याने आपुलकी निर्माण होते.

-शिवानंद सलगरे

**ग्रुपकडून सामाजिक उपक्रम सुरू**

हास्यतुषार ग्रुप हा विचारांची देवाण-घेवाण करण्याबरोबर सर्व सदस्यांना हसवत ठेवण्याचे काम करते. वृक्षारोपण, यशस्वी व गुणवंत सदस्यांचे सत्कार, पर्यावरण संवर्धन यासह इतर विधायक कार्यक्रम सुरू आहे. हास्यतुषार ग्रुपमध्ये सदस्यांना आनंदी ठेवणे हा मुख्य उद्देश्य आहे.

-अमसिद्ध कस्तुरे,
सदस्य, निवृत्त मुख्याध्यापक

## संक्षिप्त वृत्त



### अक्कलकोटमध्ये पत्रकारांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ८ जानेवारी-**

सामाजिक, आर्थिक, राजकीय व न्याय हक्कासाठी लढा देणारे अक्कलकोट तालुक्यातील पत्रकार बांधव व पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, पत्रकार बसवराज बिराजदार, सचिव विश्वनाथ चव्हाण, पत्रकार निंगप्पा निंबाळ, पत्रकार समाधान अहिरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दत्ता कांबळे, बोरोटीचे सरपंच अशोक ढंगापुरे, भाजपा अनु. जाती तालुकाध्यक्ष निजप्पा गायकवाड, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक इरण्णा दसाडे, उद्योजक शंकर रजपूत, ग्रामसेवक अभिमन्यू ताड, ग्रामसेवक सोमनाथ खराडे, ग्रामसेवक गुरव, सामाजिक कार्यकर्ता संतोष राठोड, सरपंच रवी गायकवाड, कृष्णा धोडमनी उपस्थित होते.



### मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**पिलीव, दि. ८ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांना जगदीशब्द फाउंडेशनचा राज्यस्तरीय क्रांतीसूर्य आदर्श शिक्षक पुरस्कार पुणे येथे माजी सनदी अधिकारी सुरेश खोपडे, माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी मंगेश चिवटे, सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. नितीन तळपाडे, परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष महादेव वाघमारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्माचिन्ह, पदक, सन्मानपत्र व फेटा देऊन सुहास कोल्हे यांना सन्मानित करण्यात आले.



### सरस्वती विद्या मंदिरमध्ये क्रीडा महोत्सव

**बार्शी, दि. ८ जानेवारी-**

येथील सरस्वती प्राथमिक विद्या मंदिर शाळेत काल क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलचे उपमुख्याद्यापक अनिरुद्ध चाटी सर यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख नगरपालिका शाळा क्रमांक २ चे महेश नेवरे यांची उपस्थिती लाभली. तसेच नगरपालिका शाळा क्रमांक ६ चे मुख्याध्यापक मिरगणे आणि सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलचे क्रीडा शिक्षक गाढवे यांनीही महोत्सवाला हजेरी लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत सहभाग घेतला आणि आपली कौशल्ये सादर केली.



### जिजाऊ ब्रिगेडच्या पंढरपूर विभाग जिल्हाध्यक्षपदी मनोरमा लावंड

**माळीनगर, दि. ८ जानेवारी-**

अकलूज येथील मनोरमा लावंड यांची सोलापूर मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेड पंढरपूर विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात नियुक्ती आली. यावेळी प्रदेश सचिव स्नेहा खेडेकर, प्रदेश सदस्या सत्यभामा पाटील, अक्का माने, प्रिया नागणे, ज्येष्ठ मार्गदर्शिका नंदा शिंदे, मराठा सेवा संघाच्या जिल्हा कार्याध्यक्ष हेमलता मुळीक, सचिव शिवमती वनिता कोरटकर उपस्थित होत्या. प्रदेशाध्यक्ष सीमा बोके यांनी नियुक्तीचे पत्र दिले.



### जवळगांव जि. प. शाळेच्या आनंद बाजारात ३० हजारांची उलाढाल

**वैराग, दि. ८ जानेवारी-**

शालेय विद्यार्थ्यांना व्यवहाराचे ज्ञान प्रत्यक्षात मिळावे, यासाठी बार्शी तालुक्यातील जवळगाव नं २ या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुमारे तीस हजार रुपायांची उलाढाल झाली आहे. या आनंद बाजारात ८५ स्टॉल लावण्यात आले होते. बाजारात सर्व प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या, पाणीपुरी, भेळ, इडली, बालूशाही, गाजर हलवा, मंच्युरिअन, शिरकुर्मा, दूधखीर असे अनेक पदार्थ विक्रीस ठेवण्यात आले होते. सरपंच अनिता धेंडे, अभिजीत डिसले, राहुल कापसे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बालाजी वीर, दत्तात्रय कापसे, अशोक कापसे, अक्षय चव्हाण, रमेश पवार, समाधान डिसले, सुरेश कापसे, समाधान ढेंगळे, नितीन कापसे यांनी भेट दिली. मुख्याध्यापक विष्णू मस्के यांनी स्वागत केले. यावेळी कांचन उपासे, राजेंद्र कुंचाळे, जयवंत काशीद उपस्थित होते.

# माजी सैनिकांच्या आमसभेत विविध विषयांवर चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्यातील विविध विभागात कार्यरत असलेले माजी सैनिकांच्या समस्या निराकरण करण्यासाठी वर्ग-३ व वर्ग-४ या संवर्गात पुर्ननियुक्त माजी सैनिकांच्या समस्या निराकरण करण्यासाठी शासन मान्य संघटनेची वार्षिक सर्वसाधारण अधिवेशन तसेच राज्य पदाधिकारी निवडणूक श्री संत गजानन महाराज, शेगांव येथे पार पडली.

माजी सैनिक हे राज्य शासनाच्या सेवेत नव्याने नियुक्त नसून पुर्ननियुक्त असल्याने जुनी पेन्शन योजना लागू करणे, कालबध्द पदोन्नतीमध्ये माजी सैनिकांना १०-२०-३० वर्षाऐवजी ५-१०-१५ वर्षाच्या कालावधीमध्ये पदोन्नती मिळावी या व इतर मागण्यांबाबत चर्चा करुन पुढील कामकाजबाबत ठराव करण्यात आला. यावेळी राज्याध्यक्ष बाजीराव देशमुख, उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष विवेक पांडे, सरचिटणीस बाळासाहेब जाधव, चिटणीस संजय मेटील, मुख्य सल्लागार कमलाकर शेटे, प्रकाश कुलकर्णी, सुधाकर तकीत, विलास घाडगे, दिलावर सादिवान, विभागीय उपाध्यक्ष मंत्रालयीन विभाग उमाकांत भुजबळ, पुणे विभाग प्रकाश भिलारे, नागपूर विभाग बिपीन मोघे, सैनिक कल्याण विभाग संजय मोहिते व सर्व जिल्हा कार्यकारिणी उपस्थित होते.

राज्याध्यक्ष बाजीराव देशमुख यांनी संघटनेने केलेल्या कामाचा आलेख अधिवेशनमध्ये सर्वांसमोर मांडला. कोषाध्यक्षांनी संघटनेचा लेखाजोखा सर्वासमोर सादर केला.



**राज्याध्यक्षपदी हयुन पठाण**

राज्याध्यक्ष हयुन पठाण नांदेड, राज्य उपाध्यक्षपदी संजय कुटे अकोला (बिनविरोध), राज्य सरचिटणीपदी शरद शिंदे सोलापूर, चिटणीस प्रवीण पावसकर रत्नागिरी व कोषाध्यक्षपदी रामकिदास राठोड नाशिक यांची निवडणूक पध्दतीने निवड करण्यात आली. निवडणूक यशस्वी होण्याकरीता निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. मनिष खरात, सहा. निवडणूक अधिकारी कमलाकर शेटे व सुधाकर तकीत यांनी कामकाज पाहिले. यासाठी अमरावती विभाग उपाध्यक्ष अरविंद कोरपे व त्यांच्या सहकार्यांनी नियोजन केले.



# संशोधनामध्ये फार्मासिस्टचे महत्त्व वाढतेय

## प्रा. डॉ. संदीप पाटील : श्री गणपती फार्मसीमध्ये सेमिनार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ८ जानेवारी-**

श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर, टेंभुर्णी येथे प्रथम वर्ष बी. फार्मसी व डी. फार्मसी विद्यार्थ्यांना सध्याची औषधनिर्माण शास्त्राची तोंडओळख तसेच नवनवीन तंत्रज्ञान यामुळे फार्मसीमध्ये होणारे बदल व भविष्यातील संधी यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाप्रसंगी डॉ. संदीप पाटील, संस्थापक व डायरेक्टर, बायोसाईट रिसर्च अँड डेव्हलपमेंट (बर्ड) यांनी विद्यार्थी दशेतील आठवणी व संशोधनावर अगदी मार्मिक भाषेत आढावा घेतला व औषधनिर्माण शास्त्राची ओळख करून दिली. कोरोनानंतर औषधनिर्माण शास्त्राचे महत्त्व वाढले असून नवनवीन औषधांची गरज सध्या समाजाला असून आपण यामध्ये खूप चांगले योगदान देऊ शकतो याबद्दलही विद्यार्थ्यांना अवगत केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना आपण शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक जीवनाचा समतोल साधून आपली प्रगती साधायला हवी असे प्रतिपादन केले. बायोसाईट रिसर्च अँड डेव्हलपमेंट (बर्ड) व श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च, टेंभुर्णी यांचेमध्ये असणाऱ्या सामंजस्य करार अंतर्गत या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या करारानुसार विद्यार्थी संशोधनासाठी दोन्ही संस्थामध्ये देवाणघेवाण, विद्यार्थी ट्रेनिंग संबंधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. प्रास्ताविक ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. नामदेव शिंदे यांनी केले. याप्रसंगी डॉ. सचिन सकट, डॉ. प्रशांत मिसाळ, प्रा. शिवराज ढगे, प्रा. धनश्री कारंडे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. रुपाली बेंदगुडे, संस्थापक सचिव प्रा. डॉ. रवींद्र बेंदगुडे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्ष ॲड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे उपस्थित होते.

# मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी : डॉ. शिंदे

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ जानेवारी-**

मराठी भाषेला केंद्र शासनाकडून नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही मराठी भाषिकांसाठी अभिमानाची बाब आहे. मराठी भाषा अधिकृतरित्या अभिजात भाषा झाली आहे. आता ती ज्ञानभाषा व्हायला हवी अशी अपेक्षा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव तथा साहित्यिक डॉ. शिवाजी शिंदे यांनी व्यक्त केली.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित, मातोश्री गुरूबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत ' लेखक संवाद ' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिवाजी शिंदे बोलत होते. अध्यक्षस्थानी मलकप्पा भरमशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे मराठी वांग्मय मंडळ विभाग प्रमुख प्रा भीम सोनकांबळे होते. महाराष्ट्र शासनामार्फत १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत लेखक संवाद या कार्यक्रमाचे आयोजन कल्याणशेट्टी महाविद्यालयात करण्यात आले होते या वेळी साहित्यिक डॉ शिवाजी शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांनी केली तर आभार प्रा भीम सोनकांबळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. बाळासाहेब पाटील प्रा. राजशेखर पवार यांनी प्रयत्न केले.



# चांदापुरीच्या ओंकार कारखान्याचा पहिला हप्ता जमा : चेअरमन बोत्रे-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ८ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याने २०२४-२५ या हंगामात गळीतास १५ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर तसेच १ ते १५ डिसेंबर दरम्यान गाळपास येणाऱ्या उसाचा पहिला हप्ता २,८०० रुपये प्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केल्याचे कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी सांगितले.



हा कारखाना यंदाच्या गळीत हंगामात ३००० हजार रुपये प्रति टन एवढा दर देणार आहे. यापैकी १०० रुपये बैलपोळ्याला तर उर्वरित १०० रुपये दीपावलीला शेतकऱ्यांना देणार असल्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी सांगितले. या कारखान्याने शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला असून भविष्यातसुद्धा हा कारखाना शेतकऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठीच काम करणार आहे.

तसेच या कारखान्याने शेतकऱ्यांचे बिल वेळेवर जमा करण्याची परंपरा कायम ठेवली असल्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी सांगितले. यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर भीमराव वाघमोडे, केन मॅनेजर शरद देवकर, रमेश आवताडे उपस्थित होते. कारखान्याने घेतलेल्या या निर्णयाने शेतकऱ्यांनमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

# रामनामाबरोबरच जीवनात प्रयत्नांचीही जोड हवी

## कैलासबुवा खरे : करकंब येथे श्री चौडेश्वरी पौषपौर्णिमेनिमित्त नारदीय कीर्तन महोत्सवास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ८ जानेवारी-**

करकंब येथे श्री.चौंडेश्वरी पौषपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे नारदीय कीर्तनात पहिले पुष्प गुंफताना कैलास बुवा खरे यांनी रामनाम स्मरणबरोबरच जीवनात प्रयत्नांची ही जोड हवीच, मुलांच्या पुस्तकी ज्ञानाच्या शिक्षणाबरोबरच संस्काराचे धडेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

प्रथम श्रीचौडेश्वरी मातेची पूजा, दीपप्रज्वलन कैलासबुवा खरे, गंगाधर देव व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पूर्वरंगामध्ये निरूपणात कैलासबुवा खरे यांनी देवी म्हैशासूर मर्दीनी, देवी तू या पदावर यातून देवीचे महात्म्य सांगितले. महिषसुर राक्षस आणि रक्तबीजाचा वध देवीनं कसा केला? याविषयीचे सुंदर वर्णन दृष्टांत देत केले. माणसाने गंगेत स्नान केलं म्हणजे सगळी पापे नाहीशी होतील. परंतु पाप करण्याची वासना नाहीशी होणार नाही. फकत नामस्मरण करुन चालणार नाही संकट आले तर खंबीरपणे उभे राहता आलं पाहिजे. त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. देरे हरी पलंगावरी असं होतं नाही. सध्याच्या काळात संध्याकाळी ६ ते १० या वेळात नुसत्या मालिका पाहून आनंद मानणाऱ्या महिला पाहिल्या की कोठे माता जिजाऊ, कोठे अहिल्याबाई होळकर, कोठे झाशीची राणी असा प्रश्न पडतो. त्यांनी दिलेल्या मार्गावर जाण्याचा महिलाभगिनींनी थोडातरी प्रयत्न करावा म्हणजे शिवबांसारखी संतती जन्माला येईल.त्यासाठी संस्कार खूप महत्वाचे आहेत.जिजाऊंनी शिवरायांवर चांगले संस्कार केले. चित्तोड गडाची राणी पद्मिनीने स्वतःचा देह आगीत ढकलून दिल्यामुळे शत्रूंची निराशा झाली. सर्वांनी एकत्र येऊन काम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उपासनेने सामर्थ्य आणि सामर्थ्याची उपासना आवश्यक आहे. यासाठी भगवंताचे अधिष्ठान आवश्यक आहे. उत्तररंगात याचाच आधार घेत पंडीत कालीदासाचे आख्यान अतिशय सुंदर सादर करत जर आपण आपल्या ज्ञानाचा घमेंडखोर पध्दतीने वापर करत अन्याय केला. आपल्या पत्नीला त्रास दिला तर त्याचा तळतळाट विनाशास कारणीभूत ठरतो.असे विविध दाखले, सुंदर कथा सांगत करकंबकर रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना संगीत साथसंगत तबला ज्ञानेश्वर दुधाणे, हार्मोनियम गंगाधर देव, टाळ माऊली पिसे यांनी करत कीर्तनाला अधिक रंगत आणली. गायनाची उत्तम तयारी, गाढा अभ्यास कैलास बुवा खरे यांचा निरुपणात दिसून आला. पहिला दिवस असूनही करकंबकर रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**सहा दिवस चालणार महोत्सव**

सहा दिवस चालणाऱ्या या कीर्तन महोत्सवास करकंबकर भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीचौंडेश्वरी मंदिर कोष्टी समाज ट्रस्ट यांच्यावतीने करण्यात आले.यावेळी उत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व कोष्टी समाजबांधव मोठ्या संख्येने अधिक परिश्रम घेत आहेत.

CMYK

# आपला जिल्हा


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आठ हजारांची लाच स्वीकारताना पोलीस एसीबीच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ८ जानेवारी-**

भावकीतील भांडणातील गुण्यात सहकार्य करण्यासाठी व तक्रारदार याच्या पत्नीस अटक न करण्यासाठी आठ हजाराची लाच स्वीकारताना पोलीस हवालदार दत्तात्रय बळीराम थोरात यास एसीबीने रंगेहात पकडले.

याबाबत मिळालेली माहिती अशी कि दोन भावामध्ये भांडणे झाली होती यामध्ये दोघांनी एकमेका विरोधात माळशिरस पोलिसात तक्रार दाखल केली होती .तक्रारदार व त्याचे भाऊ यांना



सदर गुन्ह्यात अटके नंतर न्यायालयातून जमीन मिळाला होता .तक्रारदार यांच्या पत्नीस अटक न करण्यासाठी व दोषारोप पत्रात मदत करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडून तपास हवालदार थोरात यांनी दहा हजार रुपयांची मागणी केली तडजोडी नंतर ८ हजार तडजोड झाली.याबाबत तक्रारदार यांनी लाच लुचपत प्रतिबंधकव विभाग यांच्या संपर्क साधला.पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे व डॉ शितल जानवेयांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपाधीक्षक गणेश कुंभार ,गणेश पिंगुवाले ,पोलीस अंमलदार सायबन्ना कोळी ,संतोष नरोटे ,गजानन किणगी,चालक राहुल गायकवाड यांच्या पथकाने सापळा रचून थोरात यांना ८ हजाराची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.



## संक्षिप्त वृत्त...



### पुण्यात आ. हेमंत रासने यांचा सत्कार

**पंढरपूर, दि. ८ जानेवारी-**

संपूर्ण महाराष्ट्रातील सो. क्ष. कासार समाजाचे पुणे येथील आमदार हेमंत रासने यांचा सत्कार पंढरपूर कासार समाजाचे वतीने नुकताच पुणे येथे हरीनामाच्या गजरात करण्यात आला. संपूर्ण कासार समाजाला अभिमान असणारे व विधान सभेत कारार समाजाच्या इतिहासात जनतेतून प्रथमच निवडून जाणारे आमदार हेमंत भाऊंचा सत्कार पंढरपूर येथील कासार समाज बांधवांकडून खास तुळशीचा हार, विठ्ठलाचे पवित्र उपरणे तसेच श्री विठ्ठल रुक्मिणीची आकर्षक मूर्ती भेट देऊन करण्यात आला. याप्रसंगी पंढरपूर येथील कासार समाजाचे नेते सत्यविजय मोहोळकर, अभिजीत वाडेकर,वैभव येवनकर, अविनाश केजकर,शांतीनाथ रोकडे आदींसह इतर समाजबांधव उपस्थित होते. दरम्यान आमदार रासनेंच्या सत्कार समारंभापूर्वी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनीलभाऊ रासने यांनी श्रीचे मंदिरात पंढरपूरहून खास सत्कार समरंभासाठी आलेल्या कासार समाजबांधवांचा श्री गणेशाचे उपरणे घालून तसेच नारळ प्रसाद आणि श्रीचे कॅलेंडर भेट देऊन सन्मान केला.



### दहिगाव सब स्टेशन येथे नवीन ट्रान्सफॉर्मर बसवा : संजय सावंत

**करमाळा, दि. ८ जानेवारी-**


करमाळा नगरपरिषदेच्या. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या दहिगाव सबस्टेशन वर नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात यावा अशी मागणी करमाळा नगरपरिषदेचे माजी नगरसेवक संजय सावंत यांनी आज आमदार नारायण आबा पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली. यावेळी माजी नगरसेवक फारुक जमादार, मार्तंड सुरवसे, पांडुरंग सावंत आदी जण उपस्थित होते. यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, करमाळा नगरपरिषद शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी सध्या दहिगाव सबस्टेशन येथे जेऊर वरुन वीज पुरवठा केला जातो परंतु जेऊर ते दहिगाव दरम्यान अनेक वेळा नैसर्गिक आपत्ती येऊन अनेकवेळा वीजपुरवठा खंडित होतो. परिणामी करमाळा शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होतो. त्यामुळे दहिगाव सबस्टेशन येथे नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आल्यास तेथे वीजपुरवठा खंडित होणार नाही आणि शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होईल. त्यामुळे दहिगाव सबस्टेशन येथे नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात यावा असे सावंत यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



### यशवंत विद्यालयात क्रीडा सप्ताह

**बार्शी, दि. ८ जानेवारी-**

यशवंत विद्यालय, खांडवी येथे ६ ते ११ जानेवारी दरम्यान क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन समारंभप्रसंगी बार्शी शहरातील सुप्रसिद्ध विधीज्ञ ॲड. प्रवीण करंजकर, हरिभाऊ पाटील, महादेव देशमुख, प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सचिन देशमुख उपस्थित होते. ॲड. करंजकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर प्रशालेचे मुख्याध्यापक सिद्धेश्वर शिंदे यांनी खेळाचे जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. याप्रसंगी प्रशालेचे क्रीडाशिक्षक संतोष खोगरे, राजेंद्र शिंदे, मांजरे, तोरणे, रणजीत माने, राम घाडगे, विठ्ठल काशीद उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रमोद जाधव यांनी मानले.



### मैंदर्गीत कोष्टी समाजातर्फे पत्रकारांचा सत्कार

**मैंदर्गी, दि. ८ जानेवारी-**

मैंदर्गीत कोष्टी समाज, श्री देवरदासमय्या नैकार संघटनेतर्फे पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार नागेश भंगुर्गी. औदुंबर चव्हाण, शरणप्पा चलगेरी, गणेश गोब्बुर, श्रीशैल सुरपुरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज गोब्बूर, उपाध्यक्ष बसवराज वच्चे, शिवचलप्पा मुनोळी, सुभाष बंड्डे, महादेव बंड्डे, संगमनात गोब्बूर, रेवणसिद्ध हुलमनी, शिवचलप्पा मड्डे, धानप्पा गुंडद, संगमनाथ हसरमनी, महेश गोब्बूर, संतोष बाबा, विशाल मुन्नोळी, सोमशेखर म्हेत्रे, अमित देगील, स्वामीनाथ देगाव, जगदीश काळी, शिवचलप्पा संदोडे, नागप्पा मुंडोडगी, सोमू भुसनूर, राहुल आळंद, शिवानंद लाळसंगी, शरणप्पा म्हेत्री, मल्लिनाथ सलगर, गुरनिंगप्पा गोब्बूर उपस्थित होते.

## माण नदीवरील रस्ता दुरुस्तीसाठी नागरिक पुन्हा आक्रमक

### रस्ता रोकोसह ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ जानेवारी-**

सांगोला-कडलास दरम्यान माणनदीवरील रस्ता दुरूस्तीचे काम तातडीने करण्यासाठी कडलास, जवळा, सोनंद व परिसरातील नागरिक पुन्हा आक्रमक झाले आहेत. याबाबतचे निवेदन मंगळवार दि.७ जानेवारी रोजी या परिसरातील नागरिकांनी तहसीलदार संतोष कणसे यांना देण्यात आले आहे.

यावेळी दत्तात्रय जाधव, नितिन गव्हाणे, दत्तात्रय टापरे, कुमार चव्हाण,



केशव गायकवाड, दिपक गायकवाड, सुनिल लेंडवे, गणेश गायकवाड, संग्राम गायकवाड, अमरसिंह महांकाळ, केशव गायकवाड, बाळासो आवताडे, समाधान जावीर उपस्थित होते. सदर निवेदनामध्ये दि.२ एप्रिल २०२४ रोजी निवेदन देवून सांगोला-कडलास रोडवरील असणाऱ्या माणनदीच्या पुलावरती रास्ता रोको आंदोलन केले होते. त्यादरम्यान आम्ही ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केल्यामुळे आमचेवरती गु.र.नं. ४२५/२०२४ नुसार रितसर गुन्हा दाखल झालेला होता.

### तर ठिकाणावरुन हलणार नाही

कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात न आल्यास आम्ही सर्व समस्त ग्रामस्थ माणनदी पुलावरती पुनश्चः रस्ता रोकोसह ठिय्या आंदोलन करणार आहोत. रस्ता दुरूस्तीच्या कामास सुरूवात होईपर्यंत आम्ही त्या ठिकाणावरून उठणार नाही. तरी याची आपण दखल घेऊन त्वरीत कार्यवाही करण्यात यावी व कामास सुरूवात करावी असे नमूद करण्यात आले आहे.

त्यानंतर सदरच्या रस्त्यावरती अद्यापपावेतो खडीकरण-डांबरीकरण झालेले नाही. सदरच्या रस्त्यावरती मोठमोठे खडडे पडलेले असल्यामुळे अपघात होवून काही लोक मृत्यूमुखी झालेले आहेत. सदरच्या रस्त्यावरती अवजड वाहनांची रहदारी जादा असल्याकारणाने धुळीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. त्यामुळे शेती पिकाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होवू लागल्यामुळे शेतकऱ्यांचे कधीही न भरून येणारे अपरिमित असे नुकसान होवू लागलेले आहे. वरील सर्व वस्तुस्थितीचा गांभीर्याने विचार करून सदरचे रस्त्याचे खडीकरण-डांबरीकरण काम करणेसाठी संबंधित कार्यालयाकडे आपले कार्यालयामार्फत योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचे आदेश करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

## उपळे दुपाला येथे वाघाचा वासरांवर हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ८ जानेवारी-**

उपळे दुमाला (ता. बार्शी) शिवारात पुन्हा एकदा वाघाने सोमवारी रात्री एका शेतकऱ्याच्या दोन वासरावर हल्ला करून त्यांना ठार केले. सुमारे पंधरा दिवसांपूर्वी उत्तर बार्शी परिसरात ढेबरेवाडी येथे प्रथमत: वाघ आढळलेला होता.



सोमवारी रोजी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत मुंगशी (आर) येथील राहुल रामेश्वर कुरुंद या शेतकऱ्याचे मुंगशीपासून तीन किलोमीटर अंतरावर उपळे दुमाला हद्दीतील शेत आहे. बांधलेल्या सात गायी व दोन वासरांपैकी दोन वासरांवर वाघाने रात्री हल्ला केला. त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. ही घटना सकाळी गाईच्या धारा काढायला गेल्यावर कुरुंद यांच्या लक्षात आली. २३ डिसेंबर रोजी ढेबरेवाडी येथे तो वाघ आढळला होता. आता वैराग भागातील उपळे दुमाला हद्दीत त्याचा वावर दिसत असल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

## उजनी धरणावर पर्यटनस्थळ होण्यासाठी हालचाली सुरु

### माढ्याचे आ. अभिजीत पाटील यांनी केली परिसराची पाहणी

### करमाळ्याचे आ. नारायणआबा पाटील यांचीही उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ जानेवारी-**

माढा विधानसभा मतदार संघाचे धडाडीचे आमदार अभिजीत पाटील यांनी आपल्या मतदार संघाचे व्हिजन समोर ठेवत विकास झपाट्याने व्हावा. यासाठी आमदारपदी निवडून आल्यापासून प्रयत्न चालविले आहेत. त्यातीलच एक महत्वाच्या म्हणजेच उजनी धरणाच्या पर्यटन स्थळ विकासासाठी हिवाळी अधिवेशनवेळी प्रश्न मांडला होता. त्याची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यावेळी उजनी धरणावरील पाणी सोडण्याचे नियोजन जाणून घेत धरणाची



पाहणी केली.

सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी ठरलेल्या उजनी धरणावर पर्यटन स्थळ व्हावे. त्यामुळे मोठे अर्थकारण या भागासाठी उपल्ब्ध होईल. यासाठी माढा विधानसभेचे आमदार अभिजीत पाटील यांनी नागपूर अधिवेशनामध्ये उजनी धरणावर पर्यटन स्थळ व्हावे. म्हणूनच आवाज उठवला असता, त्यावर तातडीने उजनी धरण भिमानगर येथे उजनी धरणाचे अधिकारी व आ. अभिजीत पाटील व आ. नारायण आबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक पार पडली. त्यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी उजनी धरणाचीही आवर्जून पाहणी केली आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य भारत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे संजय कोकाटे, भारत पाटील, नितीन कापसे, सरपंच प्रमोद कुटे, डीव्हीपी बँकेचे चेअरमन औदुंबर महाडिक, नाना महाडिक, सौदागर जाधव यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी उपस्थित होते.

## जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगोला येथे घेतला कामकाजाचा आढावा



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ जानेवारी-**

पंचायत समिती, सांगोला येथे दि.७ जानेवारी रोजी सोलापूर जिल्हा परिषद येथील मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी पंचायत समितीमधील खाते प्रमुख ग्रामपंचायत अधिकारी यांची बैठक घेत कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत ईशादीन शेळकंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्वच्छ भारत मिशन अमोल जाधव, कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे, नरेगा गटविकास अधिकारी अरुण वाघमोडे, लेखा अधिकारी रूपाली रोकडे, जिल्हा कृषी अधिकारी सागर बारवकर उपस्थित होते. यावेळी कुलदीप जंगम यांनी केंद्र व राज्य पुरस्कृत योजना बाबत, मंजूर घरकुले सुरू करणे व पूर्ण करणे बाबत ग्रामपंचायत निहाय आढावा घेतला. जर वेळेत घरकुलाचे काम पूर्ण न झाल्यास संबंधित लाभार्थी यांचेवर गुन्हे दाखल करण्यात यावेत तसेच संबंधित सरपंच व ग्राम सेवक यांना जबाबदार धरून पुढील कारवाई करणे बाबत तसेच दलित वस्ती कामकाज, घरकुल स्वच्छ भारत मिशन, १५ वा वित्त आयोग, सेवानिवृत्त प्रकरणे, पेन्शन प्रकरणे व आयुक्त तपासणी शक, जलजीवन मिशन याबाबत सविस्तर आढावा घेऊन संबंधितांना सूचना देण्यात आल्या. प्रास्ताविक सांगोला गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांनी तर सूत्रसंचलन आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत यांनी केले.

### लाभार्थ्यांची घेतली भेट

कुलदीप जंगम यांनी वाढेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेच्या विहीर लाभार्थ्यांची भेट घेऊन पाहणी केली. तसेच गौडवाडी येथील बायोगॅस व सोलर टॅपची पाहणी केली. यावेळी गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, सहाय्यक गटविकास अधिकारी वसंत फुले, कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे, कृषी अधिकारी दिपाली शेंडे उपस्थित होत्या.



## इंडियन डेंटल असोसिएशन पंढरपूरची नवी कार्यकारिणी जाहीर

### पंढरपूरला राज्यातील सर्वोत्कृष्ट लोकल शाखेचा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ जानेवारी-**

राज्यात नावाजलेल्या पंढरपूर डेंटल असोसिएशनची नवी कार्यकारिणी नुकतीच जाहिर करण्यात आली. अध्यक्ष पदी डॉ. किर्ती गांधी, सचिव पदी डॉ. निनाद जमदाडे,तर कोषाध्यक्ष पदी डॉ.योगेश दोशी यांची निवड करण्यात आली.

मावळत्या अध्यक्षा डॉ.सौ. ऋचा खुपसंगीकर यांनी कार्यभार नव्या सदस्यांकडे सोपविला. नूतन सचिव डॉ.निनाद जमदाडे यांनी मागील वर्षी आयोजलेल्या सर्व प्रमुख उपक्रमांची दखल घेत याही वर्षी अनेक विधायक उपक्रम राबविणार असल्याची माहिती दिली. मागील वर्षी राज्यातील सर्वोत्कृष्ट लोकल शाखेचा पुरस्कार आणि इतर दोन वैयक्तिक पुरस्कार इंडीयन डेंटल असोसिएशन, पंढरपूर शाखेला मिळाला होता. नवीन उपक्रमाची सुरुवात १२ जानेवारी २०२५ रोजी होणार असून, या दिवशी भव्य रक्तदान शिबिर संघटनेच्या वतीने ,अग्रज हॉस्पिटल, कराड नाका पंढरपूर येथे सकाळी ११ ते ५ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे.तरी इच्छुकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे. नवी कार्यकारिणी सर्व डॉक्टरांचे प्रश्न, तसेच डॉक्टर-पेशंट नातेसंबंध सुधारण्यावर भर देणार असल्याचे सूतोवाच यावेळी संघटनेच्या वतीने करण्यात आले.

## तब्बल आठ तास आ. अभिजीत पाटीलांनी घेतला मतदारसंघाचा आढावा

### कुर्डूवाडी पंचायत समिती अधिकाऱ्यांसोबत चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ८ जानेवारी-**

माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभा सदस्य पदाची शपथ घेतल्यापासून कामाचा धडाका सुरू केला आहे. पहिल्याच पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनात मतदार संघातील ५५ प्रश्न आमदार म्हणून अभिजीत पाटील यांनी मांडले आहेत.

माढा विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यनिष्ठ आमदार अभिजीत पाटील यांनी मतदार संघाचा संपूर्ण आढावा घेतला. सोमवार दिनांक ६ जानेवारी रोजी माढा पंचायत समिती कुर्डूवाडी या ठिकाणी विविध विभागाची बैठक पार पडली.



तब्बल आठ तास चाललेल्या या बैठकीत प्रामुख्याने रस्ते, वीज तसेच मूलभूत गरजा यावरती चर्चा करून आमदार अभिजीत पाटील यांनी अधिकाऱ्यांचे मतदार संघातील नागरिकांच्या मूलभूत गरजांवरती लक्ष केंद्रित केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य भारत आबा शिंदे, माढ्याचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी, कृषी अधीक्षक, कृषी अधिकारी, एसटी डेपो मॅनेजर तसेच सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी माढा शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभा करण्याच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा करण्यात आली. तसेच मतदार संघासाठी २२० केवी सब स्टेशन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे बाबत आदेश देण्यात आले. शासनाच्या विविध योजनेत वंचित घटकांना सामावून घेऊन नागरिकांना योग्य त्या योजनेचा लाभ द्यावा असे आदेश संबंधित विभागाला देण्यात आला. याचबरोबर कृषी विभागातील योजनेचा आढावा घेऊन विविध योजनेसाठी नव्याने फळबागा समाविष्ट करण्या बाबतीत सकारात्मक चर्चा करण्यात आली. याबाबत आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत प्रश्न मांडला होता. अनेक वर्षांपासून मतदार संघातील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. ही बाब लक्षात घेता मतदारसंघातील ग्रामीण मार्ग बाबतीत आराखडा तयार करून तो लवकरच मंजुरीसाठी देण्यात यावा असे आदेश आमदार अभिजीत पाटील यांच्या वतीने संबंधित विभागांना देण्यात आले. शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी मतदार संघात अंगणवाडी उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून त्याठिकाणी नवीन अंगणवाडीचे कामाला सुरूवात करण्याचे संबंधितांना आदेश देण्यात आले.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## शाकंभरी नवरात्रात तुळजाभवानीस रथलंकार महापूजा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ जानेवारी -**

शाकंभरी नवरात्र महोत्सवानिमित्त दिनांक ८ जानेवारी रोजी देवीच्या नित्योपचार पूजेनंतर आई तुळजाभवानीस रथ अलंकार महापूजा मांडण्यात आली. महतेस ही रथ अलंकार महापूजा मंदीर संस्थान तर्फे मांडली जाते.

भगवान सूर्यनारायणांनी श्री देवीस त्रिलोक भ्रमणासाठी आपला रथ दिला होता त्या प्रसंगाची आठवण म्हणून शाकंभरी नवरात्र महोत्सवात रथ अलंकार महापूजा बांधली (मांडली) जाते.

आकर्षक आणि सुंदर अशी रथलंकार महापूजा पाहण्यासाठी तसेच रथलंकारांमधील देवीचे दर्शन भाविकांनी घेण्यासाठी मंदिरात मोठी गर्दी केली होती.



दिनांक ७ जानेवारी रोजी रात्री मंदिरात देवीचा छबिना वाघ या वाहनांवरून काढण्यात आला होता.

छबिना मिरवणुकीसाठी महंत, पुजारी, भाविक आणि मंदिर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात गाजत वाजत देवीचा छबिना काढण्यात आला होता.

## संक्षिप्त वृत्त...



### स्पर्धेसाठी १९ मुलींची निवड

**उमरगा, दि.८ जानेवारी -**

उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलच्या १९ मुलींची शालेय राज्यस्तरीय तेंग सुडो स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. नुकत्याच धाराशिव येथे पार पडलेल्या विभागीय तेंग सुडो स्पर्धेत शाळेतील वेगवेगळ्या वजन गटामध्ये १९ मुलींनी यश प्राप्त केलेले आहे. त्यामध्ये अश्विनी जाधव, अफसाना नदाफ, श्रेयशी शिंदे, श्रुती जाधव, अनुराधा गुंडे, नेत्रा शेठगार, मोहिनी घोडके, राधिका इटकर, सायली पवार, गीता गायकवाड, अश्विनी आबाचाने, श्रावणी घोडके, पल्लवी पवार, अर्चना धोत्रे, सुजाता दंडगुले, ईश्वरी माने, नेहा माने, प्रमिला जाधव इत्यादी मुलींनी यश मिळवले आहे.राज्यस्तरीय स्पर्धा धुळे येथे ९ व १० जानेवारी दरम्यान होणार आहेत. या यशाबद्दल आमदार प्रवीण स्वामी, किरण गायकवाड, अँड. आकांक्षा चौगुले, शकुंतला मोरे, अशोक पतगे, अमर वरवटे, सदानंद शिवदे, सुजाता मोरे, शिवकुमार बिराजदार, काकासाहेब साळुंके, शिला मुदगडे, पद्माकर मोरे व शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### दर्पणदिनानिमित्त पत्रकारांचे सत्कार

**तुळजापूर, दि.८ जानेवारी -**

दर्पण दिनानिमित्त शहरातील श्री समर्थ कॉम्प्युटर्स मध्ये स्थानिक पत्रकारांचे सत्कार करण्यात आले. तुळजाभवानी देवीच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. श्री समर्थ कॉम्प्युटरच्या संचालिका अनुराधा नाईक यांनी उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन केले. त्यानंतर पत्रकार गोविंद खुरूद, जगदीश कुलकर्णी, श्रीकांत कदम, संजय कुलकर्णी, प्रदीप अमृतराव, संजय खुरूद, ज्ञानेश्वर गवळी, सचिन ताकमोघे, सुरज बागल यांचे सत्कार मोहनराव नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर समर्थ कॉम्प्युटरच्या दिनदर्शिकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

### वादविवाद स्पर्धेचे आयोजन

**उमरगा, दि.८ जानेवारी -**

भारत शिक्षण संस्थेचे संस्थापक चिटणीस शिक्षणमहर्षी (कै) तात्याराव मोरे यांच्या स्मरणार्थ श्री छत्रपती



शिवाजी महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१०) आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात स्वातंत्र पुर्व काळातील भारत शिक्षण संस्थेचे संस्थापक चिटणीस शिक्षणमहर्षी कै. तात्याराव मोरे यांच्या स्मरणार्थ गेल्या ३९ वर्षापासून दरवर्षी एका ज्वलंत विषयावर वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास दहा हजार एक रुपये,स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय येणाऱ्या संघास सात हजार एक रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय संघास पाच हजार एक रुपये, याशिवाय कनिष्ठ महाविद्यालय संघासाठी उत्तेजनार्थ तीन हजार एक रुपये, प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. तरी स्पर्धेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि संयोजन समितीने केले आहे.



### २२ विद्यार्थ्यांची इंटरनशिपसाठी निवड

**तुळजापूर, दि.८ जानेवारी -**

श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय तुळजापूर मधील अनुवैजिक व दूरसंचार विभागातील एकूण २२ विद्यार्थ्यांची पुणे येथील बजाज इंजिनिअरिंग अँड स्किल ट्रेनिंग व सिबोईसिस यांच्यातर्फे इंटरनशिपसाठी निवड झाली आहे. यामध्ये ६ मुले व १६ मुलींचा समावेश आहे. सदरील विद्यार्थ्यांना ६ महिन्यासाठी इंटरनशिप केल्यानंतर ४ ते ६ लाख रुपयांचे पॅकेज नामांकित कंपनीत मिळणार आहे. सदरील विद्यार्थ्यांचे अभिनंदन जिल्हाधिकारी तथा महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे, तहसीलदार तथा मंदिर संस्थांचे व्यवस्थापक श्रीमती माया माने, प्राचार्य रवि अडेकर यांनी केले आहे. यासाठी विभागप्रमुख प्रा. सुर्यवंशी पी.टी., प्रा. पतंगे व्ही. व्ही., प्रा. करंजकर एम.एन., प्रा. नारायणकर एम.के., प्रा. बुरंगे एस.एल. यांचे मार्गदर्शन लाभले.

### वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचे उद्घाटन

**तुळजापूर, दि.८ जानेवारी -**

तरुण पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि वाचन संस्कृती वाढविण्यासाठी १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम दरवर्षी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.या उपक्रमाचे उद्घाटन ७ जानेवारी रोजी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात करण्यात आले.

## सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांच्या मागणीला यश...

# याचिकेतील मंजूर रक्कम शेतकऱ्यांना तातडीने उपलब्ध करून देण्याचे विमा कंपनीला आदेश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जानेवारी -**

खरीप २०२० मध्ये धाराशिव जिल्ह्यातील नऊ लाख ४८ हजार ९९० अर्जदार शेतकऱ्यांनी पिक विमा भरला होता. तांत्रिक कारणे काढत पिक विमा कंपनीने केवळ ७९ हजार शेतकऱ्यांना ५६ कोटी रुपये वाटप केले. या विरुद्ध धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी व लोकप्रतिनिधीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर याचिका मंजूर करीत धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्याला ६०४ कोटी रुपये देण्याचे आदेश केले. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर देखील सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवला.

बजाज अलायन्स पिक विमा कंपनी २०२० मध्ये ६०४ कोटी रुपये देणे लागत असताना तांत्रिक कारणे काढून रक्कम नाकारली पिक विमा शासन निर्णय २६ जून २०२३ मधील तरतुदीनुसार शेतकऱ्याला रक्कम देण्यास विलंब झाल्यास १२ टक्के व्याजाने रक्कम देण्याची तरतूद आहे. हाच मुद्दा पकडून अनिल जगताप यांनी जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे याचिका दाखल केली होती. त्यांची याचिका जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीने मंजूर करून शेतकऱ्यांना व्याज देण्याचे आदेशित केले होते. त्यानुसार जिल्हा कृषी अधीक्षक यांनी १ जानेवारी २०२५ रोजी पत्र काढून ४२ कोटी ४२ लाख रुपये शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी उपलब्ध करून द्यावे, असे कंपनीला आदेशित केले आहे.



बजाज पिक विमा कंपनीने तांत्रिक कारणे काढून रक्कम दिल्यास विलंब केला. पिक विमा शासन निर्णयातील तरतुदीनुसार ६०४ कोटी रुपयांचे तीन वर्षाची व्याज मागणी याचिका दाखल केली होती. ती रक्कम १९५ कोटी इतकी होते. केंद्र व राज्य शासनाने हप्ता कधी दिला याचा शेतकऱ्याशी काही संबंध नाही. ६०४ कोटी रुपयांचे व्याज मिळालेच पाहिजे. आत्ता केवळ ४२ कोटी ४२ लाख रुपये ची मागणी झाली आहे. ही सुरुवात असून १९५ कोटी रुपये मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही. या आदेशाच्या संरक्षणासाठी मी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर व उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथे कॅव्हिएट दाखल करत आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम पडेपर्यंत संघर्ष सुरूच राहील. विलंब रकमेसाठी व्याज मागणी करणारी ही महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिलीच घटना आहे.

**- अनिल जगताप,** सामाजिक कार्यकर्ते तथा पिक विमा याचिकाकरते.

## धाराशिव शहरात

# किरकोळ वादातून एकाच खून



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जानेवारी -**

धाराशिव शहरातील खाजा नगर भागात गल्ली नंबर १३ मदिना मस्जिद समोर रस्त्यावरच मंगळवारी रात्री दोन मित्रांमध्ये किरकोळ वादातून तुफान हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यात एका मित्राचा जागीच मृत्यू झाला असून दुसरा किरकोळ जखमी झाला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मयत तरुणाचे नाव परवेज दगडू बेग (वय ४०) असून तो गल्ली नंबर ७ खाजा नगर, धाराशिव येथे राहत होता.

जखमी तरुणाचे नाव कुमार काशिनाथ गोरे (वय ४०) असून तो तांबरी विभाग, धाराशिव येथे राहतो.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्रम अहमद शेख या तरुणाने परवेज दगडू बेग याच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात परवेजचा जागीच मृत्यू झाला.

कुमार गोरे याला किरकोळ दुखापत झाली आहे. मयत परवेज आणि आरोपी अक्रम हे मित्र होते. संशयावरून हा खून झाल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे.

घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून त्यांनी परिसरातील लोकांचे जबाब नोंदवले आहेत. याप्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी विलास राठोड

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.८ जानेवारी -**

येथून जवळच असलेल्या अलियाबाद येथील संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृद्धी योजनेचे जिल्हा अशासकीय सदस्य, भाजपचे तालुका सरचिटणीस विलास राठोड यांची राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या निवड झाली आहे.

जिल्हा उपाध्यक्षपदी रामतीर्थचे माजी सरपंच दामाजी राठोड यांची तर जिल्हा सरचिटणीसपदी जळकोटवाडीचे माजी सरपंच वसंत पवार यांची निवड करण्यात आली आहे. गोर धर्मपीठ, लोधीवली, मुंबई येथे पार पडलेल्या राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या अधिवेशन कार्यक्रमात या निवडी घोषित करण्यात आल्या.

यावेळी पोहरदेविचे धर्मगुरू महंत जितेंद्र महाराज,धर्मनेता किसन राठोड, राष्ट्रीय अध्यक्ष विलास राठोड, प्रदेशाध्यक्ष भिकन जाधव, मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे राज्याचे प्रमुख रामेश्वर नाईक व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत निवडीचे पत्र देण्यात आले.

विलास राठोड यांचे सामाजिक ,सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य पाहून त्यांच्यावर संघटनात्मक काम करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

लोकशाही मार्गाने कायद्याच्या माध्यमातून सामाजिक जनहित जोपासून संघटनेचे नाव उज्वल कराल.

ही अपेक्षा तसेच गोरबंजारा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय समस्या सोडवण्यासाठी आपण कार्यरत राहून राष्ट्रीय बंजारा परिषद ही संघटना मजबूत करावी, असे निवड पत्रात म्हटले आहे.

## कामगार कल्याण मंडळाकडून कामगार महिलांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ जानेवारी -**

नवनिर्मिती प्रेरणा बहुउद्देशीय महिला मंडळ सामाजिक संस्थेच्या वतीने तहसीलदार यांना घरेलू कामगार संदर्भात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्या जिल्हा कार्यालयातून देण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी २२ जानेवारी २०२४ रोजी धाराशिव येथील कार्यालयामध्ये लाभार्थ्यांनी अर्ज दाखल केला होते.

एक वर्ष उलटून अद्यापही अर्जदारांना कसल्याही प्रकारचा लाभ मिळालेला नाही. एवढेच नाही तर नोंदणी झालेल्या धाराशिव येथील महाराष्ट्र कामगार मंडळ कार्यालयातून फोन करून त्यांना भांडे मिळणार असल्याचे सांगत कार्यालयामध्ये बोलावून भांडे ठेवलेल्या जागेजवळ उभा करून त्यांचे फोटो काढून घेतले आणि त्यांच्या सह्या घेतल्या. पाच सहा महिने उलटून गेले तरीही कोणत्याच लाभार्थ्याला साहित्य अथवा योजनेचा कोणताच लाभ मिळालेले नाही.



**लाभार्थी संसार उपयोगी भांडे मिळाले म्हणून भांड्यासह फोटो काढले पण भांडे दिले नाहीत ! चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी**

तरी या संदर्भात तुळजापूर येथील महिला अर्जदार लाभार्थ्यांनी याबाबत तुळजापूर येथील तहसीलदार यांच्याकडे धाव घेतली व झालेली हकीकत निवेदनाद्वारे त्यांना सांगितले.

याबाबत लवकरात लवकर त्या कार्यालयातील अधिकारेची चौकशी करण्यात यावी व यामध्ये लाभार्थ्यांना मिळालेल्या वस्तू कोणापर्यंत गेल्या याची चौकशी करण्यात यावी अन्यथा न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल याची दखल सदरील महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी घ्यावी अशी महिलांच्या मार्फत निवेदन तहसीलदार तुळजापूर यांना करण्यात आले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ता मीना सोमाजी, संध्या खुरुद, रूपाली घाडगे, लता सोमाजी, लता हरवलकर, सुनिता काळे, सविता कानडे, जयश्री भालेकर, माधुरी पाटील, कविता पवार, सविता लबडे, सुनिता मसारे, शांता सुरवसे, अनिता शिंदे, कमल दांडे, स्मिता जमदाडे यांच्या आदि महिलांनी निवेदन दिले.

## लोणी प्रभागातील स्वयसहाय्यता गटांना १ कोटी ६ लाख कर्ज वाटप

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ जानेवारी -**

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती परंडा व भारतीय स्टेट बँक शाखा परंडा यांच्या संयुक्त विद्यमाने उमेद अंतर्गत स्थापन झालेल्या लोणीतील प्रभागातील २२ व डोंजा प्रभागातील २ गटांना महिला स्वयसहाय्यता गटांना भारतीय स्टेट बँक (SBI) शाखा परंडा यांच्या मार्फत २४ महिला स्वयसहाय्यता गटांना १ कोटी ६ लाख रुपये बँक कर्ज वाटप करण्यात आले.प्रथम बँक मेळाव्याचे उदघाटन शंकर सर मुख्य व्यवस्थापक कर्ज विभाग, शाखाधिकारी माने, फिल्ड ऑफिसर खैरे. ताटे, ढोरे, खांडेकर, समाधान माळी, विजय गवळी, वर्षा चव्हाण यांनी क्रांती ज्याती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सदर कार्यक्रमामध्ये शंकर मुख्य व्यवस्थापक कर्ज विभाग यांच्या हस्ते २४ महिला स्वयसहाय्यता गटांना १ कोटी ६ लाखाचे कर्ज वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलास ताटे यांनी केले. तर आभार प्रदर्शन तुकाराम ढोरे यांनी केले.




कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रभाग समन्वयक समाधान माळी, विजय गवळी, प्रभाग संघ व्यवस्थापकवर्षा चव्हान, निर्मला लोखंडे, मीना शिंदे, कल्याणी लिमकर, शितल राऊत, मंगल लिमकर मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

## यात्रा काळात अवैध धंदे होऊ देणार नाही : पोनि. सरोदे

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ जानेवारी -**

श्रीक्षेत्र मैलारपुर (नळदुर्ग) येथील श्री खंडोबा यात्रेत यावर्षी एकही अवैध धंदा किंवा दारू विक्री होऊ देणार नाही असे नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या बैठकीत बोलतांना सांगितले.

दि. १२ ते १४ जानेवारी या कालावधीत श्रीक्षेत्र मैलारपुर (नळदुर्ग) येथे श्री खंडोबा देवाची महायात्रा संपन्न होणार आहे. या यात्रेनिमित्त दि.७ जानेवारी रोजी नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने मैलारपुर येथील श्री खंडोबा मंदिर सभागृहात बैठकीचे आयोजन कारण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे हे होते. तर माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण, बसवराज धरणे, विनायक अहंकारी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, नळदुर्ग येथील मानकरी सुहास पाटील, अणदुरचे माजी सरपंच धनराज मुळे, श्रीमंत मुळे गुरुजी, माजी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे, कल्याणी मुळे, गुणवंत मुळे, महादेवप्पा मुळे, लक्ष्मण मुळे, प्रविण घोडके, गुरुनाथ मिटकरे, बाळापा गळाकाटे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

## नाफेडकडुन बारदाना त्वरीत उपलब्ध करा : सुरेश बिराजदार




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ जानेवारी -**

हमीभाव योजनेअंतर्गत सोयाबीन खरेदीसाठी बारदाना त्वरित उपलब्ध करून द्यावा व शेतकऱ्यांची होणारी अडचण दूर करावी असे निवेदन जिल्हाधिकारी यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांच्यामार्फत दि.४ रोजी दिले आहे.

सबंध जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची अडचण ओळखून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश दाजी बिराजदार यांनी निवेदन दिलं आहे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासकीय हमीभाव योजने अंतर्गत शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदीसाठी मागील सात दिवसापासुन बारदाना उपलब्ध नसल्यामुळे खरेदी केंद्र बंद अवस्थेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे खुप मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. खुल्या बाजारात सोयाबीनचे दर खुपच कमी झाले आहेत. त्यामुळे शेतकरी शासकीय हमीभाव खरेदी केंद्राकडे गर्दी करत आहेत. परंतु खरेदी केंद्राकडे बारदाना उपलब्ध नाही. मार्केटींग फेडरेशन नाफेड यांचेकडुन बारदाना लवकरात लवकर उपलब्ध झाले तर शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही. तरी संबंधीत केंद्रासाठी बारदान्याची व्यवस्था करणेसाठी योग्य ती उपाययोजना करावी असे निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनावर राष्ट्रवादी पदवीधर प्रदेश उपाध्यक्ष नितीन बागल, राष्ट्रवादी युवक जिल्हा सरचिटणीस शमशोद्दीन जमादार, सरपंच श्रीराम जगदाळे, आदींच्या सह्या आहेत.

## लोकमंगल मल्टीस्टेट शाखा वाशी येथे पत्रकाराचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.८ जानेवारी -**

लोकमंगल मल्टीस्टेट शाखा वाशीच्या वतीने आज सोमवारी पत्रकार दिनानिमित्त येथील म.रा.म.प.चे. अध्यक्ष शहाजी चेडे, सचिव शिवाजी गवारे व ज्येष्ठ पत्रकार बळीराम जगताप यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना पुष्पगुच्छ व पेन (लेखनी) देऊन सत्कार केला.

शाखाधिकारी विनोद जुगदर, कर्मचारी विश्वजीत चेडे व अनिकेत फाटक यांनी सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे येथील वाशी अर्बन बँकेत ही पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

यावेळी शाखाधिकारी मोळवणे तसेच व्हा चेअरमन एम.आय. मुजावर सह बळीराम जगताप, शहाजी चेडे व शिवाजी गवारे उपस्थित होते.

## सावित्रीबाई फुलेंना अभिवादन...



### तुळजापूरात पत्रकारांचा सत्कार

**तुळजापूर, दि.८ जानेवारी -**

दर्पण दिनाचे औचित्य साधून महाविकास आघाडीच्या वतीने शहरातील सर्व पत्रकारांचा सत्कार ॲड. धीरज पाटील यांच्या संपर्क कार्यालयामध्ये करण्यात आला. बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. काँग्रेसचे युवा नेते अमोल कुतवळ, शिवसेनेचे शहराध्यक्ष सुधीर कदम, शेकापचे उत्तम अमृतराव, माजी नगरसेवक भाऊ भांजी, रणजीत इंगळे, राहुल खपले यांच्या हस्ते उपस्थित सर्व पत्रकारांचे सत्कार करण्यात आले. तत्पूर्वी समाजसेवक पंकज शहाणे व पुजारी उमेश क्षीरसागर यांचा गौरव सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीचे शरद जगदाळे, नवनाथ जगताप, नंदकुमार लांडे, औदुंबर करंडे, विकास चव्हाण, विराज जगदाळे यांच्यासह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### रोहिणी पवार यांचे स्वागत

**जळकोट, दि.८ जानेवारी -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भीमनगर, जळकोट शाळेत समायोजन प्रक्रियाद्वारे आलेल्या श्रीमती रोहिणी पवार यांचे स्वागत शालेय व्यवस्थापन समिती सदस्य तसेच माता पालक संघ व शालेय विद्यार्थी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कोमल माने,श्यामल लोखंडे, शुभांगी लोखंडे, जयश्री माने, सोनल भालेराव, साधना लोखंडे, सुनीता लोखंडे, सुजाता लोखंडे, रोहिणी माने, बबीता लोखंडे, उमेश लोखंडे, सतीश माने, गणेश लोखंडे व बालाजी माळी यांची उपस्थिती होती. यावेळी रोहिणी पवार यांनी शाळेत विविध उपक्रम राबवून गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न सर्वजण करू, असे आश्वासन दिले. आभार बालाजी माळी यांनी मानले.

### बबीता महानोर यांना पुरस्कार

**जळकोट, दि.८ जानेवारी -**

लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, विज्ञानभिमूखता व राष्ट्रवाद ही पंचसूत्री आदर्श मानून व माहिती व



तंत्रज्ञान युगातील विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापक यांची समतावादी संघटना हे घोषवाक्य घेऊन स्थापन झालेल्या इंडियन स्टुडंट कौन्सिलला अवघ्या ५ वर्षाच्या कालखंडात महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात स्वतःचा एक वेगळा ठसा उमटवला आहे. या वर्षीच्या सावित्रीच्या लेकी पुरस्काराच्या मनकरी राजकीय क्षेत्रातील आ. यशोमती ठाकूर (अमरावती), मानव्यविद्या शाखा संशोधन क्षेत्रांतील प्रा.डॉ. माधवी महाके (लातुर) तर विज्ञान शाखेतील संशोधन क्षेत्रातील प्रा.डॉ. अनिता पाटील (अमरावती), सांस्कृतिक क्षेत्रातील अभिनेत्री अश्विनी गिरी (पुणे), प्रशासकीय प्रा.डॉ. भावना पाटोळे (मुंबई), शैक्षणिक प्रा.डॉ. प्रज्ञा अशिर्वाद (मुंबई), सामाजिक अनिता मशराम (नागपूर ) व आदर्श शिक्षका बबीता महानोर (धाराशिव) या ठरल्या आहेत.



### परंड्यात संगित मैफिल

**परंडा, दि.८ जानेवारी -**

ग्रामीण भागातही शास्त्रीय संगीताचे मुळे रुजण्यास सुरुवात निमित्त कै. रामराव फडतरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त साकत (बु) येथे संगीत मैफिलीचे आयोजन फडतरे बंधूंनी केले होते. ग्रामीण भागात शास्त्रीय संगीताची मैफिल करणे हे खूप आनंददाई आहे. फडतरे बंधू गेली तीन वर्षे ही मैफिल आयोजित करतात मैफिलीची सुरुवात तबला, हार्मोनियम जुगलबंदीने झाली हार्मोनियम मधील राग चारुकेशी व तबल्यामधील ताल रूपक यांचा उत्कृष्ट मिलाप करून अनेक वेगवेगळ्या लय व तानाचे प्रकार अप्रतिम होते. अतिदृथ झाला. तबला पखवाज व हार्मोनियमने रसिक मंत्रमुग्ध होऊन गेले. तबला हनुमंत फडतरे, हार्मोनियम सुरेश फडतरे व समारोपाचे गायन कर्नाटक हुबळी येथील पं. कृष्णेंद्र वाडीकर यांनी सुंदर राग जोग, मारूबिहाग, आलाप तानाचे प्रकार गावकरी ऐकून खुश झाले. तदनंतर अभंग सादर केले रसिकांच्या आग्रहास्तव कानोबा तुझी घोंगडी हा अभंग पण सादर केला पंचक्रोशीतील लोकांना खूप आनंद घेतला भूम, परंडा, पाथरूड, बार्शी या गावातील रसिक उपस्थित होते.

## सात कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी केली विविध कार्यालयातील स्वच्छतागृहांची व नागरिकांच्या सुविधांची पाहणी





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जानेवारी -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे (ईज ऑफ लिव्हिंग) यासाठी सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित केला आहे.या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे यांनी आज ८ जानेवारी रोजी धाराशिव येथील विविध कार्यालयांना भेटी दिल्या.

यावेळी डॉ. ओम्बासे यांनी विविध कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखांना येत्या शंभर दिवसात प्राधान्याने करावयाची कामाबाबत सूचना दिल्या.या सूचनांवर काय कार्यवाही केली याबाबत येत्या १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून घेतला जाणार असल्याचीही माहिती त्यांनी दिली.

जिल्हाधिकारी डॉ. ओंम्बासे यांनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील सर्व कार्यालयांना, पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयास, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय,जिल्हा परिषदेतील सर्वच विभाग आणि नगर परिषदेला भेट दिली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक गणेश बारगजे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शेषेराव चव्हाण, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांच्यासह विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

शासकीय कार्यालयांची स्वच्छता करा, अनावश्यक कागदपत्रे काढून टाका, खराब आणि वापरात नसलेली वाहने निर्लेखित करावीत. शासकीय कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, प्रसाधनगृह कायम स्वच्छ राहतील याकडे लक्ष दयावे. असे निर्देश डॉ. ओंबासे यांनी दिले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अचानक भेटी होतील. त्यावेळी ते स्वच्छ दिसले पाहिजे. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर (ईज ऑफ लिव्हिंग) व्हावे यासाठी किमान दोन सुधारणा, नाविन्यपूर्ण उपक्रम आपल्या कार्यालयात राबविण्यात यावेत.

प्रलंबित कामांची संख्या शून्यावर कशी येईल, याचा प्रयत्न करावा. अधिकारी नागरिकांसाठी कार्यालयात कधी उपलब्ध असतील याची माहिती फलकावर नमूद करावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

जिल्ह्यातील विविध महत्त्वाचे कार्यक्रम आणि योजनांना भेटी दिल्या पाहिजेत. तसेच तालुका, गावपातळीवर भेटी झाल्याच पाहिजेत.

शाळा, अंगणवाडी आणि आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या पाहिजे. यांचे वेळापत्रक निश्चित करण्यात यावेत, अशा सूचना डॉ. ओंबासे यांनी दिल्या.

## प्रक्षाळ मंडळाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ जानेवारी -**

तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सव प्रारंभ झाला असून ११ जानेवारी रोजी प्रक्षाळ मंडळाच्या वतीने रूढी परंपरेनुसार प्रतिवर्षाप्रमाणे भव्य दिव्य पारंपारिक जल यात्रा उत्सव मिरवणूक होणार आहे शाकंभरी देवीची प्रतिमा ही संपूर्ण भाजीपाला व फळे वापरून सुशोभित करून जल यात्रा उत्सवात या देवीची रथामध्ये मिरवणूक काढण्यात येते. सुहासिनी कुमारी का आराधी महिलांचा जल यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग असतो प्रक्षाळ मंडळाच्या वतीने पाच हजार कलश जल यात्रेत सहभागी होणाऱ्या महिलांना वाटप करण्यात येतात जल यात्रेत दिंड्या पताका गोंधळी आराधी वारुळवाले, धनगरी ढोल, वाद्य पारंपारिक बँड बँजो तुतारी यांच्यासह पापनास तीर्थ येथून तुळजाभवानी देवी मंदिरापर्यंत भव्य जल यात्रा मिरवणूक काढण्यात येते. अशी माहिती प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी यांनी या कार्यक्रम प्रसंगी दिली. दिनांक ८ जानेवारी रोजी प्रक्षाळ मंडळाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन महंत तुकोजी महाराज शहरातील सर्व पत्रकार यांच्या हस्ते करण्यात आले दिनदर्शिकेच्या प्रकाशनानंतर सर्व पत्रकारांचा सत्कार प्रक्षावर मंडळाच्या वतीने करण्यात आला.

यावेळी पक्ष मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी, उपाध्यक्ष रत्नदीप मगर, बाबासाहेब खपले, सचिव ऋषिकेश वराडे, अजित क्षीरसागर, विशाल वाघमारे, उमाकांत रणदिवे, आनंद सावंत, युवराज तावस्कर, मनोज माडजे, नाना कंदले, नाना एखंडे, निलेश रोचकरी, नागनाथ दळवी, विनोद व्यवहारे, संजय कामे, जय सावंत, यांच्यासह पक्षाळ मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## शरीर सौष्ठव स्पर्धेत अक्षय बतालेचे यश

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ जानेवारी -**

सोलापुर जिल्हा बॉडी-बिल्डर्स असोसियशनने आयोजित केलेल्या भागवत श्री २०२५ जिल्हास्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धेत नळदुर्ग येथील अक्षय शिवलिंगेश्वर बताले या युवकांने चौथा क्रमांक मिळवुन दैदीप्यमान यश संपादन करुन नळदुर्ग शहराचे नाव शरीर सौष्ठव क्षेत्रात उज्वल केले आहे.

आजची तरुण पिढी मोबाईल तसेच विविध व्यसनांच्या आहरी जाऊन आपले आयुष्य उधवस्त करत आहेत.

मोबाईलमुळे तर आजची युवा पिढी अक्षरशा भरकटली आहे. अशा परिस्थितीत नळदुर्ग शहरातील अक्षय शिवलिंगेश्वर बताले या युवकांने सर्व व्यसनांपासुन दुर राहत दररोज व्यायामावर लक्ष केंद्रीत करुन शरीर सौष्ठव या क्रीडा प्रकारात आपले नाव केले आहे.

सोलापुर जिल्हा बॉडी -बिल्डर्स असोसियशनच्या वतीने आयोजित केलेल्या भागवत श्री २०२५ जिल्हास्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धेमध्ये नळदुर्ग येथील अक्षय शिवलिंगेश्वर बताले या युवकांने ७० किलो वजन गटात चौथा क्रमांक मिळविला आहे. त्याने मिळविलेल्या या यशाबद्दल नळदुर्ग शहरवासियांनी त्याचा सत्कार करून त्याचे अभिनंदन केले आहे.

## जिल्हा प्रशालेच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ जानेवारी -**

नळदुर्ग येथील जि. प्रशालेच्यावतीने दि.६ जानेवारी रोजी पत्रकार दिनानिमित्त शहरातील पत्रकारांचा सत्कार करून त्यांच्या गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक निजामोद्दीन इनामदार हे होते. प्रारंभी सुहास येडगे व तानाजी जाधव यांच्या हस्ते आनंद नगरीचे उदघाटन करण्यात आले.

यानंतर सुहास येडगे, सचिव तानाजी जाधव, विलास येडगे, लतिफ शेख, उत्तम बनजगोळे, प्रा. पांडुरंग पोळे, भगवंत सुरवसे, शिवाजी नाईक, आयुब शेख, डॉ. दीपक जगदाळे यांचा पत्रकार दिनानिमित्त प्रशालेच्यावतीने प्रशालेचे मुख्याध्यापक निजामोद्दीन इनामदार व शिक्षकांनी सत्कार केला.

शाळेतील विद्यार्थ्यांना व्यावहारीक ज्ञान मिळावे यासाठी प्रशालेच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी आनंद नगरी हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचे मुख्याध्यापक निजामोद्दीन इनामदार म्हटले आहे. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी गट करुन विविध खाद्य पदार्थ्यांचे २५ स्टॉल लावले होते.

यावेळी प्रास्ताविक मुख्याध्यापक निजामोद्दीन इनामदार यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दुगम अरुणा यांनी केले तर आभार कविता पुदाले यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले.

## जाणीव संघटनेचा १७ जानेवारीला तहसीलवर मोर्चा




**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.८ जानेवारी -**

जाणीव संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त वाशी तालुक्यातील संजय निराधार, श्रावणबाळ सेवा योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, वाशी तालुक्यातील गायरान धारक शेतकरी यांच्या प्रश्नावर १७ जानेवारी रोजी दुपारी बारा ते तीन या वेळेत पारा चौकातून शिवाजीनगर मार्गे तहसीलवर मोर्चा नेण्यात येणार आहे.

या मोर्चाचे नेतृत्व रामभाऊ लगाडे करणार असून तीन महिन्यापासून रखडलेल्या संजय निराधार, श्रावणबाळ सेवा योजन, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, यांची पेन्शन त्वरित वाटप करावी, वाशी तालुक्यातील १९८५ पासून शासकीय गायरान जमिनी वहीती खाली आणून पिके काढून खाता आहेत. तरी त्यांच्या नावे सातबारा देण्यात यावा संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी वृद्धपकाळ योजना, श्रावणबाळ सेवा योजना यांचे अर्ज मंजूर करण्यासाठी लागणारे वार्षिक उत्पन्न २१००० रद्द करून ५१ हजार रुपये करावे व सर्वांना योजनेचा लाभ द्यावा.

नवीन कुटुंबाला शिधापत्रिका घेण्यात यावे व रेशन वाटप करण्यात यावे. गावोगावी दलित आदिवासी यांना स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून असलेल्या जागेची नावावर करून मालकी हक्कात देण्यात यावे इत्यादी मागण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. अशा आशयाचे निवेदन तहसीलदार वाशी यांना देण्यात आले.

यावेळी उपविभागीय अधिकारी कळम संजय पाटील व नायब तहसीलदार भोसले यांच्या उपस्थितीत जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे, तालुकाध्यक्ष शेषराव गाडे, रामलिंग घुले, हनुमंत घुले, शहानुर पठाण यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले.

## आ. प्रविण स्वामींच्या हस्ते उमरगा-लोहारा तालुक्यातील पत्रकारांचा सत्कार



सोशल मीडियाचा वेग मोठा असला तरी प्रिंट मीडियावर लोकांचा विश्वास आहे त्यामुळे पत्रकारांनी वस्तुनिष्ठ लिखाण करून प्रशासनातील चुका निर्दशनास आणल्यास लोकहिताच्या कामाला चालना मिळते.

**- आमदार प्रवीण स्वामी**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ जानेवारी -**

दर्पण दिनानिमित्त शहरातील शांताई मंगल कार्यालयात आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते उमरगा-लोहारा तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी अध्यक्षांनी राज्य भूविकास बँकेचे माजी अध्यक्ष बाबा पाटील होते. तर प्रमुख अतिथी म्हणून बाजार समितीचे सभापती रणधीर पवार माजी नगराध्यक्ष रज्जाक अत्तार, जिल्हा शिवसेना उपप्रमुख बसवराज वरनाळे, डॉ. अजिंक्य पाटील उमरगा काँग्रेस कमिटी अध्यक्ष अर्जुन बिराजदार, लोहारा अध्यक्ष राजू तोरकडी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय पवार, जिल्हा काँग्रेस कमिटी सचिव विजय वाघमारे, काँग्रेसचे शहराध्यक्ष अभिषेक औरादे, एम.ओ. पाटील, विजयकुमार नागणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. त्यानंतर उमरगा लोहारा तालुक्यातील पत्रकारांचा सत्कार आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य मारुती थोरे, दत्ता शिंदे, सुधाकर पाटील, विजय तळबोगे, अशोक सांगवे, महावीर कोराळे, बाबा मस्के, जीवन सरपे, राहुल वाघ, प्रकाश चव्हाण, ॲड. अशोक पोद्दार, ॲड. इनामदार, ॲड. जमादार, निजाम हंताळे, प्रफुल्ल गायकवाड, शिवकांत पतंगे, सनी पाटील आधी कार्यकर्ते तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय ढोणे प्रास्ताविक रजाक अत्तर आभार राजू तोरकडी यांनी मानले.


### तहसिल कार्यालय, परंडा (कुळ इनाम सिलींग विभाग)

### जाहीर प्रगटन

**दिनांक ०७/०१/२०२५**

प्रस्तुत जाहीर प्रगटणाव्दारे सर्व जनतेस जाहिररीत्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. विठठल आंबादास मासाळ, रा. आसू , ता. परंडा, जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे आसू, ता. परंडा येथील जमीन सर्व्हे/गट नंबर ४०४ या गटातील त्यांच्या नावे असलेले ०० हे. ६६ आर जमीन क्षेत्र देशमुख मदतमाष इनाम या भोगवटदार वर्ग २ जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करण्यासाठी व त्याची खरेदी-विक्री व्यवहार करण्यासाठी परवानगी मिळणे बाबत या कार्यालयास दिनांक २६/०५/२०२४ रोजी अर्ज दिला आहे.

तरी अर्जदार श्री. विठठल आंबादास मासाळ, रा. आसू, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे आसू, ता. परंडा येथील जमीन सर्व्हे/ गट नंबर ४०४ या गटातील त्यांच्या नावे असलेले ०० हे. ६६ आर जमीन क्षेत्र देशमुख मदतमाष इनाम या भोगवटदार वर्ग २ जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करण्यासाठी व त्याची खरेदी-विक्री व्यवहार करण्यासाठी परवानगी मिळणे बाबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणाऱ्या व्यक्तीचा सदरच्या कार्यवाहीस काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटण प्रसिध्द झाल्यापासून (१५) दिवसांचे आत लेखी स्वरुपात संबंधीत ग्राम महसूल अधिकारी आसू यांच्या कार्यालयात किंवा तहसिल कार्यालयात किंवा मा. जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचे कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करण्यासाठी कुणाचाही आक्षेप/उजर/तक्रार नाही असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/ उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**(निलेश काकडे)**
**तहसीलदार,**
**परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव**

CMYK

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जिव्हाळा ग्रुपतर्फे दर्पण दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.८ जानेवारी -**

वर्तमानपत्र हे लोकशाहीचा चौथा खांब आहे. पत्रकारांच्या लेखणीमध्ये जुलमी राजवट नष्ट करण्याचे सामर्थ्य आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी निर्भयपणे, सडेतोड व सत्यवादी लेखन करणाऱ्या पत्रकारांची गरज आहे, असे जिव्हाळा ग्रुपतर्फे आयोजित दर्पण दिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना समाजसेवक विश्वनाथ मूड पे म्हणाले. तत्पूर्वी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पांजली अर्पण करण्यात आली. नंतर पत्रकारितेच्या माध्यमातून उदगीरच्या विकासासाठी, समाजाचे प्रबोधन करण्यासाठी, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आपली लेखणी झिजवणारे, राज्यपातळीवर अनेक पुरस्कार प्राप्त पत्रकार, व्ही. एस. कुलकर्णी, पत्रकार अंबादास अलमखाने, उपसंपादक रामभाऊ मोती पवळे, संपादक विक्रम हलकीकर, प्रेस फोटोग्राफर अशोक तोंडारे ह्या पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या, प्रख्यात विचारवंत प्राध्यापक एन.डी. पाटील स्मृति विशेष अंकाचे पत्रकार मित्रांना भेट देण्यात आली.

# उदगीरच्या विमानतळाला तात्काळ मंजुरी द्यावी

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नागरी उड्डान मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे आ. संजय बनसोडे यांचे निवेदन...**

**वचनपुर्ती पुर्ण करणार...**



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.८ जानेवारी -**

मतदार संघ हा आंध्रप्रदेश, तेलंगणा व कर्नाटक राज्याच्या सिमेवर आहे. उदगीर नगरी ही ऐतिहासिक असून या ठिकाणी मोठी बाजारपेठ आहे तसेच जिल्हास्तरीय सर्व कार्यालये, जिल्हास्तरीय न्यायालये, प्रादेशिक परिवहन (आर.टी.ओ.) कार्यालयासह वेगवेगळ्या प्रकारची जिल्हास्तरीय कार्यालये आहेत. तसेच रेल्वेची कनेक्टीव्हीटी असल्याने दळणवळणासाठी लागणाऱ्या सर्व यंत्रणा उदगीर मतदार संघात उपलब्ध होत आहेत. तसेच नियोजित विमानतळासाठी मुबलक प्रमाणात जागाही उदगीर येथे उपलब्ध असून या उदगीर येथे आपण विमानतळास मंजूरी दिली तर येथील मागास भागाचा विकास होण्यास मदत होईल आणि या भागातील विविध प्रश्न सुटतील.

सदर विमानतळ उदगीरला झाले तर आंध्रप्रदेश, तेलंगणा व कर्नाटक राज्यातील व्यापाऱ्यांना याचा फायदा होणार असुन या भागातील नागरिकांना देश-विदेश व धार्मिक स्थळांना जाण्यासाठी याचा फायदा होणार आहे. म्हणून आपण विमानतळास मान्यता दयावी अशी विनंती माजी मंत्री तथा उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नागरी उड्डान मंत्री मुरलीधर मोहोळ, एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाचे चेअरमन विपीन कुमार यांच्याकडे आ. बनसोडे यांचे लेखी निवेदनाव्दारे केली आहे. आमदार संजय बनसोडे यांनी २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत उदगीर मतदार संघातील जनतेला उदगीर येथे विमानतळ उभारणार असल्याचे वचन दिले होते.

त्या वचनाची पूर्ती करताना आज पहिले पाऊल आमदार बनसोडे यांनी उचलून उदगीरच्या प्रगतीसाठी मी रात्रंदिवस काम करणार असल्याची ग्वाही माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी दिली आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### माँ साहेब मिनाताई ठाकरे यांना अभिवादन

**औसा, दि.८ जानेवारी -**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची सावली, तमाम शिवसैनिकांची माऊली मॉ साहेब मीनाताई ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक यांच्या हस्ते माँसाहेब मिनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी दिनेश जावळे, राहुल मातोळकर, त्र्यंबक स्वामी, शंकर रांजणकर, सोमनाथ स्वामी, खंडू जगताप, दिलीप भांडेकर, एस.आर. चव्हाण, शिवदास पवार, राधाकिसन गंगणे, परमेश्वर सुर्यवंशी रेणापूर, नारायण माने, नागुअन्ना सुतार, राकेश रणखांब, खंडु जगताप, रुषिकेश पाटील, राहुल रोडे, चंद्रशेखर कालीदास मेटे हणुमंत पडवळ अदी सह शिवसैनिक उपस्थित होते.



### बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी

**शिरूर अनंतपाळ, दि.८ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा शिरूर अनंतपाळ पत्रकार बांधवांच्या वतीने येथील पंचायत समिती सभागृहामध्ये अद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेची पूजा करून व त्यांना अभिवादन करून पत्रकार दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार उत्तम विश्वनाथ कदम हे होते. प्रमुख पाहुणे भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते नवनाथ डोंगरे हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या मार्गदर्शनानंतर या कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली. या कार्यक्रमास एबिडीओ यमुलवाड, पंचायत समितीचे ओ.एस. कदम, विनोद कल्लेकर, भोसले, बद्रीनारायण सुरवसे, सोमनाथ स्वामी, शंकर मिटकर, राजनारायण बिराजदार, मारुती वाकरे, शकील देशमुख, शिवहार कोट्टे, राम बालवाड, नितेश झांबरे, बालाजी सगर, मेहताब शेख, फतेहअली खाँ पठाण, रहीम सय्यद यासह अनेकांची उपस्थिती होती.



### तालुकाध्यक्षपदी वाघे तर सचिवपदी मोरे यांची निवड

**निलंगा, दि.८ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या निलंगा तालुका अध्यक्षपदी कमलाकर वाघे तर सचिव पदी बालाजी मोरे यांची निलंगा येथे पंचायत समिती सभागृहात ग्रामरोजगार सहाय्यकाची बैठकीत जिल्हा उपाध्यक्ष आत्माराम मोतीबोने व संदीप बगदुरे यांच्या मार्गदर्शनाखाली एकमतांनी फेरनिवड करण्यात करण्यात आली. यावेळी संघटनेच्या विविध विषयांवर चर्चा झाली तसेच नूतन कार्यकारणी तयार करण्यात आली आहे. या कार्यकरणीत उपाध्यक्षपदी माधव भोसले, खंडू गायकवाड तर कोषाध्यक्षपदी कल्याण बरमदे, संघटक श्रीधर लोभे, सहसंघटक पंकज कानडे, महिला संघटक माया सूर्यवंशी, प्रसिद्धिप्रमुखपदी जीलानी शेख सल्लागार बाळासाहेब महापुरे, काशिनाथ कळशे, सहसल्लागार प्रेमानाथ खोबरे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सर्कल प्रमुखांचीही निवड यावेळी करण्यात आली. यात शंकर मोरे, लक्ष्मण सूर्यवंशी, विनायक माने, उमेश पांढरे, दत्तात्रय गायकवाड, इमरान चुडीवाले, रशीद शेख, महेश जाधव, दत्ता कांबळे, बालाजी मगर, योगेश पाटील, व्यंकट काळगे, केदार मोरे, अरविंद माने, बालाजी पाटील, उद्धव गायकवाड, परमेश्वर तारे, अजित ढगे, बिभीषण पांढरे, हरिभाऊ कांबळे, जगदीश सूर्यवंशी, रावसाहेब गायकवाड, ज्ञानेश्वर इंगळे, राजेंद्र बिराजदार, किरण पोतदार, विनायक गायकवाड, मारुती बिराजदार यांच्या निवडी करण्यात आल्या आहेत.

### राधाबाई आयनिले यांचे निधन

**शिरूर अनंतपाळ, दि.८ जानेवारी -**



शिवपूरचे माजी सरपंच संभाजी निवृती आयनिले व मधुकर निवृत्ती आयनिले यांच्या मातोश्री कै. राधाबाई निवृत्ती आयनिले यांचे दि.६ जानेवारी रोजी सायंकाळी ६. ३० वाजता निधन झाले. त्यांच्यावर ७ जानेवारी रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी त्यांचे नातेवाईक, गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास असला की यश हमखास मिळते : सोमनाथ वाडकर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.८ जानेवारी -**

अनुसयादेवी सोनकवडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वलांडी येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन पंचायत समिती शिक्षण विभाग देवणी व अनुसयादेवी सोनकवडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वलांडी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. विज्ञान प्रदर्शनाचा दुसरा दिवस असून या दोन दिवसात उत्कृष्ट प्रयोगाचे सादरीकरण केलेल्या विद्यार्थ्यांना यामध्ये उच्च प्राथमिक गट इयत्ता ६ वी ते ८ वी व माध्यमिक व उच्च माध्यमिक गट इयत्ता ९ वी ते १२ वी असे दोन गटामधून विद्यार्थ्यांना परीक्षकांमार्फत योग्य प्रयोगाची निवड करुन अनुक्रमे पहिला,दुसरा व तिसरा क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यामध्ये सर्वप्रथम उच्च प्राथमिक गटातून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा वडमुरंबी येथील विद्यार्थीनी समीक्षा शिवानंद आवाळे हिच्या अन्न सुरक्षा गोळी या प्रयोगाला प्रथम क्रमांक मिळाला तिला ढगे आर.पी. या शिक्षकांनी मार्गदर्शन केले होते. तसेच अनुसयादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वलांडी येथील विद्यार्थीनी नंदिनी ज्ञानेश्वर नागलगावे हिच्या नैसर्गिक साधन स्त्रोताचा उपयोग या प्रयोगाला द्वितीय क्रमांक मिळाला शितल सोनकवडे या शिक्षिकेने मार्गदर्शन केले होते. तसेच नृसिंह विद्यालय गुरधाळ येथील विद्यार्थी परमेश्वर मदन वाघमारे याच्या नैसर्गिक शेती जीवामृत या प्रयोगाला तिसरा क्रमांक मिळाला असून याला आर.के. पाटील सरांनी मार्गदर्शन केले होते. तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी सादरीकरणासाठी आलेल्या सर्व प्रयोगाचे परीक्षण करण्याचे काम तायडे व्हि.टी, मंजुषा सुडे, कोलतमे ए.व्हि., येवरे, सुदन कुलकर्णी व नेकनाळे यांनी पाहिले.

यावेळी गट साधन केंद्र देवणी येथील सर्व कर्मचारी व अनुसयादेवी सोनकवडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व सर्व कर्मचारी तसेच तालुक्यातील सर्व केंद्रीय मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फिजिओथेरपी महाविद्यालयात जागतिक ब्रेल लिपी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.८ जानेवारी -**

जागतिक ब्रेल लिपी दिन व लुईस ब्रेल यांच्या निमित्ताने जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर, चिंतामण परांजपे दृष्टीदान प्रकल्पांतर्गत विवेकानंद वैद्यकीय फाऊंडेशन व संशोधन केंद्र, लातूर, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री वेताळेश्वर शैक्षणिक संचलित लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयात नेत्र तपासणी शिबिर व दिव्यांग प्रवर्गाची जनजागृती व्हावी म्हणून दिव्यांग प्रवर्गाचे प्रदर्शन करीत जागतिक ब्रेल लिपी दिन साजरा करण्यात आला.

यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला होता.

## उदगीरात रोटरी क्लबच्या व्यवसाय सेवा पुरस्काराचे वितरण

### रोटरीने तळागाळातील लोकांना मदतीचा हात दिला...

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.८ जानेवारी -**

रोटरी क्लब ही आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणारी मोठी संस्था असून या संस्थेने समाजातील तळागाळातील माणसाला मदतीचा हात देण्याचे काम केले असल्याचे प्रतिपादन रोटरी क्लबचे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी केले.

उदगीर येथील रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने समाजातील विविध व्यवसायात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यावसायिकांचा व्यवसाय सेवा पुरस्कार डॉ. साबू यांच्या हस्ते देऊन गौरव करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर रोटरी क्लबचे सहायक प्रांतपाल किशोर देशपांडे, रोटरी क्लबच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी, सचिव ज्योती चौधरी, प्रोजेक्ट चेअरमन व्यंकटराव कणसे यांची उपस्थिती होती. यावेळी ॲड. गुलाब पटवारी, चंद्रकांत पाटील कोळखेडकर, केशरचंद हिराशा डांगुर, वर्षा प्रमोद पत्तेवार, गोदावरी रामराव शिंदे यांचा व्यवसाय सेवा पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तर प्रभुआप्पा नागप्पा चौधरी यांचा जीवनगौरव पुरस्काराने गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी क्लबच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन विशाल तोंडचिरकर व प्रा. मंगला विश्वनाथे यांनी केले तर ज्योती चौधरी यांनी आभार मानले.



यावेळी संतोष फुलारी, विजय पारसेवार, डॉ. सुधीर जाधव, सुयश बिरादार, अभिजित पटवारी, डॉ. संतोष पांचाळ, डॉ. विजयकुमार केंद्रे, अनिल मुळे, रमेश निजवंते, डॉ. बस्वराज स्वामी, पवन मुत्तेपवार, सुनीता मदनुरे, विद्या पांढरे, ॲड. मंगेश साबणे, विक्रम हलकीकर यांच्यासह रोटरी क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते.

## पुस्तक हेच ज्ञान मिळविण्याचे परिपूर्ण साधन : अंबादास केदार

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.८ जानेवारी -**

ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या स्पर्धेत टिकायचे असेल तर पुस्तकाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे अभ्यासक्रमाव्यतिरिक्त पुस्तके वाचली पाहिजेत. पुस्तक हेच ज्ञान मिळविण्याचे परिपूर्ण साधन आहे, असे मत देऊळवाडी येथील कथाकार अंबादास केदार यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत 'लेखक-वाचक संवाद' कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के हे होते.

पुढे बोलताना अंबादास केदार म्हणाले, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र यासारखे विविध साहित्यप्रकार विद्यार्थ्यांनी वाचले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी मोबाईलचे व्यसनाधीन न होता. पुस्तकांचे वाचनाधीन व्हावे, असे आवाहन उपस्थितांना केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ. लक्ष्मीकांत पेन्सलवार यांनी तर डॉ. बालाजी होकरणे यांनी मानले.

## वाचनामुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात : डॉ. कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.८ जानेवारी -**

ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्र, प्रबंध, ई-बुक्स यासारख्या विविध माध्यमातून वाचकांपर्यंत माहिती पोहोचत असते. वाचनातून नवीन काहीतरी प्राप्त होते. नवनवीन संकल्पना जाणून घेण्यासाठी, व्यक्तिमत्व विकासासाठी वाचन आवश्यक असते. वाचनामुळेच माहितीचे ज्ञानात रूपांतर होते व ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात, असे मत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा व राष्ट्रीय सेवा योजना विभाग' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विद्वत व्याख्याना'मध्ये बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव रामचंद्र तिरुके हे होते.

यावेळी व्यासपीठावर सिनेट सदस्य तथा शिवाजी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. विष्णू पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील, श्री हावगीस्वामी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. अजित रंगदळ यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. कुलकर्णी म्हणाले, शाळा-महाविद्यालयातील शिक्षकांनी वाचन प्रेरकाची भूमिका पार पाडावी. कारण विद्यार्थ्यांसाठी त्यांना शिकविणारे शिक्षक हेच खरे आदर्श असतात. शिक्षकांनी विविध ग्रंथांच्या वाचनातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी. स्थानिक लेखकांची पुस्तके देखील विचारांची शिदोरी पूरवत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण वाचन करावे, असे आवाहन उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ. लक्ष्मीकांत पेन्सलवार यांनी तर आभार प्राध्यापक सचिव डॉ. भालचंद्र करंडे यांनी मानले.

## दर्पन दिनानिमित्त १९ पत्रकारांना प्रत्येकी दोन लाखांच्या विम्याचे कवच

### एलआयसी एजंट भागवत गितेंनी भरली विम्याची रक्कम...

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.८ जानेवारी -**

पत्रकारीतेचे जनक, दर्पनकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जंयती दिनाचे औचित्य साधुन ६ जानेवारी पत्रकार दिनी एलआयसी. एजंट भागवत गित्ते यांनी तालुक्यातील १९ पत्रकारांचा प्रत्येकी दोन-दोन २ लाख रुपयांचा अपघात विमा स्वखर्चातुन उतरवुन पत्रकारांप्रति सामाजीक बांधीलकी जोपासली तर महात्मा बसवेश्वर संस्थान आणि रेणापुरचे पोनि. प्रदिप काकडे यांनी पत्रकारांचा सत्कार केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थानचे अध्यक्ष उत्तरेश्वरअप्पा हलकुडे होते. प्रमुख अतिथी म्हणुन रेणापुरचे पोलीस निरीक्षक प्रदिप काकडे, एल.आय.सीचे भागवत गित्ते, मंडळ अधिकारी कमलाकर तिडके, तलाठी बालाजी साळी, माजी ग्रा.प.सदस्य ज्ञानोबा गुडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलीत करून पत्रकारीतेचे जनक, दर्पनकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करण्यात आला.



महात्मा बसवेश्वर संस्थान आणि पो. नि. प्रदिप काकडे यांच्या वतीने विष्णु आचार्य, शरद राठोड, मधुकर गालफाडे, गोपाळ चिताडे, वाल्मीक केंद्रे, अनिल फुलारी, उदय पाठक, उमेश जोशी, संजय माकेगांवकर, योगेश मोरे अदि पत्रकारांचा शाल, पुष्पगुच्छ, लेखनी देवुन सत्कार करण्यात आला.

तर पत्रकार हा नेहमी समाजहित-देशहित डोळ्यासमोर ठेवुन आपला स्वतःचा जीव धोक्यात घालुन पत्रकारीता करीत असतो याची जाण ठेवुन एलआयसी एजंट भागवत गित्ते यांनी तालुक्यातील १९ पत्रकारांचा प्रत्येकी दोन-दोन २ लाख रुपयांचा अपघात विमा स्वखर्चातुन उतरवुन पत्रकारांप्रति सामाजीक बांधीलकी जोपासुन पत्रकारांच्या विमा पॉलीसीचे यथोचित सत्कार करून वाटप केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बाबा हलकुडे यांनी केले.

आभार अनिल फुलारी यांनी मानले. या कार्यक्रमा करिता महात्मा बसवेश्वर संस्थानच्या गजानन फुलारी, शुभम हलकुडे, गजानन मुळे, अच्युत दळवी, महादु हलकुडे, राजेश पाठक, सागर हलकुडे, कैलास उरगुंडे, कल्याण चंदनकेरे, प्रविण उरगुंडे अदिंनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता परिश्रम घेतले.

**जाहिरनामा**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय - विभाग)**

**जा.क्र. २०२४/एमएजी/कावि** **दिनांक २६/१२/२०२४**

**अर्जदार :- श्री/श्रीमती. कदम किशोर गिरीधर**
**विरूध्द**
**गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय बोरगाव (बु.)**
**अर्ज :- कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात **श्री/श्रीमती कदम किशोर गिरीधर रा. बोरगाव (बु.) ता. चाकूर, जि. लातूर** यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा **जन्म दि.३०/०४/१९९५** रोजी झाला राहत्या घरी बोरगाव (बु.) येथे झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय बोरगाव (बु.), ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय बोरगाव (बु.), ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

**दि. २६/१२/२०२४** **पुढील तारीख ३०/०१/२०२५**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित /-**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# दर्पणदिनी मुक्त पत्रकार अनिल पुरी यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठी पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.पत्रकारांसाठी देश पातळीवर काम करणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम घेतले जातात.याचाच एक भाग म्हणून दर्पण दिना निमित्त शहरातील भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात पत्रकाराचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

गेली अनेक वर्ष सांस्कृतिक चळवळ अधिक गतीमान करण्यासाठी सकारात्मक पत्रकारीता करत असल्या बदल व्हाईस ऑफ मिडीया संघटनेच्या वतीने नाट्य समिक्षक तथा मुक्त पत्रकार अनिल पुरी यांचा लातूर जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, संघटनेचे जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



या प्रसंगी पत्रकार बालाजी फड, शहाजी पवार, अभय मिरजकर, दिपरत्न निलंगेकर, बाळासाहेब जाधव यांचीही प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. सितम सोनवणे यांनी केले. या कार्यक्रमाला पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...

### विद्यापीठस्तरीय स्पर्धेत दयानंदचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज तर्फे आयोजित विद्यापीठस्तरीय अन्वेषण-२०२५ या स्पर्धेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश मिळवून प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे.

सदरील स्पर्धेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मधील बी.फार्म द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी तनुजा मोरे व ऋतुजा गोरे यांनी (हेल्थ अँड सायन्स) या सदरात प्रथम पारितोषिक पटकावले.या स्पर्धेत विद्यापीठातील चार जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्नित ३७७ महाविद्यालयांचा समावेश होता.यशस्वी विद्यार्थिनींनी डॉ.अर्चना येलमटे यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेतील या विजेत्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, सचिव रमेश बियाणी,सहसचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्य सोनवणे,कोषाध्यक्ष संजय बोरा आणि प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते आदिंनी अभिनंदन केले.

### प्रदेश उपाध्यक्षपदी देडे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** पुणे येथे दर्पण दिनानिमित्त झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी अशोक देडे यांची नियुक्ती करण्यात आली.

पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, मावळते प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे, सिद्धार्थ भोकरे, नवनाथ जाधव आदींच्या प्रमुख उपस्थिती ही निवड करण्यात आली.

यावेळी नूतन प्रदेशाध्यक्ष म्हणून गोविंद वाकडे यांची निवड करण्यात आली. मावळते प्रदेशाध्यक्ष मुंडे यांचा कार्यकाळ संपल्याने वाकडे यांची निवड करण्यात आली. राज्यात सर्वाधिक सदस्य संख्या असलेल्या आणि पत्रकारांच्या प्रश्नावर नेहमी अग्रेसर असणारा संघ म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची ओळख आहे.

### ज्ञानप्रकाशचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** लातूरच्या शैक्षणिक जगतात स्वतःचे वेगळेपण सिद्ध करणाऱ्या ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प द्वारा देणे निसर्गाचे बंध नात्यांचे हा सांस्कृतिक महोत्सव दगडोजीराव देशमुख सभागृहात संपन्न झाला.

ज्ञानप्रकाशच्या स्नेहसंमेलनातून मुलांना शिकण्याच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जातात. अशाच प्रकारचे दर्जेदार स्नेहसंमेलने ज्ञानप्रकाशच्या मुलांनी रंगमंचावर मागील २५वर्षात सादर केली आणि ती कायम स्मरणात राहिली. देणे निसर्गाचे बंध नात्यांचे सर्वांचा जिव्हाळ्याचा विषय घेऊनयावर्षीचे स्नेहसंमेलन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप- प्रज्वलन व नटराज मूर्तीचे पूजन हार्ट स्पेशालिस्ट माननीय डॉ. संजय शिवपुजे सर व मधुमेह तज्ज्ञ स्नेहल शिवपुजे यांच्या हस्ते झाले. तर उद्घाटन बालरंगभूमी संमेलनामध्ये सादरीकरण केलेल्या मुलांच्या तबला वादनाने झाले. यानंतर वैद्यकीय, सामाजिक सांस्कृतिक, प्रशासकीय, शैक्षणिक व कृषी अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या ज्ञानप्रकाशच्या पालकांचा सन्मान रौप्य महोत्सवी वर्षापासून ज्ञानप्रकाश ने केला आहे तसाच याही वर्षी केला. यामध्ये प्रशासकीय सेवेत भरीव कामगिरी म्हणून लालासाहेब पुजारी, शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल श्री प्रमोद नरसिंग कटके,पत्रकारितेत भरीव कामगिरीसाठी इस्माईल सलीम शेख तर वैद्यकीय क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल डॉ. सचिन बालकुंदे यांचे प्रमुख पाहुणे शिवपुजे सर व स्नेहल शिवपुजे व सतीश नरहरे संचालिका व मुख्याध्यापिका सविता नरहरे,पालक समितीचे सदस्य ,पोलीस उपनिरीक्षक कराड यांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

### कार-दुचाकीचा अपघात; दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** शहरातील पाच नंबर चौकातून बार्शी रोडकडे जाणाऱ्या समांतर रस्त्यावर ग्रैंड हॉटेलच्या पाठीमागे दुचाकीस एका भरधाव क्रुझर चालकाने धडक दिल्याची घटना घडली होती. या घटनेत दोघेजण जखमी झाले होते. या प्रकरणी देण्यात आलेल्या तक्रारीवरून मंगळवारी एमआयडीसी पोलिस ठाण्यात क्रुझर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सत्तार खालिद शेख हे सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास येत असताना त्यांच्या दुचाकी ला पाठीमागून भरधाव आलेल्या क्रुझर गाडीच्या चालकाने हयगय व निष्काळजीपणे वाहन चालवून जोराची धडक दिली. या घटनेत फिर्यादी व त्यांच्या मुलालाही गंभीर मार लागल्याने नाकाचे हाड फॅक्चर झाले. या प्रकरणी क्रुझर चालकावर एमआयडीसी पोलिसात गुन्हा नोंद आहे.

# लातुरात मुख्याध्यापकांच्या शैक्षणिक संमेलनाचे आयोजन

**सहकारमंत्री पाटील यांच्या हस्ते होणार उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ, पुणेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाचे उद्घाटन १० जानेवारी रोजी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते व स्वागताध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर येथील औसा रोडवरील थोरमोटे लॉन्स याठिकाणी होणार असल्याची माहिती लातूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तथा प्रदेश उपाध्यक्ष प्रकाश देशमुख यांनी दिली.

थोरमोटे लॉन्स, औसा रोड, लातूर येथे लोकनेते विलासराव देशमुख नगरीत पार पडणाऱ्या या दोन दिवसीय शैक्षणिक संमेलनाच्या उद्घाटन सत्रास शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, माजी शालेय शिक्षण मंत्री वसंत पुरके, संमेलनाध्यक्ष बाबूराव जाधव, कार्याध्यक्ष हनुमंत साखरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार डॉ. शिवाजी काळगे, खासदार ओमराजे निंबाळकर, आ.अमित देशमुख, आ.संभाजी पाटील निलंगेकर, आ. संजय बनसोडे, आ. विक्रम काळे, आ.अभिमन्यू पवार, आ.सतीश चव्हाण, आ. रमेश कराड, आ. किशोर दराडे, आमदार जयंत असगावकर, आ. किरण सरनाईक, आमदार ज. मो. अभ्यंकर, माजी आमदार धीरज देशमुख, शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह, लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, विभागीय शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे संस्थापक रावसाहेब आवारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शुक्रवारी दुसऱ्या सत्रात दुपारी ३ वाजता 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, प्रा. शिवराज मोटेगावकर यांचे व्याख्यान होणार आहे. ११ रोजी सकाळच्या पहिल्या विदर्भ मुख्याध्यापक संघ शोध निबंध सादर करतील. सकाळी दहा ते साडेअकरा या वेळेत व्याख्यान होणार असल्याची माहिती प्रकाश देमशुख यांनी दिली.

# तंबाखूमुक्त परिसरासाठी दंडात्मक कारवाई करा : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये व कार्यालयीन परिसर तंबाखूमुक्त ठेवण्यासाठी सर्व कार्यालयप्रमुखांनी दंडात्मक कार्यवाही करावी, असे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी मंगळवारी दिले.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम व राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम अंतर्गत जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची आढावा बैठक झाली. या बैठकीमध्ये राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत वर्षभरातील विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी यांनी घेतला. तसेच मौखिक आरोग्य कार्यक्रमाचा देखील सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी म्हणाल्या, जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये व कार्यालयीन परिसर तंबाखूमुक्त ठेवण्यासाठी सर्व कार्यालयप्रमुखांनी कोटपा-२००३ कायद्यानुसार दंडात्मक कार्यवाही करावी. तसेच जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्था तंबाखूमुक्त करून शालेय विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी शालेय प्रशासनाने प्रयत्नशील राहावे. जिल्ह्यातील सर्व शाळा तंबाखूमुक्त करण्याच्या सूचना शिक्षण अधिकारी व शिक्षण विभाग यांना दिल्या. या बैठकीला अनेक अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरकारी रस्त्यावर तिसऱ्यांदा अतिक्रमण



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** येथील कृपासदन रस्त्याजवळ मातोश्री रमाबाई सोसायटी व नाथनगरमधील सहा कुटुंबीयांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी तिसऱ्यांदा अतिक्रमण केले आहे. गुत्तेदारानेही ते अतिक्रमण सोडून, गटारी व पक्के डांबरी रस्ते जेसीबीने फोडले. यामुळे नागरिकांची अडचण झाली आहे. या अतिक्रमित व गुत्तेदाराला महापालिकेचा छुपा पाठिंबा आहे. याविरुध्द पीडित नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.

सारोळा ते सिध्देश्वर चौक या पारंपरिक रस्त्यात कृपासदन रोड क्रॉसिंगच्या अलिकडे, या रोडच्या दक्षिण व उत्तर अशा दोन्ही बाजूंनी, मातोश्री रमाबाई सोसायटी व नाथनगरमधील ६ कुटुंबीयांनी अतिक्रमण केले आहे. दुकाने भाड्याने दिली आहेत. घरांच्या संरक्षण भिंती थेट रस्त्यावर बांधल्या आहेत. त्या ठिकाणी हा रोड आता किमान १० फुटांचाही शिल्लक राहिला नाही. अतिक्रमणांच्या पुढे रस्त्यावर ओटे बांधले आहेत. यामुळे सांडपाणी वाहून जात नाही. दुर्गंधी पसरली आहे.

आतापर्यंत तीनवेळा हे अतिक्रमण हटविले होते. तेथे महापालिकाही पक्का रस्ता अथवा गटार करीत नाही. एका गुत्तेदाराने कार्यादेश नसताना तो अतिक्रमण भाग सोडून अलिकडे सुमारे १२५ फुटांचा पक्का डांबरी रोड व अंदाजे १२ फुटांची गटार उध्वस्त केली. यामुळे अडचणीत वाढ झाली. ७ महिने लोटले तरी अतिक्रमण हटविले नाही. गुत्तेदाराने चुकीचा फोडलेला रस्ता व गटारी दुरुस्त केल्या नाहीत. याविरुध्द सोमवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयावर रामकुमार रायवाडीकर यांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. याला चेअरमन वैजनाथ माने, वीरभद्र इंदुलकर, बुध्दाजी कांबळे, संजय व्यवहारे, श्याम वरयाणी, वलीसाहेब शेख, सूरज पाटील, गोपाळ चिकाटे, गणपत तेलंगे, रामदास ससाणे, अंगद कांबळे, सत्यभामा माने, नंदू दुधाळ, दत्तात्रय वलाकटे, संगीता भोसले, अॅड. डी. एन. भालेराव आदींनी पाठिंबा दिला आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी प्रयत्न करा :डॉ. वावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** आपल्या शहराची स्वच्छता राखण्यात महत्वाची भूमिका बजाविणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेवून प्रयत्न करावेत, असे राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी. पी. वावा यांनी आज सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.



जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे जिरेंदर नाथ, संदीप चरण, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, नगरपालिका प्रशासनचे सहआयुक्त मंगेश शिंदे, सहायक कामगार आयुक्त मंगेश झोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

सफाई कर्मचारी यांनी सफाई काम करताना आवश्यक खबरदारी घेणे आवश्यक आहे. हातमोजे, मास्क, बूट आदी साधनांचा वापर करण्याबाबत त्यांना सूचना द्याव्यात. तसेच त्यांची नियमित आरोग्य तपासणी करून आवश्यक लसीकरण करावे. लाड पागे समितीच्या शिफारसीनुसार सर्व पात्र सफाई कर्मचाऱ्यांना लाभ देण्यात यावेत. प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याला ओळखपत्र देवून त्यावर कर्मचाऱ्याची आरोग्यविषयक माहिती, ईपीपीएफ क्रमांक नमूद करावा, असे डॉ. वावा म्हणाले. सफाई कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना इतर व्यवसाय उभारणीसाठी सहाय्य करावे अशा सुचना त्यांनी दिल्या.

# संतोष देशमुख हत्याप्रकरणी लातुरात चक्काजाम



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या तसेच परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिसांच्या मारहाणीत झालेल्या मृत्यूचा निषेध नोंदवत यातील दोषींवर कठोर शिक्षा करावी या व अन्य मागण्यांसाठी मंगळवारी सकाळी १० वाजेपासून लातूर शहरातील प्रमुख चार चौकांमध्ये सर्वपक्षीयांकडून चक्काजाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान शहरात येणाऱ्या वाहनांच्या चारही बाजूने जवळपास चार ते पाच किलोमीटर रांगा लागल्या होत्या. पोलीस प्रशासनाच्या विनंतीवरून आंदोलकांनी दुपारी २ वाजता आपले चक्काजाम आंदोलन मागे घेत प्रशासनाला मागण्यांचे निवेदन दिले.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घुण हत्या करण्यात आली आहे. तसेच परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्याबाबत मानवी हक्कांची पायमल्ली झाली आहे. या दोन्ही प्रकरणांत दोषी अधिकारी व कार्यकर्ते यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी मंगळवारी लातूर शहरातील औसा रोडवरील छत्रपती संभाजीराजे चौक, नांदेड रोडवरील गरूड चौक, अंबाजोगाई रोडवरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक तसेच बार्शी रोडवरील ५ नंबर चौक येथे सर्वपक्षीयांच्यावतीने सकाळी १० वाजेपासूनच चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

यामुळे शहरात एकही वाहन येऊ शकले नाही. या दरम्यान वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दरम्यान, पोलीस प्रशासनाच्या विनंतीनंतर दुपारी दोन वाजता आंदोलन मागे घेण्यात आले.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना तत्काळ अटक करावी, कुटुंबियांना शासनाने ५० लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, त्यांच्या कुटुंबातील एकास शासकीय नोकरी द्यावी, हे प्रकरण नि:पक्षपातीपणे चालण्यासाठी इतर जिल्ह्यातील न्यायालयात वर्ग करावे, या हत्या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत धनंजय मुंडे व पंकजा मुंडे या दोन्ही मंत्र्यांना मंत्रिमंडळातून बाहेर काढावे यासह इतर मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या.

# वाले इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** शहरातील नामवंत अशा वाले इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले. सकाळच्या सत्रात प्राथमिक विभागाच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे कोषाध्यक्ष शांतीकुमार कुचेरिया होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मकरंद सावे, अरविंद सोनवणे, शिवशंकर बिडवे, जकीखान कायमखानी, संदीप सावे, ममता सावे, डॉ. निलेश नागरगोजे यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनी भावगीते, लावण्या, स्नेहगीतावर नृत्याविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. दुपारच्या सत्रात माध्यमिक विभागाचे स्नेहसंमेलन यावेळी डॉ. अशोक पोद्दार म्हणाले, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलन हे व्यासपीठ आहे. प्रत्येकाने यात सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. यातून आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो.कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. अशोक पोद्दार यांच्या हस्ते झाले. मंचावर मुख्याध्यापक प्राचार्य चंद्रशेखर भोगडे, उपप्राचार्य राजेश बाकलीकर, पर्यवेक्षक भारती यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रवीण सावरगावकर यांनी केले. यावेळी विविध कलागुणांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी करून उपस्थितांची मने जिंकली.

# डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी पोलिस उपमहानिरीक्षकांस दिले निवेदन

## खाजगी शिकवणी परिसरात वाढती गुंडगिरी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** लातूरचा आर्थिक कणा शाबूत ठेवणाऱ्या ट्युशन एरियातील वाढती गुंडगिरी, तेथे सर्रास चाललेल्या अंमली पदार्थांच्या वापराबद्दल पालकवर्ग करीत असलेल्या तक्रारी आणि लातूर शहरातील पोलीस यंत्रणेच्या आवाक्याबाहेर गेलेली अत्यंत बेशिस्त रहदारी आदी अत्यंत गंभीर प्रश्न भाजपा नेत्या डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी आपल्या अजेंड्यावर घेतले असून, या संदर्भात त्यांनी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांची नुकतीच शिष्टमंडळासह भेट घेऊन निवेदन दिले.

समाज माध्यमावर पत्रकारांशी बोलताना त्यांनी,ट्युशन एरियातील शिक्षकांना बाउन्सर्स बाळगण्याची काय गरज असा प्रश्न खेदपूर्वक उपस्थित केला. शिष्टमंडळात त्यांच्या समवेत गणेश हेड्डा, अविनाश कोळी, अॅड. दिग्विजय काथवटे, ओम धरणे, मीना भोसले, संगीत रंदाळे, बलराज खंडोमलके, गणेश गवारे, प्रवीण सावंत, शिरीष कुलकर्णी आदींचा समावेश होता.

लातूर शहरात सकाळी ६ वाजेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत खाजगी क्लासेसचे वर्ग चालत असून या एरियात गुंड तरुणांचा वावर नेहमीच होत आहे. मोठ्या आवाजात फटाका बुलेट वेगात चालविणे, स्पीकर लावून चार चाकी वाहन चालविणे, चाकू कत्तीचा धाक दाखवून विद्यार्थ्यांना दमदाटी करणे, मुलींची छेडछाड करणे असे प्रकार या भागात सतत चालू असतात.

अष्टविनायक मंदिरानजिकच्या पोलीस चौकीत पर्याप्त पोलीस संख्या नाही. त्या पोलीस चौकीचे सक्षमीकरण करून तेथे कायमस्वरुपी पुरेसे पोलीस कर्मचारी उपलब्ध करुन द्यावेत जेणेकरुन कायदा व सुव्यवस्थेची बूज राखली जाईल, असे निवेदनात डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी नमूद केले आहे.

# पत्रकारितेचे स्वरूप बदलले तरी आव्हाने कायमच

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ जानेवारी -** स्वातंत्र्यपूर्व काळातील पत्रकारिता आणि २१ व्या शतकातील पत्रकारिता यामध्ये जमीन आसमान चा फरक असला तरीही आव्हाने मात्र कायमच आहेत असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार वामन पाठक यांनी केले.

श्री केशवराज विद्यालयामध्ये पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक संदीप देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून वामन पाठक यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना पाठक म्हणाले, पूर्वी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी पत्रकारितेचा उपयोग झाला. आता सर्वसामान्यांना समस्येतून मुक्त होण्यासाठी पत्रकारिता उपयोगी ठरत आहे .



बाळशास्त्री जांभेकर हे पत्रकारितेचे जनक होते. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये पारतंत्र्यातून सर्वसामान्यांना मुक्त करण्यासाठी पत्रकारितेचा वापर झाला. त्या काळामध्ये त्यांनी पत्रकारितेमध्ये निर्माण केलेली विश्वासहर्ता यामुळे स्वातंत्र्यानंतर पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ निर्माण झाला.

१८१२ ते स्वातंत्र्यापर्यंतची पत्रकारिता अवघड होती. आव्हानेही त्याप्रमाणे होती. परंतु पत्रकारितेमुळे ही आव्हाने सहज पार करता आली. या पत्रकारितेमध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचेही मोठे योगदान होते. स्वातंत्र्यानंतर सरकार बदलले तरी सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी पत्रकारिता हे प्रभावी माध्यम ठरले. पत्रकारांसाठी शासन बदलले तरी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या कायम राहिल्यामुळे त्यांच्या सोडवणुकीसाठी उपयोग करावा लागत आहे. प्रिंट मीडिया बरोबरच सध्या इलेक्ट्रॉनिक्स मीडिया सोशल मीडिया याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. परंतु अद्यापही प्रिंट मीडियाची विश्वासहर्ता कायम टिकून आहे.

पत्रकारितेच्या सोयी सुविधांमध्ये कितीही भर पडली तरी आव्हाने मात्र कायमच राहणार आहेत असे मत वामन पाठक यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी त्यांनी पत्रकारितेतील विविध समस्यांचे दाखले दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संदीप देशमुख यांनी पत्रकारितेची गरज, यावर आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय माटेफळकर कुलकर्णी यांनी केले. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक अनंतराम कोपले पर्यवेक्षिका अंजली निर्मळे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली कुलकर्णी, कांचन तोडकर यांनी केले. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.